सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक २७ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# भाजपा विजयी संख्याबळात आघाडीवर : पालकमंत्री गोरे

- 'त्या'वेळी 'भाजपा'चे दोन मंत्री असतानाही एवढे यश मिळाले नव्हते
- अपेक्षित यश न मिळाल्याची जबाबदारी माझी असणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील १२ नगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल पाहता संख्याबळात भारतीय जनता पार्टी आघाडीवर म्हणजेच एक नंबरवर आहे. यानंतर आमचा मित्रपक्ष शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचा नंबर लागतो. काँग्रेस, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि अन्य राजकीय पक्षांचा मतदारांनी धुव्वा उडविला, असे राज्याचे ग्राम विकास मंत्री, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. सात नगराध्यक्ष भाजपाचे असतील अशी अपेक्षा होती पण चार नगराध्यक्ष विजयी झाले तर तीन नगरपालिकांमध्ये नगराध्यक्ष नसला तरी भाजपाची सत्ता आली आहे.



अपेक्षित यश न मिळाल्याची जबाबदारी मी स्वीकारतो. पण गतवेळी भाजपाचे दोन मंत्री असताना जेवढे यश मिळाले नाही तेवढे या निवडणुकीत मिळाले आहे. ग्रामीण भागातील गावागावत भाजपा पोहचविण्यात आम्ही यशस्वी झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. २०१६-१७ साली झालेल्या नगरपालिका निवडणुकीच्यावेळी सोलापूर जिल्ह्यात दोन मंत्री 'भाजपा'चे होते, असे सांगून ते पुढे म्हणाले, त्यावेळी केवळ दोन नगरपालिका 'भाजपा'च्या ताब्यात आल्या होत्या. जिल्हाभरातून ३१ नगरसेवक निवडून आले होते. यंदाच्या निवडणुकीत आम्ही चिकाटीने, ताकदीने तेही स्वबळावर लढलो. जिल्ह्यातील ४ नगरपालिकांवर सत्ता आणि एकूण १३२ नगरसेवक निवडून आणले आहेत. आमचे मित्रपक्ष शिवसेनेचे सोलापूर जिल्ह्यात ३ नगराध्यक्ष निवडून आलेले आहेत. त्यामुळे 'महायुती'चे एकूण ७ नगराध्यक्ष झाले आहेत.

आमचे मित्रपक्ष शिवसेना शिंदे गटाचे ३ नगराध्यक्ष आणि ५० नगरसेवक निवडून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे १५ नगरसेवक निवडून आले आहेत. विरोधी गटातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे २८ नगरसेवक निवडून आले आहेत. काँग्रेसच्या वाट्याला नगरसेवक पदाच्या केवळ २ जागा आलेल्या आहेत. ३ ते ४ ठिकाणी आमचे बहुमत असून, नगराध्यक्ष इतर पक्षांचा आला आहे. त्यांनाही आमच्याबरोबर जुळवूनच शहर विकास करावा लागणार आहे, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस आमदार देवेंद्र कोठे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण उपस्थित होते.

### विरोधक ध चा मा करीत आहेत

यंदाच्या नगरपालिका निवडणुकीत आम्ही काहीही गमावले नाही तर कमावले आहे. विरोधक ध चा मा करीत असले तरी वास्तव आपणा सर्वांसमोर आहे. गत निवडणुकीत भाजपाचे बळ किती होते आणि आज किती आहे हे सर्वांना या निवडणुकीत ज्ञात झाले आहे. या निवडणुकीत आम्ही २ नगराध्यक्ष मिळविले आणि ११२ जास्तीचे नगरसेवक मिळविले, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### सोलापूरसह धाराशिव, साताऱ्यात यश

या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्याचा निवडणूक प्रभारी म्हणून काम पाहिले आहे. सोलापूर जिल्ह्यात ४ नगराध्यक्ष, धाराशिव जिल्ह्यात ४ नगराध्यक्ष आणि सातारा जिल्ह्यात ४ नगराध्यक्ष निवडून आणले आहेत. साताऱ्यातील म्हसवड, फलटण, वाई, रेवतपूर आदी ठिकाणी मी लक्ष घातल्याने या नगरपालिका भाजपाकडे आल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

### पळून जाणाऱ्यांपैकी मी नाही

काही नगरपालिकांत आमचा एकही उमेदवार नव्हता. दुधनीसारख्या नगरपालिकेत आम्ही विजय मिळविला आहे. अनगरसारख्या ठिकाणी आमची सत्ता आली आहे. काही ठिकाणी आम्ही खाते खोलले आहे. यश-अपयश ही चालत राहणारी गोष्ट आहे. पराभव झाला म्हणून दूर पळून जाणाऱ्यांपैकी मी नाही, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

### महापालिकेसाठी दोन दिवसात बैठक

सोलापूर महापालिकेवरही भाजपचा भगवा फडकविणार आहे. याची रणनिती आखण्यासाठी स्थानिक तीन आमदार, पदाधिकारी आदींसमवेत येत्या दोन दिवसात बैठक घेतली जाणार आहे. महानगरपालिका निवडणुकीत महायुती करण्याचा आमचा मानस आहे. मात्र, जमलं तर ठीक नाहीतर आमचा ७५ पारचा नारा राहणार आहे, असेहीत्यांनी स्पष्ट केले.

## महत्त्वाचे

### भारत न्यूझिलंडदरम्यान मुक्त व्यापार करार

**नवी दिल्ली :** भारत आणि न्यूझिलंड यांच्यात झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे (एफटीए) भारतातून होणाऱ्या वस्तू आणि सेवांच्या निर्यातीवर शून्य टक्के आयात कर लागणार असल्यामुळे याचा फायदा भारतातील शेतकऱ्यांसह विविध क्षेत्रातील उद्योगांना होणार असल्याचे केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज सांगितले. वाणिज्य आणि उद्योग भवनात आयोजित पत्रपरिषदेत गोयल म्हणाले की, न्यूझिलंडने येत्या १५ वर्षात भारतात २० अब्ज डॉलर गुंतवणुकीचे आश्वासन दिले आहे. ही गुंतवणूक निर्मिती, पायाभूत सुविधा आणि सेवा क्षेत्रात होणार आहे. भारतातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी न्यूझिलंडसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे फळे, भाजी, कॉफी, मसाले, धान्य आणि प्रक्रिया केलेले पदार्थ यांना न्यूझिलंडची मोठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

### महापालिका निवडणूक आजपासून अर्ज दाखल सुरु

**सोलापूर :** सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया दि. २३ ते ३० डिसेंबर २०२५, अर्ज छाननी दि. ३१ डिसेंबर २०२५ असून त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत राहणार आहे. दिनांक ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येईल. याच दिवशी अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे. दुसऱ्या दिवशीच १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी व निकाल घोषित करण्यात येणार आहे. दि. १९ जानेवारी २०२६ पर्यंत निकाल शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# दहावी-बारावीच्या केंद्रात सीसीटीव्ही लावण्याची सक्ती

- शिक्षण विभागाचे निर्देश
- गैरप्रकारांवर बसेल आळा

**मुंबई, २२ डिसेंबर**



राज्यातील दहावी-बारावीचे परीक्षा केंद्र असलेल्या शाळांना सीसीटीव्ही बसवण्याची सक्ती करण्यात आली आहे. शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या नव्या निर्देशांनुसार परीक्षा केंद्र असलेल्या शाळांतील प्रत्येक वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी राज्यभरातील हजारो शाळा परीक्षा केंद्र असतात. या केंद्रांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात, या कारणास्तव शिक्षण विभागाने हा निर्देश जारी केले.

या अनुषंगाने मुंबई पश्चिम विभागाच्या शिक्षण निरीक्षकांनी काढलेल्या पत्रकात प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही, केंद्र परिसराभोवती पक्की संरक्षक भिंत, खिडक्यांना मजबूत जाळ्या, प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र बाक तसेच मुलींसाठी पुरेशी स्वच्छतागृहे अशा अटी घालण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद जाहीर न केल्याने शिक्षण संस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय जर शासनाचा असेल, तर त्यासाठीचा निधीही शासनानेच दिला पाहिजे. आमदार, खासदार किंवा जिल्हाधिकारी निधीतून प्रत्येक शाळेला स्वतंत्र आर्थिक मदत देण्यात यावी, असे महामुंबई शिक्षण संस्था संघटनेचे

# आयसीयू-व्हेंटिलेटरसाठीच्या उपचाराचा खर्च सांगणे बंधनकारक

- खाजगी रुग्णालयांच्या मनमानीवर आळा
- केंद्र सरकारचे महत्त्वाचे पाऊल

**नवी दिल्ली, २२ डिसेंबर**

खाजगी रुग्णालयांमध्ये उपचारांच्या नावाखाली होणारी मनमानी आणि अवाजवी बिलिंग रोखण्यासाठी केंद्र सरकारने कडक पावले उचलली आहेत. नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आता आयसीयू आणि व्हेंटिलेटर उपचारांचा संपूर्ण खर्च रुग्णांच्या नातेवाइकांना आधीच स्पष्टपणे सांगणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, व्हेंटिलेटर सुरू करण्यापूर्वी रुग्णाच्या नातेवाइकांकडून लेखी पूर्वसंमती घेणेही अनिवार्य असणार आहे.

जीव वाचवणाऱ्या साधनांचा अनावश्यक किंवा अनैतिक वापर थांबवणे हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

डायरेक्टोरेट जनरल ऑफ हेल्थ सर्व्हिसेस (डीजीएचएस) यांनी खाजगी रुग्णालयांमध्ये व्हेंटिलेटरच्या वापरात पारदर्शकता आणण्यासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बेंबळे येथे बंद घर फोडून अडीच लाखांची घरफोडी



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२२ डिसेंबर-**

टेंभुर्णी पासून जवळच असलेल्या मौजे बेंबळे येथे रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून घरफोडी करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी भीमा कुंडलिक मारकड (वय ५५, व्यवसाय खाजगी नोकरी व व्यापार, रा. महादेव मंदिराचे मागे, बेंबळे) हे शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजता घर बंद करून बाहेर गेले होते. त्यानंतर रविवार २१ डिसेंबर रोजी सकाळी सात वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाज्याचे कुलूप कशाने तरी काढून घरात प्रवेश केला. घरातील कपाट उघडून त्यामधील मौल्यवान ऐवज चोरून नेण्यात आला. या घरफोडीत १५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा नेकलेस (७५ हजार रुपये), प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या पिळ्याच्या अंगठ्या (५० हजार रुपये), १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन (५० हजार रुपये), ३ ग्रॅम वजनाची कानातील फुले-झुबे (१५ हजार रुपये), १ ग्रॅम वजनाची सोन्याची नथ (५ हजार रुपये) तसेच ६० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण २ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. अद्याप कोणताही मुद्देमाल मिळालेला नसल्याचे पोलिसांनी सांगितले. फिर्यादी हे माढा येथून घरी आल्यानंतर चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली.

**टेंभुर्णी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल**

घरफोडीची माहिती उशिरा मिळाल्यामुळे तक्रार दाखल करण्यात काहीसा विलंब झाल्याचेही फिर्यादीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनची पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक पुरुषोत्तम धापटे पो.नलवडे हे करीत आहेत. बेंबळे परिसरात सलग घरफोड्यांच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अज्ञात चोरट्यांचा तातडीने शोध घ्यावा, अशी मागणी बेंबळे भागातून होत आहे.

# राष्ट्रवादीच्या विजयाने बुलेटची पैज अंगलट; आता मोबाईल पण स्वीच ऑफ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२२ डिसेंबर-**

अकलूज नगर परिषदेच्या निवडणुकीत कुणाचे पॅनल लागणार यासाठी दोन मित्रांनी लावलेल्या बुलेटच्या पैजेत पैज हरलेल्या मित्राने पैज अंगलट आल्याने आपला मोबाईल स्विच ऑफ ठेवला आहे तर पैज जिंकलेल्या मित्राचा मात्र मोहिते-पाटील परिवाराने फेटा बांधून सत्कार करीत त्याच्या आत्म विश्वासाला दाद दिली आहे.



अकलूज नगरपरिषदेच्या पहिल्याच निवडणुकीत भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांनी सर्व ताकद पणाला लावली होती. त्यांना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सर्वतोपरी साथ देत, सभा घेत आक्रमक भाषणबाजी करीत निवडणुकीचे वातावरण तापवले होते. या निवडणुकीची केवळ जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात चर्चा होती. याउलट खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व जयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत शांत व संयमाने निवडणुकीची व्यूहरचना करीत १३ प्रभागातील २६ उमेदवार व नगराध्यपदाच्या उमेदवार रेश्मा अडगळे यांच्या विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी केली होती. विजय चौकातील शेवटच्या सभेत त्यांनी आवेशपूर्ण परंतु आपल्या संयमी भाषणाद्वारे अकलूजकरांच्या काळजाला हात घातला होता. २ डिसेंबर रोजी झालेल्या मतदानानंतर अकलूज नगरपरिषदेवर भाजपचा झेंडा फडकणार असे वातावरण निर्माण करण्यात आले व त्यातूनच गोरडवाडीचे भाजपचे कार्यकर्ते बाबा तरंगे यांनी मोहिते-पाटलांचे निष्ठावंत कार्यकर्ते मच्छिंद्र कर्णवर यांच्याबरोबर बुलेटची पैज लावली. या पैजेची चर्चा समाजमाध्यमावर खूप रंगली. या पैजेवर प्रतिक्रिया देताना आ. उत्तमराव जानकर यांनी मात्र एक नव्हे शंभर बुलेटच्या पैजा लावल्या तरी अकलूजमध्ये मोहिते-पाटीलच जिंकणार अशी ग्वाही देत पैजेतील हवाच काढली होती. २१ डिसेंबरला मतमोजणी सुरु असतानाच पहिला निकाल सकाळी ११ वाजता जाहीर झाला. या निकालात मोहिते-पाटील गटाच्या राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवार रेश्मा अडगळे या १३०० मतांनी आघाडीवर तर १४ उमेदवार विजयी असा निकाल जाहीर होताच अकलूजसह तालुक्यात फटाक्यांची आतषबाजी सुरु झाली. तर भाजपच्या ज्या कार्यकर्त्याने बुलेटची पैज लावली त्याचा फोन मात्र स्वीच ऑफ झाल्याचे मच्छिंद्र कर्णवर यांनी सांगितले. कर्णवर म्हणाले, आपली तिसरी पिढी मोहिते-पाटील घराण्याबरोबर काम करीत आहे. मोहिते-पाटील यांचे राजकारण, समाजकारण आम्ही जवळून पाहिले आहे. त्यामुळे अकलूज नगर परिषदेत मोहिते-पाटीलच जिंकणार हा आत्मविश्वास होता. म्हणूनच मी ही पैज लावली. बाबा तरंगे हे जरी भाजपचे काम करीत असले तरी माझे मित्र आहेत.

राजकारण वेगळे व मैत्री वेगळी असते. मला बुलेट मिळाली नाही मिळाली तरी चालेल पण माझा आत्म विश्वास जिंकला याचे मोठे समाधान आहे. मच्छिंद्र कर्णवर यांनी आज सदाशिवनगर येथे मोहिते-पाटील परिवाराची भेट घेतली. त्यावेळी त्यांचा अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांनी फेटा बांधून सत्कार केला. यावेळी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, नंदिनीदेवी मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, शिवंशिका मोहिते-पाटील, संचालक ॲड. सुरेश पाटील, महादेव शिंदे, दादा पाटील, सुनील माने, रामदास करणे, सुधाकर पोळ, मच्छिंद्र गोरड, विष्णुपंत वाघमोडे आदी उपस्थित होते.

# सोनार समाजाचे समाजभूषण पुरस्कार वितरण २८ डिसेंबरला

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

येथील सोनार समाज संस्थेच्या वतीने २८ डिसेंबर रोजी समाज गौरव सोहळा व शासकीय योजना माहिती शिबिराचे आयोजन निर्मिती लॉन्स, विजापूर रोड येथे सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात राज्यभरातून प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून निवडलेल्या ३६ समाजभूषणसह इतर विविध क्षेत्रातील १७ गुणवंतांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे श्री संत नरहरी महाराज मंदिर समितीच्या नवनियुक्त मंडळाचा सत्कार करण्यात येणार आहे. तरी सर्व सोनार बांधवांनी शिबिराचा लाभ घेण्यासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन सोनार समाज संस्थेने केले आहे.

# जनसमर्थ पोर्टलमुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळणे झाले सुलभ

## जिल्हाधिकारी आशिर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

राष्ट्रीयकृत बँकाकडून पिक कर्जासाठी आता ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करण्यात आली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनानुसार जनसमर्थ पोर्टलदवारे आता शेतकऱ्यांना पीक कर्ज घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली असून, २ लाखाच्या मर्यादेपर्यंत पीक कर्जासाठी किसान क्रेडिट कार्डदवारे कर्ज मिळवता येणार आहे. जनसमर्थ पोर्टलच्या सुविधामुळे शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळणेकरिता आता बँकेत जाण्याची आवश्यकता नसून, विनाकारण शेतकऱ्यांना कर्ज नाकारले जाणार नाही व कमीत कमी कालावधीत कर्ज मिळण्यास मदत होईल. या ऑनलाईन प्रकियेकरिता कोणतेही शासकीय शुल्क आकारले जाणार नाही. याकरिता जिल्हा व तालुका प्रशासनाकडून मोहिम राबविण्यात येईल. तसेच याबाबतचे वेळापत्रक तहसिलदार, तालुका कृषि अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक तालुका प्रतिनिधी यांच्या समन्वयाने तयार करण्यात येईल. तरी जास्तीत जास्त पात्र व गरजू शेतकऱ्यांनी जनसमर्थ पोर्टलवर पीक कर्ज मागणी अर्ज करुन किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले आहे.

### अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांकडे शेतकरी आयडी असणे बंधनकारक आहे. आधारकार्ड, आधार कार्डला लिंक असलेला मोबाईल नंबर, बँक पासबुक व पॅनकार्ड (असल्यास) सोबत असावे.

# सिद्धेश्वर बँकेस उत्कृष्ट बँक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

जागतिक सहकार वर्षानिमित्त कॉसमॉस बँक आणि ग्रीन वर्ल्ड यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथील सिद्धेश्वर बँकेस उत्कृष्ट बँक पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार बँकेच्या उत्कृष्ट व्यावसायिक कामगिरीसाठी देण्यात आला आहे.

सक्षम व्यवस्थापन, आर्थिक शिस्त, आणि सभासदांना नियमित लाभांश हे सिद्धेश्वर बँकेचे वैशिष्ट्य राहिले आहे. बँकेच्या वतीने बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभिरे, सरव्यवस्थापक संजय घाळे, तज्ञ संचालक ॲड. धानय्या चिवरी आणि बँकिंग विभागाचे जनरल मॅनेजर राम शर्मा यांनी पुणे येथे पार पडलेल्या सहकार मंथन २०२५ या कार्यक्रमात स्वीकारला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास सहकार आयुक्त दीपक तावरे साखर आयुक्त संजय कोलते, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनासकर आदी मान्यवर उपस्थित होते. सिद्धेश्वर सहकारी बँकेने छोट्या आणि मध्यम उद्योजकांना कर्ज वितरणाद्वारे भांडवल उपलब्ध करून दिले



असून त्यांच्या आर्थिक प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. या सर्व कामगिरीची दखल घेऊन बँकेस प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला आहे. बँकेची स्थापना सहकार महर्षी आणि जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक कै. वि.गु. शिवदारे अण्णा यांनी केली. नुकताच बँकेने सुवर्ण महोत्सव साजरा करत आपल्या यशस्वी प्रवासातील महत्वपूर्ण टप्पा गाठला आहे. सध्या बँकेकडे ५५० कोटी रुपयांच्या ठेवी आणि रु. ३७५ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. मार्च २०२५ अखेर बँकेने रु. ७ कोटी ३१ लाख रुपयांचा निव्वळ नफा कमावला असून सभासदांना ११% लाभांश देण्यात आला आहे. बँकेचा ऑडीट वर्ग अ, CRR १९% आणि निव्वळ NP ०% आहे. ही बँकेच्या आर्थिक आरोग्याची ठोस साक्ष आहे.

मागील तीन वर्षात अनेक नामावंत संस्था, संघटना आणि असोसिएशननी सिद्धेश्वर बँकेला विविध पुरस्काराने गौरविले आहे. याबाबत बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे यांनी बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभिरे, उपाध्यक्षा सुचेता थोबडे, सर्व संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाचे कौतुक केले आहे. बँकेला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल बँकेच्या सभासद, खातेदार, आणि हितचिंतकात समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण आहे.

# मनिषाचा मोबाईल परत मिळण्याचा अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरणात आरोपी मनिषा माने-मुसळे हीचा मोबाईल परत मिळणेचा अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. यात हकीकत अशी की, सदर प्रकरणातील महिला आरोपी मनिषा महेश माने मुसळे ही यातील मयत डॉ. शिरिष वळसंगकर यांचे हॉस्पीटलमध्ये सन २००८ पासून कामास होती तसेच तिच्याकडे हॉस्पीटलचे सर्व व्यवस्थापन सांभाळण्याचे काम होते.

१७ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४.०७ वाजता यातील आरोपी मनिषा महेश माने ऊर्फ मुसळे हीने तिचा ई मेल आयडीवरुन फिर्यादी डॉ. अश्विन वळसंगकर यांचे वडिल मयत डॉ. शिरिष वळसंगकर यांच्या ई मेल आयडीवर मेल पाठविला व त्याची प्रत डॉ. अश्विन वळसंगकर यांच्या ई मेल आयडीवर '' आपणाकडून होत असलेल्या त्रासाच्या बाबतीत'' या विषयाचे पत्र पाठविले. त्या मेलद्वारे पाठविलेल्या पत्रामध्ये आम्ही आरोपी मनिषा महेश-माने मुसळे हीचे अधिकार कापले आहेत, तिचा पगार कमी केला आहे. ''मी दोन्ही मुलांना मारणार आणि इथे हॉस्पीटलमध्ये येऊन पेटवून घेणार आणि त्याला सर्वस्वी जबाबदार माझ्याबद्दल चुकीचे आणि खोटे पसरविले ते स्फाटमधील लोक आणि वळसंगकर कुटुंबिय जबाबदार राहाल''. असा धमकी दिलेला मजकुर आरोपी मनिषा हिने पाठविला होता. आरोपी मनिषा महेश माने ऊर्फ मुसळे हिने केलेल्या खोटया घाणरेडा आरोपांमुळे व्यथित होवून मयत डॉ. शिरीष वळसंगकर यांनी ''ज्या माणसांला मी शिकवून आज . मुसळे केले आहे आणि चांगला पगार देतो आहे तिने खोटारडे आणि घाणरडे आरोप करून मला धमकावले आहे. त्याचे मला अतिव दुख आहे म्हणून मी माझे जीवन संपत आहे'' असे लिहून त्याखाली मयत डॉ. शिरीष वळसंगर यांनी शिरीष अशी मराठीत स्वाक्षरी केलेली चिठ्ठी लिहून स्वतच्या बेडरूमला अटाच असलेल्या बाथरूम मध्ये स्वतचे परवाना असलेल्या पिस्टल मधून कानशिलामध्ये गोळी घालून घेवून आत्म हत्या करण्यास प्रवत्त असल्याने यातील



**डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

आरोपी मनिषा महेश माने ऊर्फ मुसळे हिने गुन्हा केल्याचे तोहमत झाले असल्याने १९ एप्रिल २०२५ रोजी यातील आरोपीमाने-मुसळे हिला अटक करण्यात आली. त्यावेळी अटक पंचनामा तयार करताना तिच्या ताब्यातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल सीमकार्डसह जप्त करण्यात आला होता व तो मोबाईल गुन्हयाच्या तपासकामी न्यायालयात हजर करण्यात आला. सदर मोबाईल व सीकार्ड हे मनिषा माने-मुसळे हिला परत मिळावे यासाठी दि.०२/०७/२०२५ रोजी तीने मा. न्यायालयात अर्ज दाखल केला होता. यावर मा. न्यायालयाने पोलीस प्रशासनाचे म्हणणे मागविले तसेच सदर प्रकरणात म्हणणे सादर करत असताना सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड डॉ. राजपूत यांनी तीव्र हरकत घेवून म्हणणे सादर केले. युक्तिवाद करतेवेळी आरोपीने न्यायालयास विनंती केली की, हा मोबाईल हा अटी व शर्तीवर परत आरोपीस मिळावा अशी विनंती केली. यावर सरकारपक्षातर्फे युक्तिवाद करतेवेळी ॲड. डॉ. राजपूत यांनी न्यायालयाच्या निदर्शनास बाबी आणून दिल्या की, हा मोबाईल आरोपीकडून पंचनाम्याद्वारे तपासकामी जप्त करण्यात आला. सदर मोबाईल हा आरोपीच्या मालकीचा आहे. या संदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयामध्ये आरोपी याने सादर केलेला नाही. परिणामी, जप्त केलेला मोबाईल आरोपीच्या स्वाधीन करता येणार नाही. न्यायालयाने हा अर्ज मंजूर केला तर यातील आरोपी हा महत्वाचा पुरावा नष्ट करु शकते, न्यायालयाने आरोपी मनिषा-मुसळे हीचा मुद्देमाल परत मिळण्यासाठीचा अर्ज नामंजूर केला. या प्रकरणात सरकारपक्षातर्फे ॲड. डॉ. प्रदिपसिंग राजपूत, जिल्हा सरकारी वकील यांनी काम पाहिले तर आरोपीतर्फे ॲड. पी. पी. नवगिरे यांनी काम पाहिले.

## आजपासून अजित पवार राष्ट्रवादी घेणार इच्छुकांच्या मुलाखती!

**सोलापूर, दि.२२ डिसेंबर**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर सोलापुरातील अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून मंगळवार दि.२३ डिसेंबर रोजी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी दिली. मंगळवार दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून जुनी मिल कंपाउंड येथील राष्ट्रवादी भवनात इच्छुकांच्या मुलाखतीला सुरुवात होणार आहे. राष्ट्रवादीकडे तब्बल ४५० इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. कोणत्या प्रवर्गातील इच्छुक आहात त्याचे जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत सोबत घेऊन यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



# गुरुवारपासून राज्यस्तरीय श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर**

श्री सिद्धेश्वर देवस्थान यांच्यावतीने श्री सिद्धेश्वर कृषी प्रदर्शन आयोजित केले आहे. यंदा प्रदर्शनाचे ५५ वे वर्षे आहे. या निमित्ताने होम मैदान येथे सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत दि.२५ ते २९ डिसेंबर या ५ दिवसांच्या कालावधीत होणाऱ्या कृषी प्रदर्शनात ३०० स्टॉलचे नियोजन करण्यात आले आहे.

कृषी विभाग, आत्मा, जिल्हा परिषद सोलापूर, महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या विशेष सहकार्याने व स्मार्ट एक्स्पो ग्रुप च्या व्यवस्थापन अंतर्गत भरविण्यात येत आहे. तसेच कृषी संशोधन केंद्र, सोलापूर डाळिंब संशोधन केंद्र, रब्बी ज्वारी संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर व मोहोळ विभाग, रेशीम खादी ग्रामोद्योग, पशुसंवर्धन, सामाजिक वनीकरण व राष्ट्रीयकृत बँका, नाबार्ड, कृषी महाविद्यालय, कृषी स्टार्टअप उद्योजक, नवा उद्योजक, कृषी यांत्रिकीकरण, फळ रोपवाटिकाधारक, साखर कारखाने यांच्या सहभागाने आयोजित केले जाणार असल्याचे श्री सिद्धेश्वर देवस्थान बंद कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी आणि कृषी प्रदर्शनाचे अध्यक्ष गुरुराज माळगे यांनी सांगितले. या प्रदर्शनात रोझ क्लब सोलापूर यांचे विशेष सहकार्यातून भव्य राज्य गुलाब पुष्प प्रदर्शन, ५०० हून अधिक विविध गुलाब पुष्प एकाच ठिकाणी पाहण्यास मिळणार आहेत. महाराष्ट्रातील सोलापूर, नाशिक, पुणे बाएफ संस्था यांचेकडील शेतकऱ्यांनी स्वतः तयार केलेले ५०० प्रकारचे दुर्मिळ देशी बी-बियाणे प्रदर्शित करणार आहेत. तसेच शेतकऱ्यांना विक्रीसाठीही उपलब्ध असणार आहेत. २६ डिसेंबर रोजी गाय, बैल, वासरू, म्हैस अशा विविध पशु प्रजाती तसेच देशी गोवंश मधील विविध प्रजातीचे भव्य प्रदर्शन व स्पर्धा.

२७ डिसेंबर रोजी ३५हून अधिक विविध देशी व विदेशी प्रजातींच्या श्वानांचे प्रदर्शन (डॉग-शो) व कॅटशो स्पर्धा. तसेच याचदिवशी पुष्प रचना स्पर्धा. २८ डिसेंबर रोजी विविध प्रकारचे पाळीव मांजरांचे प्रदर्शन व स्पर्धा संपन्न होणार आहेत. या भव्यदिव्य प्रदर्शन पाहण्यासाठी शेतकऱ्यांनी तसेच नागरिकांनी भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस नीलकंठ कोनापुरे, गुरुराज माळगे, विश्वनाथ लब्बा, मल्लिनाथ मसरे, विलास कारभारी, विजयकुमार बरबडे, पशुपती माशाळ, रतन रिक्के आदींसह पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

# सोलापूर शहर काँग्रेसकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सुरु

## ढोलताशे, हलगींच्या कडकडाटात प्रचंड उत्साहात १५० इच्छुकांनी दिल्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर काँग्रेस पक्षाच्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींची प्रक्रिया आज उत्साहात सुरू झाली. ढोलताशे, हलगींच्या कडकडाटात प्रचंड उत्साहात मुलाखती पार पडल्या. खा. प्रणिती शिंदे व शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे आणि इतर नेतेमंडळी यांच्या

उपस्थितीत आज पहिल्या दिवशी १५० इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या आयोजनाखाली प्रभाग क्रमांक १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ०९, १०, ११, २०, २१, २३, २४, २५ व २६ मधील इच्छुकांच्या मुलाखती झाल्या. मुलाखतींना मोठ्या संख्येने इच्छुक उमेदवारांनी उपस्थिती लावली.



विशेष म्हणजे, इच्छुक उमेदवार आपल्या समर्थकांसह ढोलताशे, हलगींच्या कडकडाटात आणि प्रचंड उत्साहात मुलाखतीस दाखल झाले होते. काँग्रेस भवन परिसरात दिवसभर उत्साही वातावरण पाहायला मिळाले. या मुलाखतींसाठी खा. प्रणिती शिंदे, सोलापूर शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे, माजी आ. प्रकाश यलगुलवार, माजी आ. विश्वनाथ चाकोते, माजी महापौर संजय हेमगड्डी, आरिफ शेख, सुशीला आबुटे, अलका राठोड, प्रवक्ते व माजी नगरसेवक अशोक निंबर्गी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, महिला काँग्रेसचे अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, ब्लॉक अध्यक्ष उदयशंकर चाकोते, देवा गायकवाड, अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष जुबेर कुरेशी, प्रदेश चिटणीस श्रीशैल रणधिरे, राहुल वर्धा, शकील मौलवी, सेवादलाचे अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, वक्ता सेलचे जिल्हा अध्यक्ष नागनाथ कदम, व्हीजेएनटी सेलचे अध्यक्ष युवराज जाधव, ब्लॉक अध्यक्ष तिरुपती परकीपंडला, लक्ष्मीकांत साका, अब्दुल खलील मुल्ला आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उमेदवारांना काँग्रेस पक्षाची विचारसरणी, मूल्ये आणि लोककल्याणकारी धोरणे घरोघरी पोहोचवण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या.जनतेशी थेट संवाद साधून विश्वास संपादन करणे, संघटन मजबूत ठेवणे आणि पक्षाची ध्येयधोरणे प्रभावीपणे मांडणे यावर विशेष भर देण्यात आला.या मुलाखतींच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाकडून सक्षम, लोकाभिमुख, विकासाभिमुख दृष्टिकोन असलेले आणि पक्षाच्या विचारधारेशी निष्ठावान उमेदवार निवडण्याचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला.

दुसऱ्या दिवशी मंगळवार दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून उरलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार असून, संघटन बळकट करून जनतेशी थेट जोडलेले उमेदवार देण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध असल्याचे यावेळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी स्पष्ट केले. अनेक माजी नगरसेवकांसह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, उच्च शिक्षित युवकयुवती तसेच सामाजिक व सहकार क्षेत्रातील इच्छुकांनी उमेदवारी मागितली आहे.


### महापालिका निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज : खा. शिंदे

सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम, प्रामाणिक व लोकाभिमुख नेतृत्व निवडण्याच्या दृष्टीने ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असून, काँग्रेस पक्ष आगामी महापालिका निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज असल्याचे खा. प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



स्वयंसेवकाचे सर्वांत मोठे काम आहे स्वयंसेवक बनवणे, कार्यकर्ता बनवणे. हे कार्यकर्त्यांचे सर्वांत मोठे काम आहे. संघामध्ये येऊन आपण तर स्वयंसेवक बनलात, परंतु समाजात आपल्या अनेक बांधवांना संघाची ओळख नाही, त्यांना शाखेत आणून स्वयंसेवक बनवणे ही आपल्या सर्वांची मोठी जबाबदारी आहे.

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## सत्तेसाठी ठाकरे बंधूंना 'ममु'चा आधार

**मुंबई** - राज्यातील नगरपालिका आणि नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या आलेल्या निकालामुळे महाविकास आघाडीला जोरदार धक्का बसला आहे. त्यामुळेच मुंबई महानगर पालिकेची सत्ता हातात ठेवण्यासाठी मराठी आणि मुस्लिम म्हणजेच 'ममु'चा आधार घेण्यावर ठाकरे बंधूंचा अधिक जोर असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. राज्यातील नगरपरिषद आणि नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जनतेने महायुतीच्या बाजूने भरभक्कम असा कौल दिला आहे. या निवडणुकीत कुठेच न दिसणारे ठाकरे बंधू यांनी केवळ मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे.

## पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेसाठी ज्ञान शक्तिशाली साधन

**मुंबई** - देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सची करण्यासाठी ज्ञान हे सर्वांत शक्तिशाली साधन आहे, असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी सोवारी येथे केले. कोणत्याही देशाचे भविष्य हे त्याच्याकडे असलेल्या भविष्यवेधी तंत्रज्ञानाच्या प्रकारावर अवलंबून असते, असे गडकरी यांनी मुंबई इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले. आयआटी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी देशाच्या विकास आणि प्रगतीमध्ये मोठे योगदान दिले आहे.

# विरोधकांचे बालेकिल्ले उद्ध्वस्त

## ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन ■

◆ **नागपूर, २२ डिसेंबर**

जिल्ह्यातील २७ नगर परिषदांमध्ये नगराध्यक्षपदांची निवडणूक पार पडली. त्यापैकी २२ ठिकाणी भाजपाने बाजी मारली. भाजपाचा हा अभूतपूर्व विजय आहे. भारतीय जनता पक्ष आणि महायुतीला नगरपंचायती आणि नगरपरिषदा निवडणुकांमध्ये मोठे जनमत प्राप्त झाले आहे. या निवडणुकीत विरोधकांचे बालेकिल्ले उद्ध्वस्त झाले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर जिल्ह्यातील नवनिर्वाचित नगराध्यक्षांच्या सत्कारप्रसंगी रामगिरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, डॉ. राजीव पोतदार, अरविंद गजभिये, आमदार प्रवीण दटके, आमदार चरणसिंग ठाकूर, आमदार समीर मेघे, टेकचंद सावरकर, आनंदराव राऊत, माजी आमदार अशोक मानकर, सुधीर पारवे, राजू पारवे, सुधाकर कोहळे, मनोहर कुंभारे आदी उपस्थित होते.



**महाविकास आघाडीचा सफाया**

नगरपंचायती आणि नगरपरिषदा निवडणुकांमध्ये भाजपाने बाजी मारली आहे. राज्यात भारतीय जनता पार्टी हा पहिल्या क्रमांकाचा पक्ष झाला असून जवळपास १२९ नगराध्यक्ष हे भाजपाचे निवडून आले आहेत. एकूण नगराध्यक्षांपैकी ७५ टक्के नगराध्यक्ष महायुतीचे आहेत. या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीचा सफाया झाला आहे, असेही ते म्हणाले. ■

भारतीय जनता पार्टीला विदर्भासह राज्यात नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांमध्ये प्रचंड यश मिळाले आहे. शहरी आणि निमशहरी भागांबरोबरच ग्रामीणमध्येही भाजपाने यशाचा आलेख उंचावला आहे. प्रथम लोकसभा, नंतर विधानसभा आणि आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भाजपाने लक्षणीय यश प्राप्त केले आहे.

**नागरिकांनी विश्वास दाखविला**

महाविकास आघाडीचा सफाया करीत भारतीय जनता पार्टी हा सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. भाजपाने नगरसेवक निवडून आणण्याचा नवा विक्रम केला आहे. २०१७ मध्ये भाजपाचे १६०२ नगरसेवक होते. यावेळी ३ हजार ३२५ नगरसेवक निवडून आले आहेत. एकूण नगरसेवकांच्या तुलनेत ४८ टक्के नगरसेवक भाजपाचे निवडून आले आहेत. नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी भाजपावर विश्वास दाखविला आहे. अर्थात या निवडणुकांमध्ये प्रचंड जनसमर्थन आम्हाला मिळाले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विश्वास आणि विकासाचे राजकारण केले आहे. त्यामुळे प्रत्येक निवडणुकीत भाजपाला जनतेकडून भरपूर प्रतिसाद मिळतो आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# ज्येष्ठ संघ प्रचारक लक्ष्मीनारायण भाला यांना आंतरराष्ट्रीय सन्मान

## लंडनस्थित न्यायाधीश परिषदेचा शांतता पुरस्कार प्रदान

◆ **चिखली, २२ डिसेंबर**

मूळचे चिखली येथील व सध्या दिल्लीत वास्तव्यास असलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक लक्ष्मीनारायण भाला ऊर्फ 'लक्खीदा' यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा सन्मान प्राप्त झाला आहे. लंडन येथे मुख्यालय असलेल्या आंतरराष्ट्रीय न्यायाधीश परिषदेतर्फे २०२५ चा 'राष्ट्रीय कायदा दिन पुरस्कार' तसेच 'जागतिक शांततेसाठीचा विशेष पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.

थायलंडची राजधानी बँकॉक येथे २० डिसेंबरला पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय समारंभात लक्खीदांनी हे दोन्ही पुरस्कार स्वीकारले.

समाज घडविणे, शिक्षण, सेवा कार्य, राष्ट्रजागरण तसेच वैचारिक प्रबोधनाच्या क्षेत्रात ५८ वर्षे अविरत कार्य केल्याबद्दल आणि भारतीय संविधान या विषयावर लिहिलेल्या दोन महत्त्वपूर्ण पुस्तकांमुळे त्यांच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला.दरम्यान, नुकतेच ६ व ७ डिसेंबर रोजी चिखली येथे पार पडलेल्या सहस्रचंद्र दर्शन सोहळ्याच्या कार्यक्रमात या पुरस्कारांची अधिकृत घोषणा करण्यात आली होती. या वेळी आंतरराष्ट्रीय न्यायाधीश परिषदेचे अध्यक्ष व सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ वकील अदिशचंद्र अग्रवाल यांनी व्यासपीठावरून लक्खीदांच्या कार्याचा गौरव करीत पुरस्कार जाहीर केला होता. हा सन्मान भाला कुटुंबीयांसह चिखली वासीयांसाठी, बुलढाणा जिल्ह्यासाठी आणि देशासाठी अभिमानास्पद असल्याची भावना व्यक्त होत आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*




आंतरराष्ट्रीय समारंभात जागतिक शांतता पुरस्कार प्रसंगी उपस्थित लक्ष्मीनारायण भाला व मान्यवर

# माणिकराव कोकाटेंना 'सुप्रीम' दिलासा

◆ **नवी दिल्ली, २२ डिसेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार माणिकराव कोकाटे यांना सुप्रीम कोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. तीन ते चार दिवसांपूर्वी जिल्हा न्यायालयात झालेल्या सुनावणीत माणिकराव कोकाटे यांना सदनिका लाटल्याप्रकरणी दोन वर्षांच्या तुरुंगावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती.



या निर्णयानंतर माणिकराव कोकाटे यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली. सोमवारी यावर सुनावणी पार पडली असून माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे माणिकराव कोकाटे यांची आमदारकी अपात्र ठरणार नसून हा त्यांच्यासाठी मोठा दिलासा असणार आहे.

तीन दशकांपूर्वीच्या एका सदनिका वाटप प्रकरणातील अनियमिततेचा ठपका ठेवत नाशिक जिल्हा न्यायालयाने तीन-चार दिवसांपूर्वी माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली होती. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार, दोन किंवा त्यापेक्षा अधिक वर्षांची शिक्षा झाल्यास संबंधित लोकप्रतिनिधीची आमदारकी किंवा खासदारकी तत्काळ रद्द केली जाते. या निर्णयामुळे कोकाटे यांचे विधिमंडळ सदस्यत्व धोक्यात आले होते.


जिल्हा न्यायालयाच्या या निर्णयानंतर माणिकराव कोकाटे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने त्यांच्या अटकेला स्थगिती दिली असली, तरी दोषसिद्धीला स्थगिती दिली नव्हती, ज्यामुळे त्यांच्या आमदारकीवर अपात्रतेचे संकट कायम होते. अखेर कोकाटे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. सोमवारच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देत कोकाटे यांना दिलासा दिला. ◀*(वृत्तसंस्था)*

# भगवद्गीता धार्मिक ग्रंथ नव्हे, नीतिशास्त्र

## मद्रास उच्च न्यायालयाचे निरीक्षण

**चेन्नई, २२ डिसेंबर**

भगवद्गीता हे धार्मिक ग्रंथ नाही. ते एक नैतिक आणि नीतीशास्त्र आहे. भारतीय संस्कृतीचा हा एक अविभाज्य भाग असून त्याला कोणत्याही एका धर्माच्या चौकटीत मर्यादित ठेवता येणार नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मद्रास उच्च न्यायालयाने गीता आणि योग शिक्षण देणाऱ्या ट्रस्टची फॉरेन कॉन्ट्रिब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट (एफसीआरए) अंतर्गत नोंदणी नाकारण्याचा निर्णय रद्द केला. कोई तूर येथील आर्ष विद्या गुरुकुलमचे स्वामी दयानंद सरस्वती यांच्या शिष्यांनी २०१७ मध्ये आर्ष विद्या परंपरा या ट्रस्टची स्थापना केली होती. हा ट्रस्ट जगभरातील विद्यार्थ्यांना वेदांत, संस्कृत, हठयोग आणि योग तत्त्वज्ञान शिकवण्याचे काम करतो. तसेच प्राचीन हस्तलिखितांचे जतन करण्याचे कार्यही या संस्थे र्फत केले जाते. परदेशी देणग्या स्वीकारण्यासाठी या ट्रस्टने फॉरेन कॉन्ट्रिब्युशन (रेग्युलेशन) ॲक्ट २०१० (एफसीआरए) अंतर्गत नोंदणीसाठी अर्ज केला होता. मात्र, केंद्रीय गृह मंत्रालयाने हा अर्ज फेटाळून लावला होता. गृह मंत्रालयाने हा अर्ज फ`टाळताना दोन प्रमुख कारणे दिली होती. पहिले म्हणजे, ट्रस्टने पूर्वपरवानगीशिवाय परदेशी निधी स्वीकारला आणि तो दुसऱ्या संस्थेकडे वर्ग केला. दुसरे म्हणजे, ही संस्था धार्मिक स्वरूपाची असल्याचे सरकारचे मत होते. या निर्णयाविरोधात संस्थेने मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती




निधी वर्ग केल्याचा आरोप अस्पष्ट लाईव्ह लॉने दिलेल्या रिपोर्टनुसार, आर्ष विद्या गुरुकुलम्ने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती जी. आर. स्वामीनाथन यांच्या एकलपीठासम ोर सुनावणी झाली. ट्रस्टने परदेशी निधी घेतल्याबद्दलचा गुन्हा आधीच दंड भरून निकाली निघाला आहे. तसेच हा निधी अमेरिकेतील ट्रस्टच्या संस्थापकाकडूनच आला होता, त्याम ुळे त्याचा उगम संशयास्पद नाही. निधी वर्ग केल्याचा आरोप अस्पष्ट असून त्याबाबत ट्रस्टला कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती, असे न्यायमूर्ती स्वामीनाथन यांनी स्पष्ट केले.

**संस्थेला धार्मिक ठरवणे चुकीचे**

केवळ भगवद्गीता शिकवली जाते म्हणून संस्थेला धार्मिक ठरवणे चुकीचे आहे. न्यायमूर्ती स्वामीनाथन म्हणाले की, भगवद्गीता भारतीय सभ्यतेचा भाग आहे. राज्यघटनेच्या कलम ५१-ए नुसार आपल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा जपणे हे कर्तव्य आहे. गीता हा नैतिक विज्ञानाचा ग्रंथ असून त्याने स्वातंत्र्यलढ्यात अनेक नेत्यांना प्रेरणा दिली आहे. योग हा सार्वत्रिक आहे, त्याकडे धर्माच्या चष्म्यातून पाहता येणार नाही. तसेच वेदांत शिकवणे हे देखील केवळ धार्मिक कृत्यात मोडत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## टीव्ही चॅनेलवर प्रति तास फक्त १२ मिनिटे जाहिरात

**नवी दिल्ली** - भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ट्राय) टेलिव्हिजन प्रसारकांना प्रति तास १२ मिनिटांच्या जाहिरातीच्या मर्यादेचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, ही जाहिरात मर्यादा न्यायालयात प्रलंबित आहे, तरीही ती लागू करण्यात आली आहे. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या कारणे दाखवा नोटीसनंतर, ट्रायने अलिकडील बैठकीत आपला पवित्रा पुन्हा व्यक्त केला आणि अंतिम न्यायालयाच्या निर्णयापर्यंत हा नियम वैध राहील असे सूचित केले. ट्रायच्या एका अधिकाऱ्याच्या मते, हा नियम सध्या लागू आहे आणि प्रसारकांनी त्याचे पालन करणे आवश्यक आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने दंडात्मक कारवाईला स्थगिती दिली आहे, परंतु नियमावर कोणतीही स्पष्ट स्थगिती नाही.

# भाजपाच 'शक्तिमान'चा प्रभाव 'मनपा'च्या जागावाटपावर

## ● शहरातील तीनही आमदारांचा वाढणार सहभाग; मित्रपक्ष अधिक जागांवर अडले तर महायुतीचे त्रांगडे; राष्ट्रवादी स्वबळाच्या तयारीत!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

**नगरपालिका निवडणुकीत महायुतीचा डंका वाजला असला तरी विजयाच्या आकडेवारीच्या गणितात भाजपाच शक्तिमान असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. गत विधानसभा निवडणुकीत १३३ आमदार विजयी करून भाजपाने राज्यात मोठे यश मिळवल्यानंतर आता नगरपालिकांच्या निवडणुकीत राज्यातील १३० नगरपरिषदा जिंकत तब्बल ३ हजार ३२५ नगरसेवक निवडून आणण्याचा इतिहास भाजपाने घडवला. या दैदिप्यमान यशाचा परिणाम सध्या सुरु असलेल्या महापालिका निवडणुकीवर पडला नाही तर नवलच. विरोधी महाविकास आघाडीसाठी भाजपाचे हे यश पचनी पडण्यासारखे नाहीच पण मित्रपक्षांना देखील मनातून धाकधूक वाढविणारेच आहे. 'थ्री इडियट' या सिनेमात एक डॉयलॉग आहे तो असा की, 'दोस्त फेल हो जाये तो दुख होता है लेकीन जब दोस्त पहिले नंबरसे पास होता है तो और भी दुख होता आहे'. भाजपाच्या या यशाचा प्रभाव महापालिका निवडणुकीच्या जागावाटपात प्रकर्षाने दिसणार आहे. मित्रपक्षांनी मान्य न केल्यास महायुतीचे त्रांगडे होणार आहे. सोलापूर महापालिकेत एकटा भाजपा ७५ पार करेल, असा नारा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केला आहे. एकूण १०२ नगरसेवक असताना भाजपाला ७५ पारसाठी किमान १०० जागा लढवाव्या लागतील मग मित्रपक्षांसाठी काय २ जागा सोडणार का? असा प्रश्न निर्माण होतो आणि हाच महायुती होण्यामधील कळीचा मुद्दा ठरणार, हे निश्चित आहे.**

सोलापूर महापालिकेत नगरसेवकांच्या एकूण १०२ जागा आहेत. २०१७ ते २०२२ या पंचवार्षिकमध्ये म हापालिकेतील पक्षीय बलाबल याप्रमाणे होते; भाजपा ४९, एकत्र शिवसेना २१, काँग्रेस १४, एमआयएम ९, एकत्र राष्ट्रवादी ४, बसपा ४ आणि माकप १. सन २०२२ पासून महापालिकेवर प्रशासकराज आहे. तीन वर्षांनंतर प्रशासकराज संपून सार्वत्रिक निवडणुकांचा बिगुल वाजला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका म्हणून ओळखल्या जातात. तीन वर्षांच्या गॅपनंतर या निवडणुका होत असल्याने इच्छुकांम ध्ये मोठा उत्साह पहावयास मिळत आहे. सर्वच राजकीय पक्षांकडे उमेदवारीसाठी इच्छुकांनी रांगा लावल्याचे चित्र आहे. गतवेळी महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता होती. आतादेखील भाजपालाच पोषक वातावरण असल्याने इच्छुकांचा मोठा ओढा भाजपाकडे आहे. इतर पक्षातून भाजपात येणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने पक्षातील निष्ठावंतांमध्ये उमेदवारीवरुन चिंतेचे वातावरण आहे. भाजपाचा मित्रपक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्याकडून देखील जागा वाटपात सन्मानाने अधिक जागा मिळण्यासाठी भाजपावर दबावतंत्राचा वापर सुरु आहे. नगरपालिका निवडणुकीत तीन नगराध्यक्ष विजयी झाल्यानंतर मित्रपक्ष शिवसेनेचा सूर बदलला असून महापालिकेत निम्म्या म्हणजेच ५० जागा मिळाल्या पहिजेत, असा आग्रह त्यांच्याकडून धरला जात आहे. विशेष म्हणजे, पालकमंत्री गोरे यांनी यंदा भाजपा महापालिकेत ७५ पार असेल, अशी सिंहगर्जना केलेली आहे. एकूण १०२ नगरसेवक संख्या असलेल्या महापालिकेत ७५ पारसाठी भाजपाला किमान १०० जागा तरी लढवाव्या लागतील. मग मित्रपक्षांना जागा वाटपात कसा सन्मान मिळणार? याची उत्सुकता आहे. शिवसेना शिंदे गटाकडूनच ५० जागांची मागणी आताच होत आहे. अजित पवार राष्ट्रवादी तर सध्या जागावाटपाच्या चर्चेत देखील नसल्याचे चित्र आहे. आरपीआय आठवले




गटाने देखील भाजपाकडे काही जागा मागितल्या आहेत. एकीकडे पालकमंत्री भाजपा ७५ पार करणार असल्याचा नारा देतात तर दुसरीकडे महायुतीतील मित्रपक्षांनाही सोबत घेण्याचे सूतोवा करतात. त्यामुळे पालकमंत्री जागावाटपाचा तिढा कसा सोडवणार? हा जटील प्रश्न आहे. त्यातच भर म्हणजे सोलापूर शहरातील भाजपाचेच दोन आमदार हे मंत्री राहिलेले असून अनुभवी राजकारणी आहेत. जागा वाटपात त्यांच्या मताला देखील महत्व दिले जाणे क्रमप्राप्त आहे. गतवेळी महापालिकेत आ.विजयकुमार देशमुख यांच्या गटाचे ३५ तर आ.सुभाष देशमुख गटाचे १४ नगरसेवक होते. त्यांच्या गटाच्या विद्यमान नगरसेवकांना तरी संधी मिळावी, असा जोर त्यांचा असणार हे नक्की आहे. शहरातील भाजपाचे तिसरे आमदार देवेंद्रे कोठे हे पूर्वी शिवसेनेचे होते. त्यांच्या बरोबर भाजपात आलेल्या नगरसेवकांना आणि आणखीन काही इच्छुकांना उमेदवारीसाठी आ.कोठे आग्रही असणार आहेत. शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्याकडूनही काहींना उमेदवारीचा शब्द दिलेला असणार आहे. तसेच पालकमंत्र्यांनी काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने आणि काही माजी नगरसेवकांसह अनेकांना पक्षप्रवेश दिलेले असल्याने त्यांचाही उमेदवारीसाठी क्लेम असणार आहे. काँग्रेसचा गटनेता राहिलेला एक माजी नगरसेवक आणि शहर काँग्रेसचा मोठा पदाधिकारी भाजपाच्या वाटेवर असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. महापालिकेत असलेल्या १०२ जागांचे वाटप भाजपातंर्गत करतानाच पालकमंत्र्यांसह भाजपाच्या नेत्यांची दमछाक होणार आहे.

विधानसभेला एकही आमदार जिल्ह्यात निवडून न आणता आल्याने बॅकफूट असलेली मित्रपक्ष शिवसेना नगरपालिकेत मिळालेल्या यशानंतर आता फ्रंटवर येवून जागा मागणीत अग्रेसर आहे. जागा वाटपात भाजपाला आता शिवसेनेसमोर झुकावे लागण्याची भाषा बोलली जात आहे. महापालिकेच्या एकूण १०२ जागांपैकी ५० जागांची मागणी मित्रपक्ष शिवसेना करत असल्याने भाजपाची चिंता वाढणार अथवा भाजपा महायुती ऐवजी केवळ मित्रपक्ष रिपाइं आठवले गटाला सोबत घेवून स्वबळावर लढण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण त्याशिवाय पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भाजपा ७५ पार हा नारा तडीस नेता येणार नाही. भाजपाचा मोठा नारा, मित्रपक्ष शिवसेनेकडून ५० जागांची मागणी आणि रिपाइंचा वाटा हे सर्व पाहता मित्रपक्ष अजित राष्ट्रवादीने परिस्थिती ओळखून स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरु केली आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे, माजी पालकमंत्री दत्ता भरणे यांच्या माध्यमातून महापालिकेच्या सर्व जागा लढण्याची रणनीती राष्ट्रवादी आखत आहे. काही महापालिकांमध्ये शरद पवार राष्ट्रवादी आणि अजित राष्ट्रवादी एकत्र आल्यास आणि त्यात सोलापूरदेखील असल्यास नवल वाटायला नको.



**पक्षातंर्गत मतभेद आणि निष्ठावंतांची नाराजी भाजपाची चिंता वाढवणारी**

माजी मंत्री आणि विद्यमान आमदार असलेले दोन देशमुख यांना महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेतून दूर ठेवता येणार नसल्याचे पक्षाच्या लक्षात आल्याने महापालिका निवडणूक प्रमुखपदी नियुक्त केलेल्या आ.सचिन कल्याणशेट्टी यांना या पदावरुन मुक्त करण्यात आले आहे. काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांच्या पक्षप्रवेशावरुन काही मतभेद आहेत. आ.विजयकुमार देशमुख आणि शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्यात फारसे सख्य नाही. आता दोन्ही देशमुख एकत्रपणे निवडणूक रणनीती आखत असल्याने पालकमंत्री गोरे यांना देखील देशमुखांच्या गाठीभेटी घ्याव्या लागत आहेत. नगरपालिका निवडणुकीत अपेक्षित यश भाजपाला मिळाले नसल्याची प्रांजळ कबुली पालकमंत्री गोरे देत आहेत. त्यामुळे भाजपा ७५ पार हा नारा पूर्ण करण्यासाठी मित्रपक्ष नसले तरी पक्षातील दोन्ही देशमुख आणि निष्ठावंतांची मर्जी राखावी लागणार, हे मात्र कटूसत्य आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# पराभवाच्या परंपरेचे पाईक!

प्रत्येक राजकीय पक्षाच्या कार्यशैलीचे काही नेमके वैशिष्ट्य, वेगळेपण असते. काही राजकीय पक्ष देशाच्या, समाजाच्या शाश्वत हिताकरिता सातत्याने प्रयत्न करीत असतात, तर काही ज्या नेत्यांच्या जिवावर अस्तित्व जपतात, त्यांच्या गोतावळ्यापुरता विचार करीत असतात. अशा पक्षांनी नेमके कोणाच्या हिताचे राजकारण केले, त्यातून स्वत: काय कमावले आणि जनतेस काय दिले याचा लेखाजोखा मांडताना, हे दोन फरक स्पष्टपणे समोर येतात. महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेने आपल्या सहा दशकांच्या राजकारणातून नेमके काय कमावले, काय गमावले आणि जनतेस नेमके काय दिले याचा लेखाजोखा कधीतरी त्रयस्थपणे मांडला जायला हवा. आपले सर्व पूर्वग्रह, सहानुभूती किंवा मतभेद बाजूला ठेवून या पक्षाच्या वाटचालीकडे पाहिल्यास, सहा दशकांच्या राजकारणात हा पक्ष वाटचालीच्या काही पावलांवर पुरता फसत गेल्याचे दिसते. या पक्षाच्या स्थापना काळात बाळासाहेबांच्या सोबत असलेल्या नेत्यांच्या पहिल्या फळीतील महत्त्वाचे नेते मानल्या जाणाऱ्या मनोहर जोशी यांनी एका संशोधन प्रबंधातून हा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्यामागे संशोधकाचा त्रयस्थपणा नव्हता. म्हणूनच, शिवसेनेच्या भविष्यकाळाविषयीचे भाकीत करताना त्यांनीही समाजातील काही मान्यवरांच्या मतांचा आधार घेतला. जोपर्यंत बाळासाहेबांची पुण्याई शिवसेनेच्या पाठीशी आहे आणि बाळासाहेबांचे कर्तृत्व पाहिलेली पिढी आहे, तोवर शिवसेनेचे राजकारण प्रभावी राहील आणि पुढे ही पुण्याई कमी होत जाईल, असे परखड भाकीत त्याच पुस्तकात एका ज्येष्ठ व अनुभवी राजकीय निरीक्षकाने नोंदविले आहे. आज उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या गेल्या काही वर्षांच्या वाटचालीकडे मागे वळून पाहताना हे भाकीत खरे ठरत असल्याचे दिसून येते. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद-पंचायतींच्या निवडणुकांतील निकालांनी बाळासाहेबांचा वारसा सांगणाऱ्या उद्धव ठाकरे यांना त्यांच्या नेतृत्वाची आणि महराष्ट्राच्या राजकारणातील त्यांच्या पक्षाची जागा दाखवून दिली आहे. योग्य राजकीय निर्णय घेऊन व भूतकाळातील असंख्य चुकांचे ओझे उतरवून वेळीच दुरुस्ती केली नाही तर बाळासाहेबांचा राजकीय वारस म्हणून अभिमान मिरविण्याजोगे त्यांच्या गाठीशी काही उरलेले नसेल हे स्पष्ट दिसू लागले आहे.

निवडणुकीतील विजयाचे श्रेय घेण्यासाठी अनेक जण पुढे येत असतात. पराजयाला मात्र कोणीच धनी नसतो. रविवारी लागलेल्या निकालांनंतर महाविकास आघाडीच्या आभासी झेंड्याखाली आभासी पद्धतीनेच एकत्र आलेल्या पक्षांच्या पराभवाचा धनीदेखील असाच अदृश्य झाला आहे. एका बाजूला, भारतीय जनता पार्टीच्या राजकीय वाटचालीतील सर्वांत मोठा विजय म्हणून राज्यातील नगर परिषद निवडणुकांच्या निकालाची ऐतिहासिक नोंद होत असताना, महाविकास आघाडी नावाच्या गाजराच्या पुंगीचा ऐतिहासिक किंवा न भूतो असा पराभव महाराष्ट्रात घडला. भाजपा व भाजपासोबत असलेल्या पक्षांची महायुती आणि काँग्रेस, शरद पवारांचा राष्ट्रवादी गट व उद्धव ठाकरेंचा गट यांचा समावेश असलेली महाविकास आघाडी यांच्या निवडणुकीतील कामगिरीची तुलना केल्यास, हा फरक स्पष्ट होतो. प्रत्येक निवडणुकीतील प्रत्येक विजयानंतर पुढच्या निवडणुकीत त्याहूनही अधिक देदीप्यमान विजय मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेने सतत निवडणूकमग्न असलेली भाजपा आणि प्रत्येक निवडणुकीतील प्रत्येक पराजयानंतर पुढच्या निवडणुकीत त्याहूनही अधिक दारुण पराभव पत्करणारी महाविकास आघाडी असा हा फरक या निवडणुकांतही कायमच राहिलेला दिसला. ही वाटचाल अशीच सुरू राहिली, तर उद्धव ठाकरेंचा गट व केवळ कागदावर एकत्र असलेल्या महाविकास आघाडीचे राजकीय भवितव्य काय असेल हे वेगळे सांगण्यासाठी कोणत्याही 'भाकीत-भोंदू'चीदेखील गरज राहणार नाही. कोणत्याही निवडणुकीतील विजयानंतर नव्या उत्साहाने पुढच्या निवडणुकीसाठी कामाला लागणे, नवी मोर्चेबांधणी करणे आणि विजय मिळालेल्या निवडणुकीतही नजरेस आलेल्या त्रुटी दूर करून त्या दुरुस्त करणारी भाजपाची रणनीती आहे. दुसरीकडे, प्रत्येक पराजयानंतरही त्याचे आत्मपरीक्षण किंवा चिंतन करून विश्लेषणदेखील न करता केवळ आत्ममग्नतेतून अन्य नेत्यांस फडतूस वगैरे समजण्याचे बेमुर्वत राजकारण ही ठाकरे नीती आहे. प्रत्येक निवडणुकीत आपल्याला मतदार सातत्याने नाकारत आहेत, झिडकारत आहेत आणि केवळ द्वेष व सूडभावनेतून ज्यांना फडतूस म्हणून हिणविले त्या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली विजयी वाटचाल करणाऱ्या भाजपप्रणीत महायुतीला स्पष्ट कौल मिळत आहे हे दिसत असूनही ते वास्तव ठाकरे गटाने स्वीकारले नाही. उलट, अस्तित्वातच नसलेली व पुराव्यानिशी दाखवून देता येणार नाहीत अशी कारणे देत पराजयाचे खापर प्रतिस्पर्ध्यावर फोडण्याची राजनीती केली. याआधीच्या अनेक निवडणुकांत धडे मिळूनही त्या वास्तवाकडे साफ दुर्लक्ष करून आत्ममग्न राहणाऱ्या ठाकरेंच्या राजकारणास जनता प्रतिसाद देत नाही, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. हातवारे करून, हवेत बाहू उंचावून आणि टोमणे, कोट्या मारून निवडणुकीच्या राजकारणाचे गांभीर्य घालवत हास्यजत्रा फुलविणाऱ्या प्रचारसभांचा प्रभाव आता मतदारांवर पडत नाही, हेही स्पष्ट झाले आहे. आपल्या राजकारणाला केवळ प्रतिस्पर्धी पक्षाच्या विद्वेषाची झालर लावणे पुरेसे नाही. प्रतिस्पर्धी पक्षांच्या नेत्यांना लाखोली वाहून किंवा त्यांच्या शारीरिक उणिवांवर बोटे ठेवून बाष्कळ विनोदाचे फवारे उडवून राजकारणात आपली रेघ प्रतिस्पर्ध्याहून मोठी करण्यात यश येईल अशा भ्रमात राहणे म्हणजे जनतेला मूर्ख समजण्यासारखेच असते. प्रत्येक पराजयानंतर किमान आपल्याला जनतेने का नाकारले असावे याचे चिंतन करण्याची मानसिकता तरी दाखविणे गरजेचे असते. महाविकास आघाडी नावाने एकत्र असलेल्या काँग्रेसमध्ये तशी परंपरा तरी आहे. सारे खापर कोणा श्रेष्ठींच्याच माथी मारले जाणार असल्याच्या जाणिवेने त्या उघड करणे सोयीचे नसल्याने काँग्रेसचे नेते आतल्या आत कुढत तरी असतात. उद्धव ठाकरे यांच्या पक्षास पराभवाची वास्तविक मीमांसा करणे किंवा खऱ्या कारणांचा शोध घेण्याचेच वावडे असल्याने, नवा पराभव हा अगोदरच्या पराभवाहूनही दारुण कसा असतो याचे उत्तरही कधीच सापडणार नाही अशीच स्थिती दिसते.

राज्याच्या सामाजिक समस्यांचा ठोस अभ्यास, राज्याच्या विकासाची नीती, अर्थकारणाचे पैलू किंवा जनतेच्या हिताचे नेमके मुद्दे अशा बाबींवर ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने मतदारांसमोर काही भक्कम भूमिका मांडल्याचे अभावानेच आढळते. केवळ मनोरंजन करून मतदारांचा कौल मिळविता येईल हा विश्वास मात्र ठाकरे यांच्या प्रत्येक भाषणात आढळतो. बाळासाहेबांनीही काहीशी अशीच मनोरंजन नीती आपल्या भाषणात वापरली होती. पण तेव्हा त्यांनी राष्ट्रीय प्रश्नांवर काही ठोस भूमिकाही घेतलेल्या आढळतात. उद्धव ठाकरे यांनी अशा प्रश्नांवर घेतलेल्या भूमिका अत्यंत उथळ, अभ्यासहीन आणि जाणिवेचा अभाव स्पष्ट दर्शविणाऱ्या असल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या विकासाच्या मुद्यावर त्यांनी घेतलेल्या भूमिकांवरही व्यक्तिगत हट्टाग्रहीपणाचाच प्रभाव होता, हे त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीतील स्थगिती धोरणातूनही स्पष्ट झाले होते. त्यांच्या या धोरणामुळे विकासाची गती उलट्या दिशेने गेली हा आरोप खोडून काढण्याचा व आपल्या नीतीचे समर्थन करणारी ठोस भूमिका मतदारांसमोर मांडून ती पटवून देण्याचा प्रयत्नही त्यांनी कधीच केलेला दिसत नाही. माणसे जोडणे आणि बेरजेचे राजकारण करणे ही खरी गरजही त्यांनी स्वीकारली नाही. उलट, 'गेले ते कावळे' अशी संभावना करून फाजील आत्मविश्वास जपत निष्ठावंतांचीही संभावना करण्याच्या वजाबाकीच्या राजकारणामुळे पक्षाला लागलेली गळतीही त्यांनी गांभीर्याने घेतली नाही. पराजयाची प्रामाणिक मीमांसा करण्याचे उद्धव ठाकरे यांनी मनावर घेतले असते, तर या बाबी त्यांनाही केव्हाच ध्यानी आल्या असत्या. आता ती वेळ गेली आहे. मग पराजयाच्या परंपरेची पालखी मिरविणाऱ्यांचे वेगळे भविष्य काय असणार?

## आंतरराष्ट्रीय

# म्यानमारमधील गृहयुद्ध

**प्रा. जयसिंग यादव**

भारत, चीन आणि आग्नेय आशियाच्या त्रिकोणीय जंक्शनवर म्यानमार वसला आहे. तो आग्नेय आशियाचे प्रवेशद्वार आहे. जागतिक महासत्तांच्या स्पर्धेत म्यानमार हे एक नवीन रणांगण बनले आहे. भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान यांच्या 'क्वाड'मुळे चीनला या गटाची भीती वाटते. चीनची खरी ताकद त्याच्या दुर्मिळ पृथ्वी संसाधनामध्ये आहे. चीनने 'रेअर अर्थ मॅग्नेट्स'च्या जोरावर तर अमेरिकेची कोंडी केली होती. पाकिस्तान आणि म्यानमारमध्ये जगातील काही दुर्मिळ पृथ्वी संसाधने आहेत आणि म्यानमारच्या उत्तर सीमेवर डिस्प्रोसियमसह जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वांत मोठे दुर्मिळ पृथ्वीसाठे आहेत. हे खनिज अचूक-मार्गदर्शित शस्त्रे, इलेक्ट्रिक वाहने आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक्ससाठी महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच त्यावर नियंत्रण ठेवणारा दीर्घकाळ जागतिक वर्चस्व राखेल. कारण त्यामुळे त्यांना प्रगत शस्त्रे विकसित करता येतील आणि त्यांचे तंत्रज्ञान वाढवता येईल. २०२१ च्या लष्करी उठावानंतर चीनने म्यानमारमध्ये मजबूत पाय रोवले आहेत. चीनने म्यानमारच्या लष्कराला सातत्याने शस्त्रे पुरवली आहेत. पाश्चात्त्य निर्बंधांमुळे म्यानमारच्या लष्कराला चीनवर अवलंबून राहण्यास भाग पाडले आहे. चीनने त्याचा अचूक फायदा घेतला आहे. चीनने म्यानमारच्या ८० टक्क्यांहून अधिक आवश्यक खनिज निर्यातीवर नियंत्रण मिळवले आहे आणि प्रक्रिया न केलेली खनिजे देशांतर्गत युनिट्सकडे हस्तांतरित केली आहेत. तथापि, आता परिस्थिती वेगाने बदलत आहे. 'काचिन इंडिपेंडन्स आर्मी' (केआयए)सह अनेक वांशिक बंडखोर गटांनी लष्कराविरुद्ध पाऊल उचलले आहे. त्यामुळे चीनला दुर्मिळ खनिजे काढणे कठीण झाले आहे.

'केआयए' ने चीनला रोखण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आता अमेरिकेला म्यानमारमध्ये प्रवेश मिळू लागला आहे. ट्रम्प प्रशासनाने म्यानमारच्या लष्कराशी संपर्क वाढवला असून लष्कराला विविध सवलती दिल्या आहेत. शिवाय, उत्तर थायलंडमधील चियांग माई वाणिज्य दूतावासाद्वारे अमेरिकन गुप्तचर संस्था म्यानमारमध्ये अधिक सक्रिय झाल्या आहेत. अमेरिकेसाठी मार्ग कठीण असला, तरी चीनच्या वर्चस्वाला किमान त्रास होऊ लागला आहे. भारत म्यानमारमध्ये एक शक्तिशाली खेळाडू बनला आहे. भारताच्या मदतीशिवाय अमेरिकेला म्यानमारमध्ये पाय रोवणे कठीण आहे. दुसरीकडे, भारताने दुर्मिळ खनिजे काढण्यासाठी तंत्रज्ञान प्रगत केले आहे. याचे केंद्रबिंदू 'राष्ट्रीय क्रिटिकल मिनरल मिशन' आहे. त्यात परदेशी खाणींचे अधिग्रहण, प्रगत प्रक्रिया क्षेत्रांची निर्मिती आणि संशोधन आणि विकासक्षमतांचा समावेश आहे. भारताची 'मिनरल्स फॉरेन लिमिटेड' (काबील) आधीच अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलियामध्ये खनिजांचा शोध घेत आहे. भारताने म्यानमारच्या काचिन राज्यात संभाव्य सहकार्याबाबत 'जीएसआय' आणि म्यानमार मंत्रालयांशी सखोल चर्चा सुरू केली आहे. 'क्वाड' भागीदार ऑस्ट्रेलिया आणि जपानदेखील ईशान्य भारताला पर्यायी प्रक्रिया केंद्र म्हणून काम करण्यासाठी आग्रह धरत आहेत. म्यानमारचा शेजारी असल्याने भारताला महत्त्वपूर्ण फायदे मिळतील आणि म्यानमार पुढील काही वर्षे भू-राजकीय रणांगण बनून राहील. म्यानमार सध्या गृहयुद्धाशी झुंजत आहे. या देशातील राखीन राज्यातील एका रुग्णालयावर अलिकडेच हवाई हल्ला झाला. त्यात ३० लोक ठार झाले आणि सुमारे ७० जण जखमी झाले. असे मानले जाते, की 'अराकान आर्मी' या बंडखोर गटाचे सैनिक रुग्णालयात उपचार घेत होते किंवा लपून बसले होते. म्यानमार सैन्य आणि सरकारने अद्याप हवाई हल्ल्याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. एक फेब्रुवारी २०२१ रोजी म्यानमार सैन्याने (तत्मादॉ) लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार उलथवून टाकले. २०२० च्या निवडणुकीत आंग सान सू की यांच्या 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' (एनएलडी) ने प्रचंड मतांनी विजय मिळवला होता; परंतु लष्कराने हेराफेरीचा आरोप करत सत्ता काबीज केली. यामुळे देशभरात व्यापक निदर्शने झाली. ती लष्कराने हिंसकपणे दडपली. विरोधकांनी राष्ट्रीय एकता सरकार (एनयूजी)ची सशस्त्र शाखा असलेली 'पीपल्स डिफेन्स फोर्स' (पीडीएफ) स्थापन केली. डझनभर वांशिक सशस्त्र गट देखील लष्कराविरुद्ध लढत आहेत. हे गट दशकांपासून स्वराज्याची मागणी करत आहेत. बंडखोरांनी म्यानमारचा अर्धा भाग ताब्यात घेतला.



ऑक्टोबर २०२५ मध्ये लष्कराने 'ताआंग नॅशनल लिबरेशन आर्मी' (टीएनएलए)कडून क्युक्मे शहर परत मिळवले. लष्कर अजूनही यांगोन आणि नायपिदासारख्या प्रमुख शहरांवर नियंत्रण ठेवून आहे. या काळात चीनने लष्कराला लष्करी मदत आणि त्याच्या पाईपलाईन आणि दुर्मिळ माती खाण प्रकल्पांचे संरक्षण करण्यासाठी दबाव आणला. यामुळे बंडखोरांना मोठा धक्का बसला. लष्कराने नागरिकांना लक्ष्य केले. सप्टेंबरमध्ये राखीन राज्यातील एका शाळेवर हल्ला करण्यात आला. त्यात २२ विद्यार्थी ठार झाले. युनिसेफने हल्ल्याचा निषेध केला. ऑक्टोबरमध्ये चाऊंग-यू टाऊनशिपमध्ये बौद्ध उत्सवावर झालेल्या हल्ल्यात ३२-४० जणांचा मृत्यू झाला. यामध्ये मुलांचाही समावेश होता. काया राज्यात बंडखोर आणि लष्करामध्ये मोठी लढाई सुरू आहे. रुग्णालये आणि गावांवरही हल्ला झाला आहे, २३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या हल्ल्यात ८० नागरिकांचा मृत्यू झाला. म्यानमारमध्ये जगातील दुर्मिळ पृथ्वी संपत्ती आहे. त्यासाठी जगभरातील प्रमुख शक्ती म्यानमारच्या गृहयुद्धात आग भडकवत आहेत.

२०२१ मध्ये सैन्य सोडून गेलेले कॅप्टन कौंग थू विन यांनी सांगितले की, म्यानमारच्या लष्कराने नागरिकांची निर्घृण हत्या केली. खाजगी मालमत्ता जप्त करून मानवी हक्कांचे उल्लंघन केले. दरम्यान, लष्कराचे मनोबल खूपच खालावले आहे. त्याला सैन्य आणि शस्त्रांचे नुकसान सहन करावे लागत असून जनरलदेखील बंडखोरांना शरण गेले आहेत. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये एका पावसाळी रात्री, वुन्ना क्याव आणि त्यांचे काही सहकारी सैनिक म्यानमारमधील लष्करी तळ सोडून गेले. काही तासांनंतर, त्यांना एका तीव्र संघर्षग्रस्त क्षेत्रात तैनात करण्यात येणार होते, तिथे सैन्य लोकशाही समर्थक सशस्त्र गटांचे हल्ले रोखण्यासाठी संघर्ष करत होते. मात्र वरिष्ठ अधिकारी आणि कमांडर झोपलेले असताना हे सैनिक गुपचूप करिनमधील कंपाऊंडमधून निघून गेले. या कृत्यापायी किमान सात वर्षे तुरुंगवास आणि कदाचित मृत्युदंडाची शिक्षा होऊ शकते.

फेब्रुवारी २०२१ मध्ये एका बंडाद्वारे सत्ता काबीज केल्यापासून म्यानमारच्या लष्कराला त्यांच्या राजवटीचा विरोध दाबण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. यामध्ये लष्कराच्या हिंसाचार आणि दडपशाहीविरुद्ध लढण्यासाठी शस्त्रे हाती घेणारे लोकशाही समर्थक गट आणि स्वातंत्र्यासाठी दीर्घकाळ लढणारे वांशिक अल्पसंख्यकांचे सशस्त्र गट यांचा समावेश आहे. ते लष्करी राजवटीविरुद्धच्या संघर्षात सामील झाले आहेत. २७ ऑक्टोबर रोजी वांशिक अल्पसंख्यक सशस्त्र गटांच्या युतीने (थ्री ब्रदरहुड अलायन्स) नवीन सत्तापालट विरोधी लढवय्यांसह उत्तर शान राज्यात एक मोठे आक्रमण सुरू केले, तेव्हा दबाव आणखी वाढला. आधीच अनेक आघाड्यांवर संघर्ष करत असलेले सैन्य अचानक झालेल्या हल्ल्यामुळे सावध झाले. 'ऑपरेशन १०२७' असे नाव देण्यात आलेले हे आक्रमण चीनच्या सीमेवर जलद प्रगती करत इतर भागात हल्ले करण्यास प्रेरित करत होते. प्रतिकार गटांची प्रगती सर्वत्र मिश्रित आहे. म्यानमारचे सैन्य मोठ्या पराभवाच्या उंबरठ्यावर आहे, अशी सुरुवातीची अपेक्षा अकाली होती; परंतु ऑक्टोबरपासून उत्तरेत विमान पाडले गेले. शस्त्रे जप्त केली गेली. महत्त्वाची शहरे आणि पुरवठा मार्ग गमावले. हे सैन्यासाठी अपमानास्पद ठरले. त्यामुळे त्याच्या नेतृत्वाविरुद्ध अंतर्गत रोष निर्माण झाला आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय कुळकर्णी**

# लोणार सरोवराचा वाढता जलस्तर

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार येथील जगविख्यात खाऱ्या पाण्याच्या सरोवरातील जलस्तर सध्या वाढत आहे. त्यामुळे सरोवरातील पुरातन हेमाडपंथी मंदिर व जीवसृष्टीला धोका निर्माण झाला आहे. यामुळे पर्यावरणवाद्यांची चिंता वाढली आहे.

हजारो वर्षांपूर्वी उल्कापातामुळे हे सरोवर निर्माण झाले आहे. बेसाल्ट खडकामध्ये असलेल्या व खाऱ्या पाण्याचे म्हणून हे सरोवर जगातील अभ्यासकांचे आकर्षण आहे. देश-विदेशातील वैज्ञानिक व अभ्यासक लोणार येथे या सरोवराचा अभ्यास करण्यासाठी येतात. दरवर्षी मोठ्या संख्येत पर्यटक देखील भेट देतात. विशेष म्हणजे खाऱ्या पाण्याचे हे एकमेव सरोवर आहे. त्याच्या परिसरात १२ प्राचीन हेमाडपंथी मंदिरे आहेत. कमळजा देवीचे मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. गेल्या काही वर्षांपासून या सरोवरातील जलस्तर वाढत आहे. पाण्याची पातळी वाढल्याने कमळजा देवीचे मंदिर जवळपास १५ फूट पाण्यात बुडाले आहे. सरोवरातील वाढती पाण्याची पातळी हा पर्यावरणवादी, अभ्यासक आणि नागरिकांचा चिंतेचा विषय ठरत आहे. कारण, यापूर्वी सरोवरातील पाण्याची पातळी कधीच वाढत नव्हती. मंदिर यापूर्वी कधीच पाण्यात बुडाले नव्हते, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

पाण्याची पातळी वाढण्याचे नेमके कारण आजपर्यंत स्पष्ट झालेले नाही. याविषयी लोणार येथील सुधाकर बुगदाणी व खामगाव येथील सुप्रसिद्ध छायाचित्रकार अशोक खेकाळे यांनी सरोवराच्या जलस्तर वाढीबाबत शासन व पुरातत्त्व विभागाकडे अनेक निवेदन दिली होती. त्याचा सातत्याने पाठपुरावा केला होता. सरोवराच्या वर पाझर तलाव व जलसंवर्धनाची कामे झाल्याने सरोवरातील झरे जिवंत होऊन जलस्तर वाढत असल्याचे निरीक्षण या दोघांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. मात्र, त्याकडे लक्ष देण्यास शासनाला कधी वेळ मिळाला नाही. अशोक खेकाळे यांची मुलगी ॲड. कीर्ती निपाणकर यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. मात्र, सुधाकर बुगदाणी आणि अशोक खेकाळे यांचे निधन झाल्याने हा संघर्ष अर्ध्यावरच थांबला. आता पुन्हा सरोवरातील जलस्तरात वाढ झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे पर्यावरणवादी व नागरिक चिंताग्रस्त झाले आहेत आणि त्यांनी हा धोका टाळण्यासाठी तातडीने जलस्तर वाढीचे कारण शोधून त्यावर नियंत्रण मिळविण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, नागपूरचे अधीक्षक अरुण मलिक यांनी एका वृत्तसंस्थेला सांगितले की, जलस्तर वाढण्याचा शोध घेतला असता त्यात असे दिसले की, सरोवराच्या आजूबाजूला संरक्षित वनक्षेत्राचा झालेला विकास व वृक्षारोपण वाढल्यामुळे सूक्ष्म पर्यावरणात बदल झाला आहे. त्यामुळे परिसरात जलसंधारण क्षमतेत वाढ झालेली असावी. त्यांनी असेही सांगितले की, पुरातत्त्व विभाग कमळजा देवी मंदिराच्या चोहोबाजूने संरक्षक भिंत व चबुतरा उभारण्याची योजना तयार करीत आहे. त्यामुळे जलस्तर वाढला तरीही सर्व मंदिरे सुरक्षित राहतील व भाविकांना मंदिरात जाता येईल. जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी सांगितले की, सरोवरातील पाणी बाहेर काढण्यासाठी किंवा वाहून जाण्याचा कोणताही मार्ग नाही आणि नैसर्गिक झऱ्यांतून पाण्याचा ओघ सुरू असल्यामुळे सातत्याने सरोवरातील जलस्तर वाढत आहे. तसेच, काही वर्षांपासून लोणार व परिसरात पर्जन्यमानात मोठा बदल झाला आहे. यावर्षी या परिसरात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली.

आयआयटी, मुंबईच्या तज्ज्ञांनी नमुने घेतले असून जलस्तर वाढण्याच्या कारणांचा ते शोध घेत आहेत. हा नैसर्गिक बदल का होत आहे ? याचा पर्यावरणावर काय प्रभाव पडेल? यावर त्यांचे संशोधन सुरू असल्याचे त्यांनी म्हटले आहे. असे असले तरी, लोणार सरोवराचे रक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. सरोवरातील या नैसर्गिक बदलात कोणताही मानवीय हस्तक्षेप नाही. मग हा बदल का व कसा होत आहे? याचे उत्तर शोधून त्यावर उपाय करणे हे संशोधक व वैज्ञानिकांसमोरील मोठे आव्हान आहे. या जागतिक व नैसर्गिक वारशाचे संरक्षण झाले पाहिजे, अशी पर्यावरणप्रेमी व लोणारवासीयांची अपेक्षा आहे.

८८०६००६१४९

## इतस्तत:

# इंडिगोचे संकट : कोण किती बळकट?

**दत्तात्रेय आंबुलकर**

डिसेंबर महिन्याच्या प्रारंभीच भारतीय हवाई वाहतूक क्षेत्रात अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या इंडिगो एअरलाईन्सने आपल्या मनमानीने व उद्दामपणे प्रवाशांना ज्या बेमुर्वतखोरपणे सरकारी प्रयत्न-पुढाकाराला भीक न घालता धारेवर धरले, त्या व्यवस्थापकीय मनमानी वा उद्दामपणाला काय म्हणावे? विमान वाहतूक क्षेत्रात यापूर्वी विमान वाहतूक कर्मचाऱ्यांपासून वैमानिकांच्या संपापर्यंतचे कित्येक प्रयत्न पाहण्यात आले. मात्र, इंडिगोने अचानक, अघोषितपणे; मात्र एकप्रकारे नियोजनबद्ध पद्धतीने केलेला व्यवस्थापन प्रेरित 'बंद' हासुद्धा कदाचित, व्यवस्थापकीय संप पद्धतीचा आगळावेगळा आक्रस्ताळा प्रकारच म्हणावा लागेल.

अशाप्रकारे इंडिगो एअरलाईन्सद्वारा देशभरातील हजारो उड्डाणे रद्द करून अक्षरश: लाखो प्रवाशांना कुठलीही पूर्वसूचना न देता, विमान वाहतूक रद्दच नव्हे; तर बंद करण्याचा सपाटा लावला. शेवटी त्याची दखल सरकारने घेणे अपरिहार्य व आवश्यक ठरले. यातूनच इंडिगोने प्रवाशांपासून प्रशासनापर्यंत सर्वांच्याच आशा-अपेक्षांना कसे मातीमोल करण्याचे व्यावसायिक धारिष्ट्य केले, हे आता पुरतेपणी व सर्वांपुढे आले आहे. त्यातूनच या हवाई वाहतूक कंपनी व्यवस्थापनाचा दुराग्रही मनमानीपणा स्पष्ट झाला आहे.

ग्राहकांसह आम जनतेचा आक्रोश व इंडिगोच्या उद्दामपणाची गांभीर्याने नोंद घेत, केंद्र सरकारने याप्रकरणी हस्तक्षेप करणे अपरिहार्यच होते. सरकारने काहीशा उशिराने लक्ष घातल्यानंतर देशांतर्गत सर्वांत मोठ्या अशा हवाई वाहतूक करणाऱ्या इंडिगोशी संबंधित विविध संदर्भात जे मुद्दे प्रामुख्याने पुढे आले ते पुढीलप्रमाणे :

हवाई वाहतुकीला अधिक सक्षमतेसह सुरक्षेची जोड देण्यासाठी व विशेषत: याचवर्षी अहमदाबाद विमानतळावर घडलेल्या भीषण अपघातानंतर केंद्रीय हवाई वाहतूक मंत्रालयाने काही नवे दिशानिर्देश जारी केले होते. यामध्ये विमानचालकांचे कामकाज व कामाचे तास नव्याने स्पष्ट करण्यात आले होते. हे नवे निर्देश १ नोव्हेंबर २०२५ पासून लागू करण्यात आले होते व त्यासंबंधी मंत्रालयाने सर्वच हवाई वाहतूक कंपन्यांना पूर्वसूचित केले होते. असे असूनही इंडिगोने या नव्या नियमांमुळे विमानचालकांची संख्या व त्यापोटी त्यांचे वेतन वाढेल, या तद्दन बाजारू विचाराने या नव्या नियमांची अंमलबजावणी केलीच नाही.



असे होण्याचे या प्रकरणातून दिसून आलेले महत्त्वाचे कारण म्हणजे, हवाई वाहतूक मंत्रालयाने जारी केलेले नवे नियम हे न्यायालयाच्या २०२४ मध्ये दिलेल्या निर्देशांवर आधारित आहेत. मात्र, या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी हवाई वाहतूक मंत्रालयाने दिलेली ढील व वाढीव कालमर्यादा, हवाई वाहतुकीची वाढती गरज, इंडिगोची या क्षेत्रात ८० टक्के व्यवसायासह असणारी व्यावसायिक दादागिरी-प्रशासनिक मनमानी या साऱ्यांच्या परिणामी या मुद्यांची गांभीर्याने अंमलबजावणी झालीच नाही.

या संदर्भातील नव्याने केलेल्या पडताळणीत स्पष्ट झालेली बाब म्हणजे, जागतिक पातळीवर हवाई वाहतूक व्यवसायाचा अभ्यास करता; विमानतळ प्रशासन, प्रत्यक्ष हवाई वाहतूक व ग्राहकसेवेसह एकूणच हवाई वाहतूक क्षेत्रातील खर्चाचा व खर्चाच्या प्रमाणात भारतीय हवाई वाहतूक जागतिकस्तरावर सर्वाधिक खर्चीक ठरली असून, त्याचा बोजा भारतीय ग्राहक आधीच सोसत आहेत.

हवाई वाहतूक व्यवसाय-व्यवस्थापनातील मूलभूत तत्त्व म्हणजे, त्यामध्ये समाविष्ट असणारा महत्त्वाचा व मूलभूत घटक म्हणजे प्रवासी व वैमानिकांमधील परस्पर विश्वास. यातूनच सुरक्षित, गतिमान व आरामदायी प्रवासासाठीचे खात्रीशीर वाहन-साधन म्हणून प्रवासी जनता विमान वाहतुकीचा विचार करते व त्यासाठी प्रसंगी खर्चीक पर्यायपण स्वीकारते.

असे असताना एखादी विमान वाहतूक कंपनी नैसर्गिक आपत्ती वा नियंत्रणाबाहेरच्या वाहतूक परिस्थितीमुळे नव्हे, तर अंतर्गत व्यवस्थापकीय म्हणजेच ऑपरेशनल कारणाने अचानक व पूर्वसूचना न देता; आपली सेवा अनिश्चित स्वरूपात स्थगितच नव्हे, तर खंडित करते, अशा वेळी ही व्यवस्थापकीय मनमानी सर्वच दृष्टीने असहनीय होते. या क्षेत्राचे व्यावसायिक स्वरूप पाहता, इंडिगोची भूमिका म्हणूनच अक्षम्य ठरते.

प्रशासकीयसंदर्भात व सकृद्दर्शनी जरी इंडिगो आपल्या निर्णयाचे खापर हवाई वाहतूक मंत्रालयाचे निर्देश व या निर्देशांचे पालन करताना उत्पन्न झालेली आव्हानात्मक स्थिती यावर फोडत आहे. असे करताना प्रशासकीय निर्देशांचे पालन करण्याची जी प्रशासकीय व व्यवसाय-व्यवस्थापनासाठी अत्यावश्यक अशी म्हणजेच गव्हर्नन्सविषयक महत्त्वपूर्ण मुद्याला सोयीस्करपणे ज्या पद्धतीने बगल देण्यात आली, ती बाब अधिकच चीड आणणारी ठरते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कुठल्याही हवाई वाहतूक कंपनीकडून असा प्रकार घडल्यास त्यावर संबंधित सरकार वा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर दंड, दंडात्मक कारवाई, कायदेशीर खटले, व्यवसाय निलंबन अशा स्वरूपाची मोठी व थेट कारवाई खात्रीने व तातडीने केली जाते. या संदर्भात सरकारीस्तरावर त्वरित व तातडीची कारवाई महत्त्वाची ठरते. मात्र, वेगवान म्हणून खर्चीक असूनही, लाखो प्रवाशांनी पसंत केलेली देशातील प्रमुख हवाई वाहतूक कंपनी देशांतर्गत बहुसंख्य प्रवाशांना आपली सेवा अचानकपणे व कुठलीही पूर्वसूचना न देता, ज्या पद्धतीने वंचितच नव्हे, तर टांगतीवर ठेवते. अशा प्रकारे खऱ्या अर्थाने अत्यंत महत्त्वाच्या, संवेदनशील व सेवाप्रवण सेवा क्षेत्रात सुरू झालेल्या मनमानीला वेसण घालणे तर दूर, त्यावर प्राथमिक स्वरूपातील कारवाईची सुरुवात करण्यासाठी सरकारने चार दिवस वाट पाहिली. दरम्यान, मोठे नुकसान सर्वांचेच झाले, त्याचे काय? त्यादृष्टीने प्रसंगी देशांतर्गतच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील हवाई वाहतूक सुचारू व सुरळीतपणेच नव्हे, तर सातत्याने व संवेदनशील स्वरूपात सुरू राखण्यासाठी सर्वच अटी व शर्ती नव्याने लिहाव्या लागतील, प्रसंगी शोधाव्यासुद्धा लागतील. इंडिगो प्रकरणाचा हाच मोठा व महत्त्वाचा बोध ठरतो.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-८१

मंगळवार, २३ डिसेंबर २०२५

### भक्तिपूर्ण हे अवघे जीवन मातृभूमिच्या पदकमलाशी

भक्तिपूर्ण हे अवघे जीवन मातृभूमिच्या पदकमलाशी
तेवत तेवत मधुभावाने एकरूप हो परमात्म्याशी ॥धृ॥

राष्ट्रसमर्पित जीवन जगणे
सद्धर्माचे तेज फुलविणे
या ध्येयास्तव अविरत श्रमणे
जीवनपूजा ही अविनाशी ॥१॥

जागृत होता समष्टि शंकर
दानवतेला मिळे न अवसर
मंगलतेने गाता सुस्वर
मीलन होइल चित् तत्त्वाशी ॥२॥

साधना ही जीवनाची
देवत्वाला जागविण्याची
क्षणिकांतुनि त्या चिंतनाची
वाट पुसावी भगवंताशी ॥३॥

## वाचक पत्रे

### पराभवाचे 'तुणतुणे'

महाराष्ट्रात २१ डिसेंबरला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे निकाल भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या बाजूने लागले, हे अपेक्षितच होते. असेच निकाल मागच्या वर्षी महाराष्ट्र विधानसभेचे सुद्धा होते व निकालाचा कल सुद्धा असाच होता. त्या निकालांवर विरोधकांनी उशिरा का होईना, 'मतचोरी' झाली म्हणून रान उठवले होते. आपल्या स्वार्थी राजकारणाचे दुष्परिणाम दुसऱ्यावर ढकलणे, हे विरोधकांचे नेहमीचेच झाले आहे. काल आलेले स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे निकाल, ही जनतेने विरोधकांना दिलेले जबरदस्त प्रत्युत्तर आहे. तरीही काही विरोधी नेत्यांनी कुरबुर सुरू केली आहे. झालेल्या चुकांपासुन योग्य तो धडा शिकणे, हे राहुल गांधींसारख्या नेत्यांच्या गावीही नाही. असे नेते स्वत:च्या वक्तव्याने नामुष्की ओढवून घेतात व दोष मात्र भाजपाला देतात. पण यामुळे भाजपाची पत वाढते, हे यांच्या लक्षात येत नसेल काय, की जनतेला हे मूर्ख समजतात?

आजकाल जनता बरीच सज्ञान आहे. कार्यक्षम व जनतेची कामे करणाऱ्या पक्षाला ते निवडतात. म्हणून विरोधी पक्षांनी जबाबदारीने रचनात्मक विरोध करावा व आपली जनतेत विश्वासार्हता वाढवावी, हेच त्यांच्या हिताचे आहे.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

### माकप आघाडीसह काँग्रेसला धक्का

देशात सर्वाधिक साक्षर नागरिक असलेल्या केरळ राज्याच्या तिरुवनंतपुरम या राजधानीच्या शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत तब्बल साडेचार दशकांची सत्ता असलेल्या कम्युनिस्टांचे या शहरावर असलेले वर्चस्व लोकशाही मार्गाने भारतीय जनता पक्षाने मोडीत काढले आणि १०१ पैकी ५० जागांवर विजय मिळवत सत्ता काबीज केली. या निकालाने सत्तारूढ माकपच्या नेतृत्वातील डाव्या लोकशाही आघाडीसह येथील काँग्रेसचे विद्यमान खासदार शशी थरुर आणि काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीलाही जबरदस्त धक्का बसला आणि म्हणून हा निकाल भाजप कार्यकर्त्यांसाठी अतिशय उत्साहवर्धक म्हणावा लागेल.

येत्या वर्षभरात केव्हातरी केरळ विधानसभेच्या निवडणुका होतील त्या धर्तीवर भाजपासाठी या विजयाचे महत्त्व मोठे आहे. ते नजरेआड करता येणार नाही.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### शाळकरी मुलांच्या वाहतूक सुरक्षिततेचा प्रश्न

सर्वसाधारणपणे आजही अनेक ठिकाणी नर्सरीपासूनची मुले शाळा, क्लास व ट्युशनसाठी ऑटोरिक्षातून प्रवास करताना दिसतात. मात्र या ऑटोरिक्षांची सुरक्षितता चिंताजनक आहे. अनेक रिक्षांना नीट दरवाजे, सुरक्षित कड्या किंवा आवश्यक संरक्षक व्यवस्था नसते. त्याशिवाय क्षमतेपेक्षा अधिक मुले रिक्षात बसलेली असतात. बरेचदा चार-पाच वर्षांची लहान मुले थकव्यामुळे रिक्षात बसून डुलकी देत असतात, तर काही मुले आपल्याच धुंदीत खेळत-मस्ती करत करतात. रिक्षावाले कुठे कट मारून जातात तर कुठे मुलांनी भरलेली रिक्षा सिग्नल तोडून नेतात. हे सगळं बघून काळजात धस्स होत. शाळकरी मुलांच्या वाहतुकीसाठी ऑटोरिक्षांबाबत स्पष्ट व कडक नियम आहेत का, याबाबत प्रश्न निर्माण होतो. प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. सुरक्षिततेचे ठोस नियम अंमलात आणावेत व नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महापालिका निवडणूक; आजपासून अर्ज स्वीकारणार

## नाहरकत प्रमाणपत्रासाठी सुरु करण्यात आलेल्या एक खिडकी योजनेला प्रतिसाद

**ना-हरकत प्रमाणपत्रांसाठी सोमवारी महापालिकेकडे ६३०अर्ज दाखल**

**महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केली प्रत्यक्ष पाहणी**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता मंगळवार, २३ डिसेंबरपासून अर्ज स्वीकारण्यास सुरुवात होणार आहे.

नामनिर्देशन अर्ज दाखल करताना उमेदवारांना महानगरपालिकेकडून विविध ना-हरकत प्रमाणपत्रे (एन ओ सी) सादर करणे अनिवार्य आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने नॉर्थकोट प्रशाला येथे सुरू करण्यात आलेल्या एक खिडकी कक्षात प्रमाणपत्रासाठी मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले. आज पहिल्याच दिवशी ६३० अर्ज दाखल झाले आहे. दरम्यान, आज मंगळवारपासून अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू होत आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नावावर असलेल्या मालमत्तेसाठी मालमत्ता कराचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या नावावर गाळा (दुकान) असल्यास त्यासाठी स्वतंत्र ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागणार असून, खुली जागा असल्यास त्या मिळकतीबाबतही संबंधित विभागाकडून एनओसी सादर करणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवार व्यवसाय करीत असल्यास, संबंधित व्यवसाय परवाना (लायसन्स) वैध असल्याचे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.याशिवाय, उमेदवार महानगरपालिकेचा मक्तेदार (ठेकेदार) आहे किंवा नाही, याबाबतचा सविस्तर तपशील लेखी स्वरूपात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वरील सर्व माहितीबाबत उमेदवारांनी स्वयंघोषणापत्र सुद्धा अनिवार्यपणे सादर करावे लागणार असून, त्यामधील माहिती सत्य व अचूक असल्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. महापालिकेच्या वतीने नॉर्थकोट प्रशाला येथे एक खिडकी कक्ष कार्यालयीन वेळेत सुरु आहे. उमेदवारांनी मिळकत करा संदर्भात ऑनलाईन ना हरकत प्रमाणपत्र काढून अर्ज सोबत जोडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ३१ डिसेंबर रोजी होणार अर्ज छाननी

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज देणे व स्वीकारण्याची प्रक्रिया दि. २३ ते ३० डिसेंबर २०२५, अर्ज छाननी दि. ३१ डिसेंबर २०२५ असून त्याच दिवशी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दिनांक २ जानेवारी २०२६ पर्यंत मुदत राहणार आहे. दिनांक ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येईल. याच दिवशी अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे. दुसऱ्या दिवशीच १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी व निकाल घोषित करण्यात येणार आहे. दि. १९ जानेवारी २०२६ पर्यंत निकाल शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### उपायुक्त आशिष लोकरे यांनी केल्या विविध सूचना

नॉर्थकोर्ट प्रशाला येथील सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी सुरू केलेल्या एक खिडकी कक्ष आणि अन्य कार्यालयांची महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. बराचवेळ ते या परिसरात तळ ठोकून होते. यादरम्यान लोकरे यांनी गर्दी होऊ नये, सर्वांना सुलभ पद्धतीने अर्ज दाखल करता यावेत आणि प्रमाणपत्र उपलब्ध करता येईल या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी परिसरात थांबून आलेल्या इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांच्या शंकांचे निरसनही त्यांनी केले.

## महत्वाचे...



### नरेंद्र गुडशेल्लू यांना सूर्या ग्रुपकडून मैदानावर श्रध्दांजली

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

सरावादरम्यान निधन झालेल्या नरेंद्र गुडशेल्लू यांना सूर्या ग्रुपच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सूर्या ग्रुप आयोजित सूर्या कॉर्पोरेट ट्रॉफी स्पर्धेच्या निमित्ताने ही श्रद्धांजली वाहण्यात आली. सोलापूर महानगरपालिका संघाचा खेळाडू नरेंद्र गुडशेल्लू यांचे दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी सरावादरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी निधन झाले होते. या घटनेच्या पार्श्वभूमीवर स्पर्धेतील सामना सुरू होण्यापूर्वी दोन मिनिटांचे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रसंगी सूर्या ग्रुपचे राजकुमार सुरवसे, महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक शेषराव शिरसट, उद्यान विभाग प्रमुख स्वप्नील सोलनकर, जनार्दन मोरे तसेच सोलापूर महानगरपालिका संघ, जीएसटी संघाचे खेळाडू व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत नरेंद्र गुडशेल्लू हे एक शिस्तप्रिय व मेहनती खेळाडू म्हणून ओळखले जात होते.

## सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक : एक खिडकी कक्षाचे महापालिका प्रशासकीय इमारतीत स्थलांतर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने उमेदवार व नागरिकांना विविध निवडणूक विषयक सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी सुरु करण्यात आलेला एक खिडकी कक्ष यापूर्वी नॉर्थ कोर्ट प्रशाला, सोलापूर येथे कार्यान्वित करण्यात आला होता. मात्र, निवडणूक प्रक्रियेच्या पुढील टप्प्यांकरिता तसेच प्रशासनिक सोयीसाठी मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ पासून एक खिडकी कक्ष सोलापूर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करण्यात येत आहे.

या एक खिडकी कक्षामार्फत उमेदवारांना व नागरिकांना नामनिर्देशन अर्ज, विविध ना-हरकत प्रमाणपत्रे (), निवडणूक विषयक माहिती, अर्ज स्वीकृती तसेच इतर आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.तरी, सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ संदर्भातील कोणतेही अर्ज सादर करणे, माहिती घेणे किंवा निवडणूक विषयक कामकाजासाठी नागरिकांनी व इच्छुक उमेदवारांनी थेट सोलापूर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील एक खिडकी कक्ष येथे संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुलभ व वेळेत पूर्ण करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असेही आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

### गणित दिनानिमित्त गणित स्पर्धापरीक्षा सप्ताह

**सोलापूर** - सोरेगाव येथील अजिंक्य रॅफ्लेशिया क्लासेसच्या वतीने गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय गणित दिनानिमित्त जिल्हास्तरीय गणित स्पर्धा परीक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याचे संचालक माळी यांनी सांगितले. दि.२२ ते ३१ डिसेंबरपर्यंत ही स्पर्धा परीक्षा घेण्यात येणार आहे. इयत्ता दुसरी ते दहावीच्या विद्यार्थांकरिता प्रश्नावली असून त्याकरिता नावनोंदणी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ९६३७७८३७५० या क्रमाकांवर संपर्क साधावा.


**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **Dinesh Rajendra Rathod** has been changed to new name **Dinesh Raju Rathod**
**(Affidavit no.- 61175)**
**Mo - 9307665172**

Classifieds

**पाहिजेत**

**कौस्तुभ इंजिनिअरिंग येथे Office Clerk (MS-CIT, Tally) - फोन करून येणे. होटगी रोड चव्हाण मोटर्समागे. 7720087726**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**CHANGE IN NAME**

I declare by this Publication about change in my old name **Kanjtilal Satyawan chendge** change in to My New name **Kantilal Satyawan chendge**
Present Address :
At-Post Kolgaon
Ta-Karmala
Dist- Solapur
**Afdvt No-2265126**
**Date 19/12/2025**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

SRM E-Tender Notice Digitally signed online bids are invited for following tender through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **E-Tender No.** EE/EHV/PD-III/Solapur/T-1/2025-26 (RFX No - 7000038439) **Particulars:** Tender for the work of Engaging Skilled/Semi Skilled/ Unskilled Non-Technical & Technical Manpower on Outsourcing Basis at EHV Projects Division-III, Solapur including Sub-Division Office. **Estimated Cost:** Rs. 95,86,980/-; E.M.D. (1% of est. cost); Tender cost in Rs. 500.00+ 5%; **Sale period:** 23/12/2025 to 06/01/2026 upto 23:59 Hrs; **Date of opening (Tech. bid):** 07/01/2026 at 11:00 Hrs. **Contact person:** Addl. Ex. Engg. (Mo.7447441033). **Pre-bid meeting :** 26/12/2025 at EHV Projects Division-III, Solapur. For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in/**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**Executive Engineer,**
**EHV Projects, Div-III, Solapur**


### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी बार्शी शहर व आसपासचे परिसरातील लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन :- डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील वाणिज्य बिनशेती मिळकत गट नं. ९४९/२/१ याचे क्षेत्र ०० हे. २१ आर., याचा आकार २७७२ रुपये ०० पैसे, यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - बार्शी शहर मंजुर विकास योजना (तिसरी सुधारित) अन्वये नियोजित १५ मीटर (५० फुट) रुंदीचा रस्ता व त्यापलीकडे गट नं. ९४८ नकाशाप्रमाणे गट नं. ९४७, गट नं. ९४८, दक्षिणेस - गट नं. ९४९/२/२ प्रेमलता भराडिया यांची जागा व बार्शी - परंडा राज्य मार्ग, पश्चिमेस - गट नं. ९४९ पैकी शेख यांची जमीन मिळकत व उत्तरेस गट नं. ९५१, राऊत, वगैरे यांची मिळकत, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची एल आकाराची मिळकत, आतील झाड-झुडुपे, दगड-माती, वगैरे तदंगभूत वस्तुसह अकृषी (वाणिज्य) मिळकत स्वतंत्र मालकीची व कब्जे वहिवाटीची अशी.

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही श्री. राधेश्याम रामदयाल भराडिया, रा. १५५१/७/क/२, मित्र नगर, हौसिंग सोसायटी, रिंग रोड, सुभाष नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी दि. २७/०८/२००७ रोजीचे नोंदणीकृत खरेदीदस्त क्र. वरस २७३७/२००७ अन्वये वसीम सिकंदर शेख व मोहसीन सिकंदर शेख, सिकंदर वजीर शेख यांचेकडून योग्य त्या बाजारभाव किंमतीने खरेदी केली असून, सदर मिळकत श्री. राधेश्याम रामदयाल भराडिया यांचे स्वकष्टार्जीत मालकीची असून, मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. मिळकत मालक श्री. राधेश्याम रामदयाल भराडिया यांनी वर नमुद मिळकत आमचे अशिल श्री. प्रशांत व श्री. प्रमोद पांडुरंग एडके, रा. बार्शी यांना योग्य त्या बाजारभाव किंमतीने खरेदी देण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकत विक्रीबावत उभयंतामध्ये तोंडी करार झालेला आहे व आमचे अशिलांनी मिळकत धारकास इसारादाखल मोबदला रक्कमही दिलेली आहे. सदर मिळकत स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलाचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह त्यांचे विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. २२/१२/२०२५.

**सही/-**
**ॲड. श्री. आकाश सुनिल तावडे**
**बी.ए., एलएल.बी., एल.एल.एम.**
**न्यायालयाच्या समोर, कचेरी रोड,**
**खेडकर बिल्डींग, बार्शी, जि. सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार, खालील 'क' वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी तात्पुरती मतदार यादी कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सहकारी संस्थेचे नाव |
|---|---|
| १ | सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था, मर्या., सांगोला |
| २ | विजयालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सांगोला |
| ३ | श्री संत तुकाराम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., हटकर मंगेवाडी |
| ४ | रुद्रपशुपतीनाथ महिला सहकारी पतसंस्था मर्या., कोळा |
| ५ | जय महाराष्ट्र ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., कमलापूर |
| ६ | शिवबाराजे ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., वाटंबरे |

**क वर्ग संस्था प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी कार्यक्रम**

| अ. क्र. | तपशिल | तारीख |
|---|---|---|
| १ | निवडणूक नियम ६(३) नुसार तात्पुरती मतदार यादी प्रसिध्दी करण्याची तारीख | दि. २३/१२/२०२५ |
| २ | निवडणूक नियम ८(१) नुसार तात्पुरत्या मतदार यादीवर आक्षेप अगर दावे तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांचेकडे सादर करावयाची तारीख | दि. २३/१२/२०२५ ते दि. २९/१२/२०२५ |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाची तारीख | दि. ३०/१२/२०२५ |
| ४ | निवडणूक नियम ८(३) नुसार आक्षेप अगर दावे यावर तालुका सहकारी निवडणूक अधिकारी सोलापूर यांनी द्यावयाचा निर्णयाची तारीख | दि. ०५/०१/२०२६ |
| ५ | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त झाल्यास निवडणूक नियम ८ (३) नुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाची तारीख | दि. ०५/०१/२०२६ |

उपरोक्त कार्यक्रम तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला यांचा पत्ता :- क्षत्रिय माळी वि.का.से. इमारत १ ला मजला, कचेरी रोड, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे व संबंधित संस्थेच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही/-**
**(डॉ. वैशाली साळवे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी**
**तभा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला**

## अुत्तम सेवा — मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ — नोकरीच्या शोधात

उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC** | | | |
| १ | कॉन्स्टेबल GD (२५४८७ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ३१/१२/२५ |
| २) | **दिल्ली अधीनस्थ सेवा निवड मंडळ, DSSSB** | | | |
| १ | बहुउद्देशीय कर्मचारी (७१४ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २७ पर्यंत | १५/०१/२६ |
| ३) | **केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड, CBSE** | | | |
| १ | कनिष्ठ सहा. (३५ पदे) | बारावी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | २७ पर्यंत | २७/१२/२५ |
| २ | सुपरिटेंडंट (२७ पदे) | पदवी व संगणक हताळणी ज्ञान | ३० पर्यंत | |
| ३ | ज्यु. अकौंटंट (१६ पदे) | बारावी (वाणिज्य) व इंग्रजी टायपिंग | २७ पर्यंत | |
| ४ | असि. सेक्रेटरी (०८ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३५ पर्यंत | |
| ५ | असि. प्रोफेसर अॅन्ड डायरेक्टर (२७ पदे) | पदव्युत्तर पदवी (५५%) गुणांसह उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३५ पर्यंत | |
| ४) | **लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि. लातूर, LDCCBL** | | | |
| १ | लिपीक (२५० पदे) | पदवी (६०%) व MS-CIT कोर्स उत्तीर्ण | ३० पर्यंत | २१/०१/२६ |
| २ | शिपाई (११५ पदे) | बारावी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | |
| ३ | वाहन चालक (१० पदे) | पदवी (६०%) व LMV परवाना | २८ पर्यंत | |
| ५) | **मुंबई उच्च न्यायालय, BHC** | | | |
| १ | शिपाई (८८७ पदे) | सातवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | ०५/०१/२६ |
| २ | लिपीक (१३३२ पदे) | पदवी व इंग्रजी ४० टायपिंग उत्तीर्ण व MS-CIT कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ३ | वाहनचालक (३७ पदे) | दहावी व हलके वाहन परवाना तसेच ३ वर्षे अनुभव आवश्यक | ३८ पर्यंत | |
| ४ | लघुलेखक (७५ पदे) | पदवी व टायपिंग - स्टेनो उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ६) | **राष्ट्रीय संरक्षण व नौदल अकॅडमी, NDA & NA** | | | |
| १ | NDA & NA (३९४ पदे) | बारावी उत्तीर्ण किंवा ॲपिअर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | १९ पर्यंत | ३०/१२/२५ |
| ७) | **केंद्रीय लोकसेवा आयोग, UPSC** | | | |
| १ | संयुक्त संरक्षण सेवा परिक्षा CDS 2026 (४५१ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार किंवा पदवी ॲपिअर असावे. | २३ पर्यंत | ३०/१२/२५ |
| ८) | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, MJP** | | | |
| १ | लिपीक (४६ पदे) | पदवी व इंग्रजी/मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | २६/१२/२५ |
| २ | क. अभियंता (१६० पदे) | डिप्लोमा (सिव्हिल/मेकॅ/ऑटो) | ३८ पर्यंत | |
| ३ | सहा. भांडारपाल (१३ पदे) | दहावी व इंग्रजी/मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. www.uttamseva.org

## नळदुर्ग नगरपरिषद कार्यालय

### जाहिर निविदा साल सन २०२५-२०२६

**जा.क्र./नपन १७००/यात्रा/२०२५-२०२६** **दिनांक २२/१२/२०२५**

सर्व पात्र उत्पादक / अधिकतृ विक्रेत / अनुज्ञप्तीधारक यांचेडून खालील तपशीलाप्रमाणे द्विलिफाफा पध्दतीने जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

सर्व व्यावसायिकांना कळविण्यात येते की, श्री क्षेत्र मैलारपूर खंडोबा यात्रा २०२५-२०२६ करिता खालीलप्रमाणे कामे करण्याकरिता परवानाधारक व्यावसायिकांकडून प्रसिध्दीकरण करुन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक व्यावसायिकांनी दिनांक २३/१२/२०२५ ते २९/१२/२०२५ रोजी दुपारी ०२.०० नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत द्विलिफाफा पध्दतीने निविदा सादर करावे. निविदाबाबतचे सविस्तर जाहीर प्रसिध्दीकरणाचे अटी व शर्ती नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर डकविण्यात आलेले आहे. निविदाबाबतचे अधिक माहितीसाठी नगर परिषदेच्या यात्रा / भांडार विभागाशी संपर्क साधावा.

| अ. क्र. | साहित्याचा कामाचा तपशील | निविदा भरण्याची दिनांक व वेळ | निविदा उघडण्याची वेळ व दिनांक | टेंडर निविदा फॉर्म विक्री | टेंडरसोबत अनामत रक्कम | सुरक्षा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | छबिन्यासाठी काटी सजावट करणे (जनरेटर, रोषणाईसह) | २३/१२/२०२५ ते २९/१२/२०२५ सकाळी १०.०० ते ०२.०० पर्यंत | २९/१२/२०२५ दुपारी ४.०० किंवा प्रशासकीय सोयीनुसार | ३००/- | ५००/- | १,०००/- |
| २ | शोभेची दारू गोळा उडविणे | | | ३००/- | ५००/- | १,०००/- |
| ३ | वाजंत्री पुरवठा करणे | | | ३००/- | ५००/- | १,०००/- |
| ४ | वाहन प्रवेश फी वसुली (तीन चाकी / चार चाकी) | | | ३००/- | ५००/- | १०,०००/- |
| ५ | तात्पुरते व्यवसाय परवाना फी व जागा भाडे वसुली (दुकाने) | | | ३००/- | ५००/- | १०,०००/- |
| ६ | विद्युत टॉवर उभारणे | | | ३००/- | ५००/- | १०,०००/- |
| ७ | विद्युत व्यवस्था | | | ३००/- | ५००/- | ५,०००/- |

**अटी व शर्ती :-**

✻ नियम व अटी नगर परिषद नळदुर्ग कार्यालय यात्रा / भांडार विभागात व नोटीस बोर्डावर डकविण्यात आली पाहण्यासाठी उपलब्ध असतील.

✻ कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद नळदुर्ग यांनी राखून ठेवलेलाफाहे.
नगर परिषद नळदुर्गतर्फे व करिता

**स्वाक्षरीत/-**
**भांडार / यात्रा विभागप्रमुख**
**नगर परिषद, नळदुर्ग**

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, नळदुर्ग**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### हॉकी इंडिया लीगच्या तिकिट उपलब्ध

**नवी दिल्ली** : आगामी हॉकी इंडिया लीग (एचआयएल) २०२५-२६ चे सामने थेट पाहण्यास उत्सुक असलेल्या चाहत्यांसाठी तिकिटे विनामूल्य असतील. अनेक शहरांमध्ये या खेळाचा चाहतावर्ग वाढवण्याच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे, अशी घोषणा हॉकी इंडियाने सोमवारी केली. महिलांची एचआयएल २८ डिसेंबर रोजी रांचीमध्ये सुरू होईल आणि १० जानेवारी रोजी संपेल. पुरुषांची एचआयएल ३ जानेवारी रोजी चेन्नईमध्ये सुरू होईल, त्यानंतर ११ जानेवारीपासून ती रांचीमध्ये खेळली जाईल. अंतिम टप्पा १७ ते २६ जानेवारी दरम्यान हॉकीचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भुवनेश्वरमध्ये आयोजित केला जाईल. हिरो एचआयएलच्या रांची टप्प्यासाठी तिकिटांची विक्री आज सकाळी ११:०० वाजता सुरू झाली, तर हिरो पुरुषांच्या एचआयएल चेन्नईसाठी तिकिटे बुधवारपासून सकाळी ११:०० वाजता उपलब्ध होतील. मागील हंगामाप्रमाणेच, हॉकी इंडिया देशाच्या प्रत्येक भागात हा खेळ पोहोचवण्यासाठी आणि आपल्या उत्साही चाहत्यांसाठी तो अधिक सुलभ करण्यासाठी कटिबद्ध आहे. आम्ही पुन्हा एकदा हॉकी चाहत्यांना चेन्नई, रांची आणि भुवनेश्वरमधील सर्व सामन्यांचा आनंद घेण्यासाठी विनामूल्य तिकिटे देण्याचा निर्णय घेतला आहे. महिलांचे सामने रांचीमध्ये होतील, तर पुरुषांची एचआयएल तीन शहरांमध्ये खेळली जाईल. आम्हाला हॉकी स्टेडियम चाहत्यांनी भरलेली पाहायची आहेत, जे त्यांच्या आवडत्या खेळाडूंना मैदानात पाहू इच्छितात. या हंगामात जगातील काही अव्वल खेळाडू सहभागी होणार आहेत आणि आम्ही एका महिन्याच्या कालावधीत काही शानदार हॉकी पाहण्यास उत्सुक आहोत, असे हॉकी इंडिया लीग नियामक समितीचे अध्यक्ष दिलीप तिर्की म्हणाले.

### के. गौतम निवृत्त



**बंगळुरू** : कर्नाटकचा माजी ऑफस्पिनर के. गौतमने क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्याने सोमवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर भारताचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील नवीन कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. ३७ वर्षीय कृष्णप्पा गौतमने जवळपास १४ वर्षांच्या कारकिर्दीत कर्नाटकसाठी सर्व फॉरमॅटमध्ये ३९४ बळी आणि २७८३ धावा केल्या, यात रणजी करंडकातील एक शतक व पाच अर्धशतकांचा समावेश आहे. त्याच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा क्षण २०१८-१९ मध्ये आला, जेव्हा त्याने कर्नाटकच्या सय्यद मुश्ताक अली चषक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. २०२१ मध्ये, सुरुवातीला नेट गोलंदाज म्हणून निवड झाल्यानंतर श्रीलंकेच्या दौऱ्यावर संघातील निम्म्याहून अधिक खेळाडूंना कोरोनाची लागण झाल्यामुळे गौतमला भारताकडून खेळण्याची संधी मिळाली. त्याने आपल्या एकमेव एकदिवसीय सामन्यात ४९ धावांत १ बळी घेतला. गौतमला राजस्थान रॉयल्ससोबत असताना आयपीएलमध्ये थोडे यश मिळाले. २०१८ मध्ये, दिवंगत



### सम्राट बोबडेची भेदक गोलंदाजी; युनायटेडची मास्टर अकादमीवर मात

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत सम्राट बोबडेच्या भेदक गोलंदाजीमुळे युनायटेट क्रिकेट क्लबने मास्टर्स अकादमीवर ६४ धावांनी मात केली. डोणगावर रस्त्यावरील पुष्प अकादमीच्या मैदानावर सोमवारी झालेल्या सामन्यात युनायटेडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ४७.३ षटकांत सर्वबाद १७८ धावा केल्या, यात अभय अजरापूरकर ४९ व पुष्कर पवारने ३४ धावा केल्या. मास्टर्सकडून कुशाग्र वाघजने २३ धावांत ४ बळी, निर्वीक बनसोडे ४० धावांत २ बळी तर ओम धोत्रे १७ धावांत २ बळी घेतले. विजय लक्ष्य गाठणाऱ्या मास्टर्स क्रिकेट अकादमीचा डाव ४१ षटकांत ११७ धावांत आटोपला. युनायटेडच्या सम्राट बोबडे ९ धावांत ६ बळी घेतले. सम्राट सामन्याचा मानकरी ठरला.

# विजय हजारे चषकांत दिग्गज खेळणार

## सूर्यकुमार दोन सामने खेळणार

**◆ नवी दिल्ली, २२ डिसेंबर**


भारताचा टी-२० संघ कर्णधार सूर्यकुमार यादव आणि अष्टपैलू शिवम दुबेने आगामी ६ व ८ जानेवारी रोजी होणाऱ्या विजय हजारे चषकाच्या दोन सामन्यांसाठी आपली उपलब्धता मुंबई क्रिकेट संघटनेला (एमसीए) कळवली आहे.



मुंबईच्या एकदिवसीय क्रिकेट मोहिमेला २४ डिसेंबरपासून जयपूरमध्ये सुरुवात होणार असून त्यांचा पहिला साखळी सामना बुधवारी सिक्कीमविरुद्ध होईल. सूर्यकुमार व दुबे ६ जानेवारी रोजी हिमाचल प्रदेशविरुद्ध व त्यानंतर दोन दिवसांनी पंजाबविरुद्धच्या सामन्यांमध्ये खेळणार आहेत.

रोहित शर्मा सध्या दोन लीग सामने खेळणार आहे, असे एमसीएच्या पदाधिकाऱ्याने म्हटले आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अलीकडील ३-१ अशा टी-२० मालिका विजयात सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना विजय हजारे चषकांत किमान दोन सामने खेळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बीसीसीआयने आपल्या करारबद्ध खेळाडूंना ही अट कळवली आहे, त्यामुळे देशांतर्गत क्रिकेटमधील सहभाग वाढवण्याच्या प्रयत्नांना चालना मिळत आहे.



या वर्षाच्या सुरुवातीला, निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी वेळापत्रकानुसार शक्य असेल तेव्हा देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळण्याच्या महत्त्वावर भर दिला होता.

भारतीय टी-२० संघाला जवळपास एक महिन्याची विश्रांती मिळणार आहे, त्यानंतर ते २१ जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यासाठी नागपूरमध्ये पुन्हा एकत्र येतील. ही मालिका भारताची टी-२० विश्वचषक स्पर्धेपूर्वीची शेवटची मालिका असेल, जिथे भारत ७ फेब्रुवारी रोजी मुंबईतील प्रतिष्ठि वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेविरुद्ध आपल्या विजेतेपदाच्या बचावाला सुरुवात करेल.

दरम्यान, रोहित व मुंबईचा कर्णधार शार्दुल सोमवारी जयपूरमध्ये दाखल होण्याची आणि दुसऱ्या दिवशी सराव सत्रात भाग घेण्याची शक्यता आहे. स्पर्धेतील मुंबईचे पहिले दोन सामने २४ डिसेंबर रोजी सिक्कीमविरुद्ध व२६ डिसेंबर रोजी उत्तराखंडविरुद्ध होणार आहेत. हे दोन्ही सामने जयपूरमध्ये खेळले जातील.

◀(वृत्तसंस्था)

### ईशान किशन झारखंड संघाच्या कर्णधारपदी

**रांची** : भारतीय यष्टिरक्षक-फलंदाज ईशान किशनची आगामी विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेसाठी झारखंड संघाचा कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे, अशी माहिती झारखंड राज्य क्रिकेट संघटनेने दिली. ही देशांतर्गत वन-डे क्रिकेट स्पर्धा २४ डिसेंबरपासून सुरू होत आहे, ज्यात झारखंड आपला पहिला सामना अहमदाबादमध्ये कर्नाटकविरुद्ध खेळणार आहे.



या हंगामासाठी जाहीर केलेल्या संघात अनुभव आणि युवा खेळाडूंचा मेळ आहे, यात कुमार कुशाग्रा, अनुकूल रॉय, रॉबिन मिन्झ, अभिनव शरण आणि विराट सिंगचा समावेश आहे.

ईशान किशनची कर्णधारपदी निवड त्याच्या सय्यद मुश्ताक अली चषकातील विजयी कामगिरीनंतर झाली आहे. या स्पर्धेत त्याने झारखंडला पहिलेवहिले विजेतेपद मिळवून दिले. या स्पर्धेत हा यष्टिरक्षक-फलंदाज उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता, त्याने १० डावांमध्ये ५७.४४ च्या सरासरीने ५१७ धावा केल्या, ज्यात दोन शतके आणि दोन अर्धशतकांचा समावेश होता. अंतिम सामन्यात हरयाणाविरुद्ध त्याने साकारलेली १०१ धावांची दमदार खेळी त्याच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा क्षण ठरली, ज्यामुळे त्याच्या संघाने विजेतेपद पटकावले.

या कामगिरीमुळे किशनला आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ साठी भारतीय संघात पुन्हा स्थान मिळाले आहे. त्याला संजू सॅमसननंतर संघाचा दुसरा यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून संघात समाविष्ट करण्यात आले आहे.

### पंजाब संघात गिल, अभिषेक, अर्शदीपचा समावेश

**चंदीगड** : भारतीय एकदिवसीय संघाचा कर्णधार शुभमन गिल, प्रथम विश्वमानांकित टी-२० फलंदाज अभिषेक शर्मा व वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग यांची सोमवारी विजय हजारे चषकासाठी पंजाब संघात निवड करण्यात आली आहे.

भारताच्या टी-२० विश्वचषक संघातून वगळण्यात आलेला गिल आणि मर्यादित षटकांच्या क्रिकेटमधील नियमित खेळाडू असलेला अर्शदीप, हे दोघे कदाचित केवळ दोन ते तीन सामन्यांसाठी उपलब्ध असतील, कारण न्यूझीलंडविरुद्धची एकदिवसीय मालिका ११ जानेवारीपासून सुरू होणार आहे.

मुंबईसोबत क गटात असलेल्या पंजाबचा पहिला सामना महाराष्ट्र (२४ डिसेंबर) आणि दुसरा सामना छत्तीसगड (२६ डिसेंबर) विरुद्ध होईल. या सामन्यांमध्ये गिल व अर्शदीप यांच्या उपलब्धतेची अपेक्षा आहे.

केवळ टी-२० सामन्यांसाठी निवडला जाणारा अभिषेक, कदाचित अधिक सामन्यांसाठी उपलब्ध असेल.

जयपूरमध्ये होणारा मुंबई विरुद्ध पंजाब हा महत्त्वाचा सामना ८ जानेवारी रोजी होणार आहे आणि तोपर्यंत मुंबईचा रोहित शर्मा आणि पंजाबचा गिल दोघेही उपलब्ध नसतील.

## पदार्पणात बळी न मिळाल्याने निराश नाही : वैष्णवी शर्मा



वैष्णवी शर्माला कॅप प्रदान करताना हरमनप्रीत कौर

**◆ विशाखापट्टणम्, २२ डिसेंबर**

महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात पदार्पणात बळी न मिळाल्याबद्दल कोणतीही निराशा नाही, उलट आपल्या कामगिरीवर समाधानी असून आपल्या योजनांची अंमलबजावणी केल्याबद्दल खूप खूश आहे, असे युवा भारतीय डावखुरी फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्माने सांगितले. नवोदित खेळाडूंप्रमाणेच, तिलाही थोडी धाकधूक वाटणे स्वाभाविक होते, मात्र सामना सुरू होण्यापूर्वीची भीती कमी करण्यासाठी राष्ट्रगीत ऐकल्याने मदत झाल्याचेही तिने सांगितले.

२० वर्षीय वैष्णवीने श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात प्रभावी आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. तिने चार षटकांत केवळ १६ धावा देत एकही बळी न टिपता किफायतशीर गोलंदाजी केली, त्यामुळे भारताने आठ गडी राखून सहज विजय मिळवला.

वैष्णवीने आपल्या गोलंदाजीदरम्यान सातत्यपूर्ण दबाव निर्माण केला, श्रीलंकेच्या फलंदाजांना धावा काढण्याची फारशी संधी दिली नाही. भारताने पाहुण्या संघाला ६ बाद १२१ धावांवर रोखले आणि ३२ चेंडू शिल्लक असतनाच लक्ष्य गाठले.

माझ्या योजनेची अंमलबजावणी करू शकले, मालिकेतील अजून चार सामने शिल्लक आहेत, मंगळवारी याच ठिकाणी दुसरा सामना होणार आहे, असे वैष्णवीने सांगितले.

◀(वृत्तसंस्था)

# महिलांमध्ये धाराशिव तर पुरुषांमध्ये पुणे अजिंक्य

- ६१ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा
- पुरुष-पुण्याची हॅट्रिक, महिला-धाराशिवचे दुसरे जेतेपद
- पुण्याचा थोरात व धाराशिवची अश्विनी शिंदे अष्टपैलू





**तभा वृत्तसेवा,**
**बीड, दि. २२ डिसेंबर-**

बीड येथील श्रीमती योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात पार पडलेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महिलांच्या गटात धाराशिव तर पुरुषांच्या गटात पुणे संघाने विजेतेपद पटकावत आपला दबदबा कायम राखला. पुरुष गटात पुण्याने सलग हॅट्रिक साधली, तर महिलांमध्ये धाराशिवने सलग दुसऱ्या वर्षी राज्य अजिंक्यपदावर आपले नाव कोरले. या स्पर्धेत पुण्याचा शुभम थोरात आणि धाराशिवची अश्विनी शिंदे अष्टपैलू खेळाडू ठरले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण पोलीस अध्यक्ष नवनीत कॉवत, कामगार विमा संचालक डॉ.अशोक थोरात जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्याधर, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जे.पी शेळके ॲमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, सचिव विजय जाहेर यांच्यासह महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांच्या हस्ते पार पडले.

**धाराशिवची पुण्यावर थरारक मात**

महिलांच्या अंतिम सामन्यात धाराशिव विरुद्ध पुणे अशी चुरशीची लढत पाहायला मिळाली. अखेर धाराशिवने पुण्यावर २८२६ असा २ गुणांनी निसटता विजय मिळवत अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केले. सामन्यात दोन्ही संघांना ड्रीम रनचे प्रत्येकी ४ गुण मिळाले. धाराशिवकडून मैथिली पवार (१.५२, १.२० मि. संरक्षण व ६ गुण), अश्विनी शिंदे (२.२०, २.५० मि. संरक्षण व ४ गुण), संध्या सुरवसे (१.५० मि. संरक्षण व ४ गुण), संपदा मोरे (२.१० मि. संरक्षण व २ गुण), सुहानी धोत्रे (१.२० मि. संरक्षण व २ गुण) यांनी संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. पुण्याकडून प्रियांका इंगळे (२.१०, १.५० मि. संरक्षण व ४ गुण), कोमल धारवाटकर (१.४० व १.२० मि. संरक्षण), श्वेता नवले (नाबाद १.२० व २.०० मि. संरक्षण), भाग्यश्री बडे (६ गुण) यांनी झुंजार खेळ करत सामना शेवटपर्यंत रंगतदार ठेवला.

**पुण्याचा मुंबई उपनगरवर कडवा विजय**

पुरुषांच्या अंतिम सामन्यात पुणे विरुद्ध मुंबई उपनगर अशी प्रतिष्ठेची लढत झाली. मध्यंतराला दोन्ही संघ १६१६ अशा बरोबरीत होते. मात्र अखेरच्या क्षणी पुण्याने संयम राखत मुंबई उपनगरवर ३४३२ असा २ गुणांनी निसटता विजय मिळवून अजिंक्यपदाची हॅट्रिक साकारली.

पुण्याकडून शुभम थोरात (१.४० मि. संरक्षण व ४ गुण), सुयश गरगटे (१.३० मि. संरक्षण व ८ गुण), रविकिरण कचवे (६ गुण), प्रतीक वाईकर (१.४० व १.१५ मि. संरक्षण) यांनी निर्णायक कामगिरी केली. मुंबई उपनगरकडून अनिकेत चेंदवणकर (१.४५, १.२५ मि. संरक्षण व ८ गुण), निहार दुबळे (१.१० मि. संरक्षण व ४ गुण), धीरज भावे (नाबाद १.३०, १.०५ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी प्रभावी खेळ करत शेवटपर्यंत झुंज दिली.

**वैयक्तिक पुरस्कार विजेते**

राजे संभाजी पुरस्कार (अष्टपैलू खेळाडू) : शुभम थोरात (पुणे), उत्कृष्ट संरक्षक : अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर), उत्कृष्ट आक्रमक : सुयश गरगटे (पुणे). अहिल्या पुरस्कार (अष्टपैलू खेळाडू) : अश्विनी शिंदे (धाराशिव), उत्कृष्ट संरक्षक : प्रियांका इंगळे (पुणे), उत्कृष्ट आक्रमक : मैत्री पवार (धाराशिव)



# खुल्या गटात सौरव साहू, तेरा वर्षे गटात साईराज घोडके अजिंक्य

## पूर्वविभाग सार्वजनिक वाचनालय सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

पूर्वविभाग सार्वजनिक वाचनालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या बुध्दिबळ स्पर्धेत खुल्या गटात सौरव साहू व तेरा वर्षे गटात साईराज घोडके अजिंक्यपद पटकाविले.

या स्पर्धेचे आयोजन पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय व श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या संयुक्त विद्यमाने केले होते. सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने स्पर्धेचे बक्षीस वितरण दयानंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.विजयकुमार उबाळे, डॉ.प्रा.राजशेखर शिंदे वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक, पूर्व विभाग वाचनालयाचे उपाध्यक्ष देविदास गोटीपामूल,कार्यवाहक अरविंद चिन्नी, सहकार्यवाह विजयकुमार गुल्लापल्ली यांच्या हस्ते पार पडले.

**अंतिम गुणानुक्रमे निकालः उत्तेजनार्थ** : शौर्य चंदनशिवे, अर्णव जटला, ऋषिकेश बुवा, श्रेयांश स्वामी, अर्पित घडगे, प्रतीक्षा चाबुकस्वार, आदित्य कुंभार, समर्थ हतुरे, अक्षरा जाधव, अक्षत क्षीरसागर

**आठ वर्षाखालील** : नमन रंगरेज, अथर्व दणाणे, श्रेयस हक्के, ऋषभ पमनानी, प्रज्ञेश काबरा, श्रेया पैकेकरी, सावनिक खडतकर, पांडुरंग जाधव, आयुष बडवणे, विवेक स्वामी, चव्हाण आरव, आहान चंदनशिवे, श्रवण हाके.

**नऊ वर्षाखालील** : मयूर स्वामी, नैतिक होटकर, हिमांशू व्हनगावडे, प्रथम मुदगी, हर्ष मुसळे, नचिकेत तोंडले, आदित्य जान गवळी, श्लोक सदाफुले, समृद्धी कसबे, गायकवाड संदेश, तनुजा गावडे, श्रद्धा हाके, श्रीधर कुरापाटी.

**दहा वर्षाखालील** : विहान कोंगारी, सृष्टी मुसळे, श्रेयस इंगळे, प्रतिक हलमल्ली, अमेय खडबडे, संमेक सावंत, श्रेयस कोरे, शिवांश सरवदे, श्रेयस कंदीकटला, ओजस्वी बोराळे, श्रेयस बिराजदार, जोशी श्री, पैकेकरी श्रीरंग.

**बारा वर्षाखालील** : मुसळे वेदांत, अजिंक्य पाटील, प्रसेंजित जांभळे, आयुष्य जानगवळी, अदिती इनानी,आदित्य कसबे, वेदांत अकेन, विदित काबरा, फरहान दर्जी, वेदांत पवार,गोवर्धनी मिठ्ठा, जमादार शशांक, ध्रुव नवले, प्रज्ञेश महाडकर, आदित्य सोनी.

**तेरा वर्षाखालीलः** साईराज घोडके, सानिध्य जमादार, संस्कार तोडकरी, गौरव पाटील, अभय गोसकी, राजमाने नागेश, मयुरेश स्वामी, सृष्टी तोंडले, मिलिंद काटवे, तारक चिंचोळकर, निखिल मुटकरी.

**पंचवीस वर्षाखालील** : पॉल आशिष, समर्थ पाटील, अमित मुदगुंडी, गणेश पवार, सिद्धांत चव्हाण, यशवंत उबाळे, ओंकार कारवेकर, हर्ष हलमल्ली, नियन कंदिकटला, फैयाज शेख, सुप्रीत घनाते,

**खुला गट** : साहू सौरव, विशाल पटवर्धन, अधिराज म्हेत्रे, सागर गांधी, प्रसन्न जगदाळे, अभिजीत संगा, चंद्रशेखर बसर्गीकर, देवराज कान्हेरे, अरुज हराळकर, स्वप्निल हदगल, प्रतिक वल्लाकाटी.

# स्वामी विवेकानंद एमआयडीसी व जुळे सोलापूरला दुहेरी मुकुट

## जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या क्रीडा सप्ताहानिमित्त स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

क्रीडा सप्ताहानिमित्त जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने झालेल्या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात व्हॉलिबॉलमध्ये एमआयडीसीच्या स्वामी विवेकानंद प्रशालेने व खो-खो स्पर्धेत जुळे सोलापूरच्या स्वामी विवेकानंद प्रशालेने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

क्रीडा सप्ताह समारोप व बक्षीस वितरण शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी हाजी मलंग नदाफ, सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेम्बर्सू, क्रीडा शिक्षक राजेंद्र गोटे, उपमहाराष्ट्र केसरी भरत मेकाले यांच्या हस्ते करण्या आले. प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले. याप्रसंगी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड, क्रीडा अधिकारी नदीम शेख, निवृत्त तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, आर्चरी क्रीडा मार्गदर्शक दिपक चिकणे, सागर राठोड विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू त्यांचे पालक उपस्थित होते.

**अंतिम निकाल याप्रमाणे : वैयक्तिक (प्रथम तीन)**

**धनुर्विद्या : इंडियन रांऊड** : १० वर्षाखालील मुले : स्वरांग विश्वास गायकवाड (नू.म.वि.). १५ वर्षाखालील मुले : मयूरेश हुमनाबादकर, श्रेयश पाटील ( दोघे एस.आर.चंडक हायस्कूल), झेनाउद्दीन शेख(लिटील फ्लॉवर स्कूल). मुली :अश्विनी गंगाधर चाकोते, नाव्या प्रतिक पडोलोया(दोघी एस.आर. चंडक हायस्कूल). १३ वर्षाखालील मुली :मृणाल उत्तम सुर्वे (पोतदार स्कूल), संस्कृत्ती गंगाधर चाकोते (महेश स्कूल), वैष्णवी जितेंद्र पोळ (छत्रपती शिवाली प्रशाला).

**रिकर्व्ह** :१७ वर्षाखालील मुली : देवयणी सूरज तिवारी (मॉडेल पब्लिक स्कूल), सर्वज्ञा संतोष गाढवे (छत्रपती शिवाजी प्रशाला).

**कंपाऊंड** : १४ वर्षाखालील मुली : स्वरा खरात (मॉडेल पब्लिक स्कूल), १० वर्षाखालील मुली : हर्षिनी धनजंय गजेली (श्री चैतन्य टेक्नो स्कूल), १९ वर्षाखालील मुली : प्रेरणा हरिदास ( छ त्र प ती रात्र शिवाजी महाविदयालय), १० वर्षाखालील मुले : आयुश माने (एस.व्ही.सी.एस.एच.एस.), वेंद दूधनीकरण (एस.आर. चंडक हायस्कूल). १३ वर्षाखालील मुले : दक्ष प्रकाश लंबे, इंद्रजित उत्तम सुर्वे ( दोघे पोतदार इंटरनॅशनल स्कूल), सिध्दांत संतोष गाढवे (व्हलेटांईन सर्कल इंग्लिश स्कूल). १७ वर्षाखालील मुले : जय प्रकाश जाधव श्री.महालक्ष्मी प्रशाला), ओम पाखरे (निर्मलाताई ठोकळ प्रशला), आदित्य पवार (व्ही. एम. मेहता स्कूल). मुली : वैभवी सौदागर निकम (श्री.महालक्ष्मी प्रशाला), दिक्षा विश्वास गायकवाड (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूल).

**स्केटींग : क्वॉड** : ११ वर्षाखालील मुले : असित नितिन कांबळे (सुयश सेंट्रंल स्कूल), देवांश सचिन सरवदे (सेंट जोसेफ स्कूल). मुली : स्वानंदी स्वामीनाथ काळे (सुयश सेंट्रंल स्कूल).

**इनलाइन** : ११ वर्षाखालील मुले :शर्विल संतोष माळवतकर (इंडियन मॉडेल स्कूल). मुली : लास्या नरेंद्र शेरला (व्हेलन्टाईन सर्कल स्कूल).

**बिगीनिअर** : ११ वर्षाखालील मुले : आदर्श बाबासाहेब भगत (पुष्पागुप्ता दयानंद मॉडेल), धैर्यशील हेमंतकुमार साका (व्हेलेटांन्इन इंग्लिश स्कूल),

**क्वॉड** - १४ वर्षाखालील मुलीः स्वराली स्वामीनाथ काळे (सुयश सेंट्रंल स्कूल), अक्षता पवनकुमार बिरोळी (इंडियन मॉडेल स्कूल), वर्षा सुभाष मुलगे (सिध्देश्वर बालक मंदीर), : मुले : प्रथमेश मच्छिंद्रनाथ चौगुले (वीर तपस्वी स्कूल). १७ वर्षाखालील मुली : स्नेहा साईनाथ बोकडे (इंडियन मॉडेल स्कूल), वैष्णवी संजयकुमार जेऊरगी (सिध्देश्वर कन्या प्रशाला).

**इनलाइन** : १४ वर्षाखालील मुली : उतरा आनंद पोतदार (सिध्देश्वर कन्या प्रशाला), मुले : सारंग सागर मठपती (के.एल.ई. स्कूल),

**सांघिक निकाल (विजयी व उपविजयी)**

**व्हॉलीबॉल** : १७ वर्षाखालील मुले : स्वामी विवेकांनद प्रशाला एम.आय.डी.सी. वि. वि. रोशन शिक्षण संकुल. मुली : स्वामी विवेकांनद प्रशाला एम.आ.डी.सी. वि. वि. ए. डी. शेख उर्दू स्कूल किसान नगर. **कबड्डी** : १४ वर्षाखालील मुले : जागृती विदयामंदीर प्रशाला वि. वि. स्वामी विवेकानंद प्रशाला जुळे सोलापूर.

**खो-खो** : १४ वर्षाखालील मुले : स्वामी विवेकानंद प्रशाला जुळे सोलापूर वि. वि. कर्मवीर विदयालय चारे, ता. बार्शी. मुली : स्वामी विवेकानंद प्रशाला जुळे सोलापूर वि.वि. राष्ट्रमाता इंदिरा प्रशाला एम.आय.डी.सी सोलापूर.

## महत्वाचे...

### ॲड. राजेश कांबळे खून खटला; एकाची महत्त्वपूर्ण साक्ष

**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

ॲड. राजेश श्रीमंत कांबळे वय ४५ राहणार ४३, ब्रह्मचैतन्य नगर नवीन आर.टी.ओ. सोलापूर याचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, अँड सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास महांकाळी येलदी यांच्यावर भरलेल्या खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे.जे.मोहिते यांच्यासमोर सुरू झाली. सोमवारी साक्षीदार पो.का.हरीश पवार यांनी आपले साक्षीत दिनांक १७ जून २०१९ रोजी गुन्ह्यातील जप्त मुद्देमालचे एकूण २६ सीलबंद पाकीट हे तपासणी साठी न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा पुणे येथे दिले व दिलेबाबत पोहोच घेतली अशी महत्वपूर्ण साक्ष नोंदवली. त्यावर आरोपींच्या वकिलांनी घेतलेल्या उलट तपासास साक्षीदारांनी नकारात्मक उत्तरे दिली. पुढील सुनावणी ही दि.२८ जानेवारी २०२६ तारीख देण्यात आली. या खटल्यात विशेष सरकारी वकील अँड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे अँड.मिलिंद थोबडे,अँड.विनोद सूर्यवंशी तर आरोपी नंबर १ तर्फे अँड राजेंद्र फताटे, आरोपी नंबर २ स्वतः आरोपी नंबर ३ तर्फे अँड जयदिप माने हे काम पाहत आहेत.



### बार्शीच्या विश्वजित रोलर स्केटिंगची ५ पदकांची कमाई

**बार्शी दि. २२ डिसेंबर**

क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड व रोलर बास्केटबॉल स्केटिंग असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमानाने झालेल्या राज्य स्केटिंग स्पर्धेत बार्शीच्या विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबच्या खेळाडूंनी ५ पदकांची कमाई केली. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, उपाध्यक्ष व प्रशिक्षक गणेश रोडे, सचिव सविता जाधव, स्नेहल रोडे, संचिती जाधव, विश्वजीत जाधव, आदित्य माळी, यश नान्नजकर, सोहम देशमुख, पृथ्वीराज जाधव, नेहा घाडगे यांनी अभिनंदन केले आहे. **पदकप्राप्त खेळाडू** : सुवर्ण : यशराज रोडे. रौप्य : स्वरा निंबर्गी, आरव ढोले. ब्रॉंझ : अर्णव फल्ले, अथर्व भूजबळ.

### ब्रह्मवादिनी संस्थेचा संक्रांत महोत्सव

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

येथील ब्रह्मवादिनी सोलापूर महिलांच्या सामाजिक संस्थेच्यावतीने येत्या ३ व ४ जानेवारी रोजी सारस्वत मंगल कार्यालयात 'संक्रांत महोत्सव' आयोजित केला आहे. महिला उद्योजकांसाठी विविध वस्तूंचे भव्य प्रदर्शनात ठेवण्यात येणाऱ्या वस्तूंची विक्री देखील करण्यात येईल, अशी माहिती डॉ. एकता कुलकर्णी यांनी दिली. महिला उद्योजकांनी नावनोंदणीसाठी डॉ. कुलकर्णी (९०४६०२४१३) व स्वाती जोशी (७७०९८७६४२६) यांच्याशी संपर्क साधावा.

# महिलेची छेड काढणाऱ्यास सश्रम कारावासाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

महिलेची छेड काढणाऱ्यास न्यायालयाने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. दि. २९ ऑक्टोबर २०२३ रोजी फिर्यादी ह्या त्यांच्या शेता मध्ये कांद्याच्या पिकात गवत काढणे करीता गेल्या असता आरोपी लक्ष्मण दत्तात्रय गवळी यांनी फिर्यादी ह्या शेतात एकटी असल्याचा गैरफायदा घेऊन कांद्यात खूप गवत झाले आहे असे म्हणुन तिच्या उजव्या हाताला पकडुन चल जाऊ तिकडे असे म्हणुन तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले होते म्हणुन फिर्यादी यांनी सोलापूर तालुका, पोलीस ठाणेस दिलेल्या फिर्यादी वरून आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३५४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.



सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक नागाबाई गंपले, नेमणुक सोलापूर तालुका, पोलीस ठाणे यांनी करून गुन्हयातील आरोपी विरूध्द दोषारोप पत्र सादर केले होते.

या गुन्हयाची दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी ऐश्वर्या जाधव, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं.२ सोलापूर यांचे न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवुन आरोपी लक्ष्मण दत्तात्रय माळी, रा. कौठाळी ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर यास ६ महिने तुरूंगवास, ५,०००/- रूपये द्रव्य दंडाची रक्कम व गुन्हयातील पिडीत हिस ३,०००/- रूपये नुकसान भरपाई देण्याची शिक्षा ठोठावली आहे. या खटल्यामध्ये सरकार पक्षा तर्फे एकूण ८ साक्षीदार तपासले. यामध्ये मुळ फिर्यादी, पंच साक्षीदार व गुन्हयाचे तपासिक अंमलदार यांची साक्ष महत्वाची ठरली आहे. सदर खटल्यामध्ये अमोघसिध्द कोरे, सहायक सरकारी अभियोक्ता, मुळ फिर्यादी यांचे तर्फे भडकुंबे वकील यांनी काम पाहिले आहे. सदरच्या गुन्हयामध्ये दोषसिध्दी होणे करीता संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर ग्रामीण उपविभाग सोलापूर व राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका, पोलीस ठाणे यांनी मार्गदर्शन केले आहे. कोर्ट पैरवी म्हणुन सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार सुरेश राठोड यांनी कामकाज पाहिले.



## सांगोला महाविद्यालयाच्या शिवणे येथील श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ डिसेंबर -**

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि सांगोला महाविद्यालय व ग्रामपंचायत शिवणे (ता. सांगोला) यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन शिवणे उत्साहात पार पडले. याचे उद्घाटन सां.ता.उ.शि.मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड तसेच सूर्योदय फाउंडेशनचे अनिल इंगोले, शिवणे विद्यालयाचे उपाध्यक्ष प्रकाश वाघमोडे, सरपंच दादासाहेब घाडगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, शिवणे हायस्कूलचे प्राचार्य विजयकुमार वाघमोडे, उपसरपंच प्रियांका शेळके, ग्रा.वि.अधिकारी पांडुरंग एकतपुरे, तलाठी जयश्री कल्लाळे, ग्रा. पं.सदस्य उदयसिंह घाडगे, कुसुम घाडगे, नामदेव जानकर, अंबादास भाटेकर, सुनीता घाडगे, संजय वलेकर, सुनीता इरकर, रंपाबाई ऐवळे हे उपस्थित होते.

अनिल इंगोले यांनी १०० मोठी झाडे दान दिली. याप्रसंगी शिवणे हायस्कूलचे शिक्षक व विद्यार्थी, सांगोला महाविद्यालयातील स्टाफ, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ.सदाशिव देवकर, सूत्रसंचालन डॉ.भाग्यश्री पाटील यांनी केले. आभार डॉ.रेणुकाचार्य खानापुरे यांनी मानले.



## हंचाटे यांची बीएसएनएल कार्यालयास भेट

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

कार्पोरेट ऑफिसच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाराष्ट्र परिमंडल मुंबईचे महारुद्र हंचाटे यांनी सोलापूरला भेट देऊन CGM यांचा संदेश अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवला. बाळीवेस टेलिफोन भवन येथील बैठकीत त्यांनी फायबर टू द होम कनेक्शन्स वाढवणे, उत्पादनांचे प्रभावी मार्केटिंग, ग्राहक शंकांचे तात्काळ निराकरण आणि दर्जेदार सेवा ही सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले.

हंचाटे म्हणाले, सर्कल ऑफिसकडून प्रगतीवर सतत लक्ष आहे. उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करावे. सोलापूर बीएसएनएलमधील अधिकारी व कर्मचारी यांनी कार्पोरेट ऑफिसला पूर्ण सहकार्य देण्याचा संकल्प केला. बैठकीत श्रीकांत मब्रुखाने महाप्रबंधक, विठ्ठल कुलकर्णी उपमहाप्रबंधक, कार्यालय अधीक्षक सुजित हावळे, अनिता पाटील, नितीन माने, उमेश शिंदे, श्रीधर अतनूर, संतोष जेटगी, बिराजदार, त्रिंबके, रवी लिंगनूर, प्रवीण कवडे, राजेश तेलगावकर, अमित पोटफफोडे, रमेश दिबुले, कुमार आळगीकर, मनोज शिंदे, प्रशांत कवडे, अंकोलीकर उपस्थित होते.

# ४० वर्षांनी आले वर्गमित्र एकत्र



**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**


सोलापूर येथील विद्यानिकेतन प्रशालेत १९८५-८६ मध्ये दहावी वर्गात शिकणार्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी ४० वर्षांनी एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला. बाहुसार क्षत्रिय समाज शिक्षण संस्था संचलित विद्यानिकेतन प्रशाला येथील सन १९८५-८६ साली शिकणार्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा संयोजक नंदकिशोर भागवत यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी अनेक माजी विद्यार्थी असणार्या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचार्यांचा समावेश होता. यावेळी उपस्थितांनी सेवानिवृत्त शिक्षकांनी दिलेल्या शिकवणूकीमुळे जीवनात यशस्वी झाल्याचे सांगितले. यावेळी निवृत्त मुख्याध्यापक अप्पासाहेब नागूर , शरदकुमार एकबोटे, मल्लिनाथ स्वामी, सुधा हेमाडे, सुभाष शास्त्री आदी मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यानिकेतन प्रशाला मुख्याध्यापक गोपीनाथ नवले व हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे, उपमुख्याध्यापक श्रीशैल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यानिकेतन प्रशालेचे माजी विद्यार्थी १९८५ बॅच दहावी प्रा.श्रीकृष्ण दासरी मुंबई, उद्योजक दशरथ जवळकर, निवृत्त सेवक इरप्पा शिंपी सब्बण, माया सब्बण हेरलगी व्यापारी, पुणे येथील केटरर्स भारती निंबर्गी, रिझर्व्ह बँक सुपरिंटेंट मयुर लिमकर, गजानन शिरीगेरी, ठाणे येथील उद्योजिका वैशाली हंचाटे, श्रीकांत अंबुरे, नंदकिशोर भागवत, दिनानाथ बासुतकर, बाबू आडकी, इरप्पा शिंपी (सब्बण), शशीधर अंबीगेर, अनिल कंदी, प्रफुल्ल दुधगुंडी, श्रीमती मंजुळा शिंदे, नंदिनी सपार, जयमाला सरवदे,बेबी सोमनाथ आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैशाली हंचाटे यांनी केले.

## निधन वृत्त...

### माणिक बर्वे



**सांगोला, दि.२२ डिसेंबर -**

महूद (ता.सांगोला) येथील रहिवासी बँक ऑफ महाराष्ट्र मधून सेवानिवृत्त झालेले माणिक शंकर बर्वे (वय-७९) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी पुणे येथील खाजगी रुग्णालयात निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### प्रकाश बगाडे



**बार्शी, दि.२२ डिसेंबर-**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील वारणी कामगार संघटनेचे अध्यक्ष प्रकाश विश्वनाथ बगाडे, वय ६३ वर्षे, रा. लहुजी वस्ताद चौक यांचे सोमवारी सकाळी ८ च्या सुमारास हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### गोपाळ रापेल्ली



**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

जुना विडी घरकुल येथील रहिवासी गोपाळ मल्लय्या रापेल्ली (वय ४७) यांचे रविवारी मध्यरात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, एक मुलगी, भाऊ, वहिनी, पुतण्या, पुतणी असा परिवार आहे. श्रुती इंजिनीअर्सचे संचालक, रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसीचे संस्थापक अध्यक्ष परशुराम रापेल्ली यांचे ते धाकटे बंधू होत.

### प्रकाश कानगो



**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

जुळे सोलापुरातील वामन नगरातील निर्मिती समृद्धी अपार्टमेंटमधील रहिवासी प्रकाश बळवंतराव कानगो (५९) यांचे रविवारी (ता. २१) सायंकाळी सव्वापाच वाजता येथील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. सोमवारी (ता. २२) सकाळी त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावाई असा परिवार आहे.

### संगण्णा धनशेट्टी



**अक्कलकोट, दि २२ डिसेंबर-**

तालुक्यातील नागणसूर येथील कै. संगण्णा राचप्पा धनशेट्टी (वय १०५) यांचे सोमवारी सकाळी नागणसूर येथील राहत्या घरी आजाराने दुःख निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.सोमवारी दुपारी त्यांच्यावर नागणसूर शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. अक्कलकोट नगरपालिकेचे नगरसेवक लक्ष्मीकांत धनशेट्टी यांचे व पत्रकार रविकांत धनशेट्टी यांचे ते आजोबा होत.

# चिंचोलीकाटी शाळेत योग वर्गाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

पीएम श्री उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिंचोलीकाटी (ता. मोहोळ) येथे योग वर्गाची सुरुवात करण्यात आली. योग व निसर्गोपचार यात डिप्लोमा मिळिवलेल्या डॉ. गायत्री हजारे या शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी, निरोगी जीवनाची सूत्रे, सकस आहार नियोजन, योगासन, प्राणायाम यांचे धडे देणार आहेत. डॉक्टर हजारे यांना योग व निसर्गोपचार या विषयात दहा वर्षांचा अनुभव असून त्यांनी योगामध्ये मास्टर ही पदवी मिळवलेली आहे.

शिक्षिका शुभांगी सोनवणे व अतिथी निदेशक दीपक गावडे यांच्या प्रयत्नातून या उपक्रमाची सुरुवात झालेली असून मुख्याध्यापक ह.न.पाटील यांनी उपक्रमास प्रेरणा दिलेली आहे. विषय शिक्षिका कल्पना धमुरे यांनी योग कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनकर चव्हाण यांनी केले तर राजन ढवण यांनी आभार मानले.




ओमकार, गायत्री मंत्र, प्रार्थना, सूक्ष्म व्यायाम, सूर्यनमस्कार, बैठे आसन धनुरासन, मंडूकासन, शशांकासन, पश्चिमोत्पादासन, उत्तानपादासन, उभी आसने- ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, वीरभद्रासन, पोटावरची आसने, भुजंगासन, धनुरासन, शलभासन, पाठीवरची आसने - सेतुबंध, हलासन, पवनमुक्तासन, सर्वांगासन, शवासन, चांगल्या सवयींचे मार्गदर्शन व स्वाध्याय अशी कार्यक्रमाची रूपरेषा असून आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थी या उपक्रमाचा भरपूर आनंद घेत आहेत. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज ठोंबरे, शशिकला कुंभार, रोहिणी गांधी, सुनिता पवार, गंगाबाई गंधुरे, चारुशीला नकाते, गीता म्हेत्रे, पवित्रा मदने, सुधीर येणकीकर व विजयकुमार वसंतपुरे हे परिश्रम घेत आहेत.

# श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक शाळेस सर्वाधिक सहभागाचा करंडक

### जिल्हा योग स्पर्धा : अंतिम स्पर्धेमध्ये साडेसहाशे स्पर्धकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

जिल्हा योगासन स्पर्धेतील सर्वाधिक सहभागाचा करंडक श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक शाळेस मिळाला. या शाळेचे ७०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

सोलापूर जिल्हा योग परिषद राणी कित्तूर चन्नम्मा स्मारक भवन समिती आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या खुल्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत विविध ३७ शाळा व कॉलेजमधील सात हजार पाचशे विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेऊन प्राथमिक फेरीत सहभाग नोंदवला. त्यातून अंतिम स्पर्धेमध्ये साडेसहाशे स्पर्धकांचा सहभाग होता. स्पर्धांच्या सुरुवातीला ध्यान दिनाचे औचित्य साधून ११ वेळा ओंकार आणि ओमच्या प्रार्थनेने सुरुवात करण्यात आली. याचा पारितोषिक वितरण समारंभ रोटरी क्लबच्या अध्यक्षा धनश्री केळकर, योग परिषदेच्या अध्यक्षा स्नेहल पेंडसे, कित्तूर चन्नमाच्या सचिवा चारुलता कुलकर्णी आणि पृथ्वी फाउंडेशनचे जयप्रकाश साळुंखे यांच्या उपस्थितीत पार पडला. सुरुवातीला दुर्वांकुरच्या विद्यार्थिनींची आकर्षक अशी योगासनांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. समारंभाच्या सुरुवातीला २०० स्पर्धकांच्या वर सहभाग असणाऱ्या एकूण १७ शाळा होत्या त्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. त्यात सर्वाधिक सहभाग विद्यार्थी श्री चतुरबाई श्राविका विद्यालय प्राथमिक शाळेला ट्रॉफी व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.



# भारताच्या पाटील, सादिक, राठी यांचा मुख्य फेरीत प्रवेश

### जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन महिलांच्या आयटीएफ टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २२ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना (एमएसएलटीए) व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन(एसडीएलटीए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जामश्री - इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत सोनल पाटील, सोहा सादिक, अंजली राठी यांनी मुख्य फेरीत प्रवेश केला. एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत भारताच्या नवव्या मानांकित सोनल पाटील हिने जपानच्या आठव्या मानांकित होनोरी कोयामाचा ६-३, ७-५ असा पराभव करून मुख्य फेरी गाठली. सोळाव्या मानांकित एना सेडीशेवाने पाचव्या मानांकित मारिया मिखाइलोवाचा ६-३, ६-४ असा पराभव केला. दुसऱ्या मानांकित भारताच्या अंजली राठीने काल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या लक्ष्मीश्री दांडूचा ७-५, ३-६, १०-६ असा कडवा प्रतिकार केला. भारताच्या सहाव्या मानांकित सोहा सादिकने अकराव्या मानांकित मधुरिमा सावंतचा ६-४, ६-१ असा पराभव करून मुख्य फेरीत धडक मारली. स्पर्धेतील मुख्य ड्रॉ मधील खेळाडूंची मानांकन यादी आज जाहीर करण्यात आली. यामध्ये कोरियाच्या सोह्यून पार्क हिला अव्वल मानांकन देण्यात आले. तर, भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्तीला दुसरे, रशियाच्या मारिया ताकाचेवाला तिसरे मानांकन देण्यात आले. भारताच्या अंकिता रैना व झील देसाई यांना अनुक्रमे चौथे व पाचवे मानांकन देण्यात आले.




**निकाल: अंतिम पात्रता फेरी-** अरुझान सगांडिकोवा१(कझाकस्तान) वि.वि.यशस्विनी पनवार१५(भारत) ६-१, ६-१; जिझेल माटोस सिक्वेरा फर्नांडिस ॲटोस (ग्रेट ब्रिटन)४ वि.वि. जेनिफर लुइखम (भारत) ६-३, ६-४; पोलिना बख्मुटकिना३ (बेलारूस)वि.वि. प्रत्युशा रचापुडी१०(भारत) ६-३, ६-७(५), १०-५; एम्मा व्हॅन पॉपेल७(नेदरलँड) वि.वि. बेला ताम्हणकर१२(भारत) ६-३, ६-७(६), १०-७;

### मुख्य ड्रॉ मधील खेळाडूंची मानांकन यादी याप्रमाणे

**एकेरी गट :** १. सोह्यून पार्क(कोरिया), २. श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती (भारत), ३.मारिया ताकाचेवा(रशिया), ४. अंकिता रैना(भारत), ५. झील देसाई(भारत), ६. वैदेही चौधरी(भारत), ७. हिरोको कुवाटा (जपान), ८.वैष्णवी आडकर (भारत)
**दुहेरी :** १. मना कावामुरा / हिरोको कुवाता (जपान), २. अंकिता रैना / वैष्णवी आडकर (भारत), ३. मारिया टकाचेवा /एकतेरिना यशिना (रशिया), ४. श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती / वैदेही चौधरी (भारत)

# जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपरिषद निवडणूकीतील विजयी उमेदवार

## अकलूज



रेश्मा अडगळे

युवराज दोरकर, वैशाली भोसले, प्रियंका गायकवाड, सचिन देशमुख, विशाल मोरे, नम्रता जगताप, मोहसिन शेख, मंदाकिनी पाडोळे, रेश्मा तांबोळी, पृथ्वीराज आबुरे, मृदुला सुर्यवंशी, उज्वला अडाणे, योगेश गांधी

मनिषा तिकोटे, विलास क्षिरसागर, नाशिक सोनवणे, शितल बनपट्टे, नामदेव गलांडे, सना शेख, सयाजी मोहिते-पाटील, क्रांतीसिंह माने-पाटील, उज्वला विठकर, प्रतिभा गायकवाड, स्वाती फुले, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, संजय साठे

## मंगळवेढा



सुनंदा आवताडे

तरन्नूम दारुवाले, आश्विनी धोत्रे, प्रमोद सावंजी, नागर गोवे, विद्यागौरी अवघडे

गौरीशंकर बुरकूल, प्रतिक्षा मेटकरी, येताळा भगत, प्रविण खवतोडे, प्रिती सुर्यवंशी

सोमनाथ माळी, प्रशांत गायकवाड, सीमा बुरजे, अनिल बोदाडे, सोमनाथ हुशारे, सावित्रीबाई कोंडूभैरी, मनिषा मेटकरी

## सांगोला



आनंद माने

देवयाची दौंडे, गणेश बनकर, जुबेर बागवान, माणिक, रमेश जाधव

राणी माने, शोभा फुले, श्रध्दा साबळे, सुजाता केदार-सावंत, वैशाली झपके

विवेक पाटील, अनिता केदार, नितीन इंगोले, काशिलिंग गावडे, छाया मेटकरी, सीमा सरगर, चैतन्य राऊत

रामचंद्र मदने, प्रशांत धनवजीर, वैशाली सावंत, गोदाबाई बनसोडे, अरुण पाटील, आशादेवी यावलकर, ज्ञानेश्वर तेली

## अक्कलकोट








**सोलापूर :** नुकत्याच झालेल्या नगरपालिकांच्या निवडणुकीत भाजपाला घवघवीत यश मिळवून दिल्याबद्दल सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दै. तरूण भारतच्या वतीने शुभेच्छा देताना मुख्य संपादक प्रशांत माने. याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण आणि तरुण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ‘संस्कार भारती’च्या वतीने आजपासून रांगोळी प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

संस्कार भारती सोलापूर शाखेच्या वतीने दि. २३ ते २८ डिसेंबर रोजी दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ५ यावेळेत शिंदे चौक येथील शिवस्मारक सभागृह येथे पाचबोटी रांगोळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे यंदाचे २७ वे वर्ष आहे.

या उपक्रमासाठी विविध समाजातील मुले, मुली, महिला, पुरुष आदींचे सक्रीय योगदान लाभत असते. रांगोळीचे विविध चिन्ह म्हणजेच बिंदू, रेषा, अर्धवर्तुळ, वर्तुळ, केंद्रवर्धिनी, गोपद्म, स्वस्तिक, कलश, सर्परेषा



अशा विविध चिन्हांद्वारे रांगोळी कसे काढायचे? याविषयी प्रशिक्षण दिले जाणार आहे. अधिक माहितीसाठी संस्कार भारतीचे सचिव अनंत देशपांडे ९१५८१३९९११, ममता अवस्थी ९९७००४२०४३ यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवसेना ‘उबाठा’त पेटले ‘राजकीय मनभेद’रुपी मशाल

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**
सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी शरद पवार गटासह अन्य पक्षसंघटनांकडून इच्छुकांकडून अर्ज मागवित मुलाखत प्रक्रिया पार पाडले जात आहेत. तर इकडे शिवसेना ‘उबाठा’ पक्षात रणनीती ठरविण्याऐवजी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. यावरुन शिवसेना ‘उबाठा’त ‘राजकीय मनभेद’रुपी मशाल पेटली असल्याचे दिसून येत आहे.

## अजय दासरी यांनी पक्षातील ज्येष्ठ नेत्यांच्या नावाने फोडले खडे : पुरुषोत्तम बरडे

### निवडणूक समन्वयक पदाचा राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे, संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या नावाने खडे फोडले. दासरी यांच्या अशा वागणुकीमुळे पक्षसंघटनेवर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे निवडणूक समितीच्या मुख्य समन्वयक पदावरुन आपणास मुक्त करण्यात यावी, अशा आशयाचे पत्र ‘मातोश्री’कडे धाडले असल्याची माहिती शिवसेना ‘उबाठा’चे नेते पुरुषोत्तम बरडे यांनी दिली.

दि.१६ डिसेंबर २०२५ रोजी पक्षाच्या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिका निवडणूक समितीचे मुख्य समन्वयक म्हणून आपली नियुक्ती करण्यात आली होती, असे सांगून ते पुढे म्हणाले, गेल्या तीन दिवसांपासून शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड, जिल्हा प्रमुख गणेश वानकर, संतोष पाटील, महानगर प्रमुख दत्ता माने, महिला जिल्हा संघटक प्रिया बसवंती यांच्या उपस्थितीत बैठका सुरु होत्या. ‘महाविकास आघाडी’तील घटक पक्षांसोबत चर्चा करण्यात येत होती.



निवडणुकीसाठी वेळ कमी असल्याने समन्वयावर भर देण्यात येत होता. या प्रक्रियेदरम्यान जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी कोणतीही माहिती न देता महाविकास आघाडीच्या बैठकीतून बाहेर पडले.

पक्षातील कोणालाही विश्वासात न घेता दि.२२ डिसेंबर २०२५ रोजी एकतर्फी पत्रकार परिषद घेत पक्षातील ज्येष्ठ नेतेद्वयांवर टीका केली. महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांच्या मुलाखती त्यांच्या स्वतःच्या निवासस्थानी घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले, असेही बरडे यांनी सांगितले.




सोलापूर महानगरपालिका निवडणुकीशी संबंधित सर्व रेकॉर्ड स्वतः कडे असल्याचा दावा केल्यामुळे पक्षात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.दासरी यांच्यामुळे पक्षाच्या निवडणूक यशावर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवसैनिक म्हणून पक्षाचे आदेश पाळण्यास सदैव तयार आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

## ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे, अनिल कोकीळ यांच्यामुळे शिवसेना ‘उबाठा’ची वाताहत : प्रा.डॉ.दासरी

### आत्मक्लेश आंदोलन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

शिवसेना ‘उबाठा’चे ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे, संपर्क प्रमुख अनिल कोकीळ यांच्यामुळे सोलापूर शहर-जिल्ह्यात वाताहत होत असल्याची खरमरीत टीका दस्तुरखुद्द शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी सोमवारी पत्रपरिषदेत केली.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना ‘उबाठा’चे अधिकाधिक नगरसेवक निवडून आणण्याच्या दृष्टीने वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. ‘महाविकास आघाडी’तील घटक पक्षांबरोबर चर्चाही करण्यात येत आहे. ‘महाविकास आघाडी’तील मित्रपक्षांबरोबर झालेल्या चर्चेनुसार जागा वाटपाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. शिवसेना उबाठा हाच मोठा पक्ष राहणार आहे.

मात्र, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे, संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनी यात ‘खो’ घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. पक्षाने जी निवडणूक सहाय्य समिती नेमली आहे. त्यातील दत्ता माने हे नाव आम्हाला मान्य नाही. त्यांना वगळून इतर सदस्यांच्या सहाय्याने आघाडी करु आणि जागा वाटप निश्चित करु. शिवसेनेला यश मिळवून देवू, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.



चंद्रकांत खैरे, अनिल कोकीळ यांनी नगरपालिका निवडणुकीत उमेदवारांना एबी फॉर्मही दिले नाहीत. मुलाखतीही घेतल्या नाही. त्यामुळे खैरे आणि कोकीळ यांच्या विरोधात आपण आत्मक्लेश आंदोलन करणार आहे, असे एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

जुने पदाधिकारी व कट्टर शिवसैनिकांना न्याय मिळवून देण्यासाठी मी कटीबध्द आहे. मंगळवार, दि.२३ डिसेंबर पासून अशोक चौक येथील संपर्क कार्यालयात इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी रवींद्र नागणकेरी, नाना मोरे, दत्ता गणेशकर, शशिकांत बिराजदार, रमेश चौगुले, विठ्ठल उपलप, सुरेश शिंदे, सुशील उपलप, पंकज गजाकोश आदी उपस्थित होते.



### ४० पेक्षा एकही जागा कमी घेणार नाही

‘महाविकास आघाडी’त काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, समाजवादी पार्टीचा समावेश राहणार आहे. मात्र यात एमआयएम नसेल. आम्ही प्रत्येक प्रभागात एक ते दोन जागा मागत आहोत. ४० पेक्षा एकही जागा कमी घेणार नाही, असेही जिल्हाप्रमुख प्रा.डॉ.दासरी यांनी सांगितले.

## महत्वाचे...



### नवोदित गायक, निवेदकांचा रविवारी सत्कार सोहळा

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

राज स्टुडिओ सोलापूर प्रस्तुत ऑर्केस्ट्रा धनश्री यांच्या वतीने रविवार दि. २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिरात नवोदित गायक, निवेदकांचा सत्कार सोहळा तसेच संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष अतुल स्वामी यांनी पत्रकार परिषदेत दिली. मध्य रेल्वेचे वरिष्ठ मंडल सुरक्षा अधिकारी जोएल मेकन्झी यांच्या हस्ते आणि इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार आहे. यावेळी गायक सुहास सदाफुले, सुनिता अय्यर, मेघा साळुंखे, भक्ती महामुनी, सायली साठे, साक्षी देवस्थळी, शशी बासुतकर, निखिल भालेराव, विठ्ठल गायकवाड या नवरत्नांचा सन्मान करण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र शाल व पुष्पगुच्छ असे या सत्काराचे स्वरूप आहे. यावेळी गीत गायनाची संगीत मैफिल होणार आहे. या पत्रकार परिषदेस संतोष पवार, अशोक बिराजदार, भागवत जठार, विद्या जठार, धनश्री सरगले उपस्थित होते.

### कर्नाटका केंद्रीय विद्यापीठाच्या वतीने प्रवेश प्रक्रिया सुरु

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

कर्नाटक केंद्रीय विद्यापीठ यांच्या वतीने एनटीए शैक्षणिक वर्ष २०२६- २७ साठी सर्व केंद्रीय विद्यापीठासाठी पदव्युत्तर कार्यक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी कॉमन यूनिव्हर्सिटी एंट्रन्स टेस्ट (सीयुइटी) अधिसूचित केली आहे. विविध पदव्युत्तर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत आहे, अशी माहिती विद्यापीठाचे पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. रवींद्र हेगडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रस्तावित प्रवेश एनटीए - सीयुइटीद्वारे आहेत. प्रवेश प्रक्रिया १४ डिसेंबर पासून ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली आहे. इच्छुक पात्र उमेदवारांसह जे अजूनही युजी सहाव्या सत्रात शिकत आहेत, ते अर्ज करण्यास पात्र आहेत. अर्ज फक्त ऑनलाईन (www.cuk.ac.in) पद्धतीने मागविण्यात येत आहेत. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १४ जानेवारी २०२६ पर्यंत आहे. संगणक आधारित चाचणी घेण्यात येणार आहे. सीयुइटीच्या गुणांवर आधारित गुणवत्तासह आरक्षण यादी तयार केली जाणार आहे. ती विद्यापीठाच्या वेबसाईटवर जाहीर केली जाईल, असेही प्रा. रवींद्र हेगडे यांनी सांगितले.



## नामदेव-विठ्ठल मंदिर सभामंडप कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

बाळीवेस येथील श्री संत नामदेव-विठ्ठल मंदिराच्या सभामंडप बांधकामाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हा सोहळा संत नामदेव महाराज यांचे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास (पंढरपूर) यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी आमदार विजयकुमार देशमुख, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्यासह नामदेव शिंपी समाजाचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिराच्या सभामंडपासाठी आमदार देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून ४० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. कार्यक्रमावेळी आमदार देशमुख यांचा सत्कार राजाभाऊ होमकर यांच्या हस्ते तर नामदास महाराज यांचा सत्कार नामदेव-विठ्ठल मंदिराचे अध्यक्ष मुरलीधर रेळेकर यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. मुक्तेश्वर मुळे यांनी केले तर आभार बबनराव होमकर यांनी मानले.

## ना-हरकत प्रमाणपत्रांसाठी एक खिडकीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### रविवारी दिवसभरात महापालिकेकडे २३० अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता नामनिर्देशन अर्ज दाखल करताना उमेदवारांना महानगरपालिकेकडून विविध ना-हरकत प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने नॉर्थकोट प्रशाला येथे सुरू करण्यात आलेल्या एक खिडकी कक्षाला इच्छुक उमेदवारांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आज पहिल्याच दिवशी २३० अर्ज दाखल झाले आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नावावर असलेल्या मालमत्तेसाठी मालमत्ता कराचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या नावावर गाळा (दुकान) असल्यास त्यासाठी स्वतंत्र ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागणार असून, खुली जागा असल्यास त्या मिळकतीबाबतही संबंधित विभागाकडून एनओसी सादर करणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवार व्यवसाय करीत असल्यास, संबंधित व्यवसाय परवाना (लायसन्स) वैध असल्याचे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.याशिवाय, उमेदवार महानगरपालिकेचा मक्तेदार (ठेकेदार) आहे किंवा नाही, याबाबतचा सविस्तर तपशील लेखी स्वरूपात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. वरील सर्व माहितीबाबत उमेदवारांनी स्वयंघोषणापत्रसुद्धा अनिवार्यपणे सादर करावे लागणार असून, त्यामधील माहिती सत्य व अचूक असल्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. महापालिकेच्या वतीने दि. २१ डिसेंबर पासून नॉर्थकोट प्रशाला येथे एक खिडकी कक्ष कार्यालयीन वेळेत सुरु आहे. अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांची मोठी गर्दी होत असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांनी



वेळेआधी सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आपले अर्ज एक खिडकी कक्षात सादर करावेत, उमेदवारांनी मिळकत करा संदर्भात ऑनलाईन ना हरकत प्रमाणपत्र काढून अर्ज सोबत जोडावे, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## रावसाहेब पाटील यांचे आज व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई बिल्हा केंद्र, सोलापूर आणि महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योगशिल्प स्व. जयकुमार पाटील यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम मंगळवार, २३ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता विजापूर रोड येथील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. रावसाहेब पाटील हे प्रमुख वक्ते म्हणून सोलापुरातील उद्योग उभारणीचा काळ या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मनोज बिडकर हे असणार आहेत. तसेच ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या व्याख्यानातून सोलापुरातील औद्योगिक विकासाचा ऐतिहासिक आढावा घेण्यात येणार असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने आले आहे.

## कबड्डी संघासोबत न गेलेल्या प्रशिक्षकांवर निलंबनाची कुऱ्हाड

### • सोलापूर विद्यापीठाकडून प्रा.भक्तराज जाधव दोन वर्षांसाठी निष्कासित



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. भक्तराज जाधव यांच्यावर कडक कारवाई केली आहे. त्यांना पुढील दोन वर्षांसाठी निवड समिती सदस्य, संघ प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापक या पदांवरून निष्कासित करण्यात आले आहे. विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा क्रीडा संचालक डॉ.अतुल लकडे यांनी या निर्णयाची माहिती दिली. दरम्यान, १८ डिसेंबर २०२५ च्या पत्राद्वारे महाविद्यालयाच्या प्राचार्यांना याबाबत कळवण्यात आले आहे.

**नेमकी घटना काय? :** १ ते ५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान इंदोर (मध्य प्रदेश) येथे झालेल्या पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या पुरुष संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा.जाधव यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, ते प्रत्यक्ष संघासोबत गेले नव्हते. हा गंभीर मुद्दा विद्यापीठाच्या अधिसभेत (सिनेट) सदस्य अजितकुमार संगवे आणि गणेश डोंगरे यांनी उपस्थित केला. सुरुवातीला डॉ.लकडे यांनी ’प्रशिक्षक संघासोबत गेले आहेत’ असे उत्तर दिले होते. मात्र, डोंगरे यांनी सभागृहातच भ्रमणध्वनीवरून प्रा.जाधव यांच्याशी संपर्क साधून कुलगुरू प्रा.प्रकाश महानवर यांच्याशी त्यांचे बोलणे करून दिले. त्यावेळी प्रा.जाधव यांनी, ‘मी गेलो नसून माझ्याऐवजी एका वरिष्ठ खेळाडूला पाठवले आहे,’ अशी कबुली दिली. विद्यापीठाच्या परवानगीशिवाय अशा प्रकारे परस्पर दुसऱ्या व्यक्तीला पाठवता येते का? असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर कुलगुरूंनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमली होती.

**चौकशी समितीचा निर्णय :** डॉ.केदारनाथ काळवणे, नंदकिशोर देशपांडे आणि अशोक पाटील यांच्या समितीने या प्रकरणाची सखोल चौकशी केली. समितीच्या अहवालानुसार, कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत प्रा. जाधव यांना दोन वर्षांसाठी क्रीडा विभागाच्या सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांतून निष्कासित करण्यात आले आहे.

### विद्यापीठ पर्यायी व्यवस्था करेल

‘अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी, यापुढे नियुक्त केलेले निवड समिती सदस्य, प्रशिक्षक किंवा व्यवस्थापक उपस्थित राहू शकणार नसतील, तर त्यांनी विद्यापीठाला आगाऊ कळवणे अनिवार्य आहे. जेणेकरून विद्यापीठ वेळेत पर्यायी व्यवस्था करू शकेल.‘

**- डॉ.अतुल लकडे,**
क्रीडा संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ.

### ‘महाविकास आघाडी’चे ठरले

## काँग्रेस ५०, तर ‘उबाठा’कडे ३० जागा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी ‘महाविकास आघाडी’च्या वतीने बैठकांचे सत्र सुरु झाले आहे. रविवारी सकाळी व संध्याकाळच्या सत्रात दोन स्वतंत्र बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरविण्यात आला. काँग्रेसकडे ५०, शिवसेना ‘उबाठा’कडे ३० आणि उर्वरित जागा ह्या राष्ट्रवादी शरद पवार गट, माकपा, मनसे, सपाकडे दिले जाणार आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीशी बोलणे सुरु आहे, असे सांगण्यात आले.

‘महाविकास आघाडी’तील काँग्रेस, ठाकरे यांची शिवसेना, मनसे, शरद पवार यांची राष्ट्रवादी, माकप, समाजवादी पार्टी या घटक पक्षांनी आगामी महापालिका निवडणूक एकत्रित लढण्याचा निर्णय घेतला आहे. या फॉर्म्युलावर पुन्हा एकदा बैठक घेऊन त्यावर लवकरच शिक्कामोर्तब करण्यात येईल. हॉटेल सिटी पार्क येथे झालेल्या बैठकीला माजी आमदारद्वय प्रकाश यलगुलवार, विश्वनाथ चाकोते, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी महापौर संजय हेमगड्डी, काँग्रेसचे प्रवक्ते प्रा. अशोक निंबर्गी, शिवसेना ‘उबाठा’च्या उपनेत्या अस्मिता गायकवाड, समन्वयक पुरुषोत्तम बरडे, जिल्हाप्रमुख गणेश वानकर, प्रा.डॉ. अजय दासरी, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महेश गादेकर, ‘माकपा’चे सचिव युसूफ शेख, नलिनी कलबुर्गी, व्यंकटेश कोंगारी, नसीमा शेख, ‘मनसे’चे प्रशांत इंगळे, समाजवादीचे अबुतालीब डोंगरेसह भारत जाधव, शंकर पाटील, दत्ता माने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३०५

**आमचा विनोद तें जगा मरण ।**
**करिती भावहीन देखोवेखी ।।**

मुठभर निस्वार्थी लोक सोडले तर जगभर पैसा, मोठेपण व सत्तेच्या मागे लागलेलेच लोक आपणाला दिसतात. सत्ता, संपत्ती व मोठेपणाच्या मागे लागणारे हे लोक इच्छित प्राप्तीसाठी केव्हा, कोणता व कसा मार्ग निवडतील हे ते स्वत: सुध्दा सांगू शकत नाहीत. अर्थात केव्हाही, कोणताही व कसाही मार्ग त्यांच्याकडून निवडला जातो. आपण काय करीत आहोत याचा विचार न करता केवळ ध्येय कसे प्राप्त होईल एवढाच विचार हे लोक करतात. या लोकांनी मोठेपणा, सत्ता, संपत्तीसाठी राजकीय, सामाजिक, आर्थिक मार्ग तर निवडलेच आहेत पण यापैकी



काहींनी अध्यात्मिक मार्गही निवडले आहेत. निती नियमाला धरून केलेले राजकारण, सम ाजकारण व अध्यात्म कोणालाही बाधक ठरत नाही. पण अनितीने या मार्गावर चालणाऱ्याचे कार्य सर्वांसाठी बाधक व घातक ठरते, असे असले तरीही स्वार्थी लोकांना स्वार्थाशिवाय कांही दिसत व सुचत नसल्याने राजकीय, आर्थिक, सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्र बदनाम होत असल्याचे आपणाला पाहायला मिळत आहे. राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रापेक्षा अध्यात्मिक क्षेत्रात भोळ्या भाबड्या लोकांना सहज टोप्या घालता येतात म्हणून अनेकांनी या क्षेत्रात शिरकाव केला आहे. अध्यात्मिक क्षेत्रात संत महात्म्यांचे बहुरुपी सोंग घेऊन भावहिन वर्तन करणारे हे स्वार्थी लोक जगाचे मरणच करीत आहेत. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, आमचा विनोद तें जगा मरण । करिती भावहिन देखोवेखी ।।

स्वार्थ साधण्यासाठी संत महात्म्यांचे सोंग घेऊन समाजात वावरणारे कांही लोक आपणाला पहायला मिळतील. हे लोक चार दोन अभंग, श्लोक, ओव्या पाठ करतात आणि भरपूर दिखावा करून लोकांकडून पैसा उकळतात. स्वत:चे कर्तव्यशून्य वर्तन असणारे लोक संत, महात्म्यांच्या नावाखाली लोकांना दिशाहिन करतात. यांच्याकडे मुळात चांगला भावच नसल्याने त्यांच्या शब्दाला किंमतही नसते. यांचे खरे स्वरुप लक्षात येईपर्यंत यांनी यांचा डाव साधलेला असतो. असे अनेक ढोंगी लोक आपणाला पहायला मिळतील की ज्यांच्याकडे अध्यात्मिक माध्यमातून खूप संपत्ती, गाड्या, जमीन जमा झाली आहे. यांचे मोठेपण, गुणगाण करणाऱ्यावर यांचे थोडेफार प्रेम असेलही पण इतरावर मात्र निश्चितच नाही. यांची ने आण व चांगली व्यवस्था करणारा, खूप मानधन, वस्तू देणारा जो कोणी असेल त्याचे गुणगाण करण्यात हे अजिबात मागे राहात नाहीत. ज्ञानोबा-तुकारामाच्या नांवाऐवजी ढोंगी हे लोक संयोजकाचेच नांव घेतात. कारण त्यांच्या धन, संपत्ती व व्यवस्थेच्या उपकाराखाली हे दबलेले असतात. या व्यावहारिक लोकांना ज्यांच्या कृपेमुळे व्यासपीठाचा मान मिळाला ते ज्ञानोबा-तुकोबा आठवत नाहीत. म्हणून अशांकडून संत, महात्म्यांचा विनोदच होतो. तसेच यांच्याकडे संत, महात्म्यांविषयीची खरी भावना नसते. असे मूठभर ढोंगी समाजात असले तरीही भरपूर चांगले संत,महात्मे समाजात आहेत, हे आपण विसरु नये. जय जय राम कृष्ण हरी ।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार**
**दि. २३ डिसेंबर २०२५**
**विक्रम संवत् २०८२**
**शके - १९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष शु, तृतीया**
**ऋतु - हेमंत**
**नक्षत्र- श्रवण (३१.०७)**
**योग - व्याघात (१६.२९)**
**करण - वणिज (२४.४४)**
**राहू काल....**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष -२000: कलकत्ता शहराचे नाव कोलकता असे बदलण्यास केंद्र सरकारची मंजुरी**
**२००१: बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यातील केसरिया गाव येथे जगातील सर्वात मोठा बौद्ध स्तूप सापडला.**
**१८९७: ओरिसातील कवी, कविचंद्र कालिचरण पटनाईक यांचा जन्म.**



## मनपा उर्दू शाळा नं. ९ मध्ये फूड फेस्टिव्हल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

मुस्लिम पाच्छा पेठ येथील म.न.पा. उर्दू शाळा नं. ९ येथे फूड फेस्टिवल कार्यक्रम उत्साही वातावरणात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे स्कूल बोर्डाचे माजी पर्यवेक्षक रफीक खान, माजी केंद्र प्रमुख मौलाअली लोकापल्ली, माजी शिक्षक शफीक खान, इम्रान पठाण उपस्थित होते.

प्रारंभी फजल शेख यानी प्रास्ताविकात फुड फेस्टिवलचे महत्त्व विषद केले. रफीक खान यांच्या हस्ते फेस्टिवलचे उद्घाटन करण्यात आले. प्रभारी मुख्याध्यापिका मैंदर्गी फहमिदा यांच्या हस्ते सर्व पाहुण्यांचे सत्कार करण्यात आला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी बनवून आणलेले खाद्य पदार्थ गुलाब जामून, कदूखीर, वडापाव, द्वाशी, इटली, बिर्याणी, खिचडा इत्यादिचा स्वाद सर्व पाहुणे, पालक वर्ग व विद्यार्थ्यांनी घेतला. शेवटी शगुफ्ता प्यारे यांनी आभार मानले. अफसाना शेख, सना जमखंडी, शबाना कुरेशी या सर्व शिक्षकांमुळे हे फुड फेस्टिव्हल यशस्वी पार पडला.

# सोलापुरातील भाजपा झाली काँग्रेसयुक्त

## खा.प्रणिती शिंदे: सत्ताधाऱ्यांकडे उमेदवारच नाहीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

भारतातील सर्वात जुना पक्ष असणाऱ्या काँग्रेसला भारतातून हद्दपार करण्यासाठी भाजपने चंग बांधला होता. काँग्रेस मुक्त भारत अशा घोषणा देणाऱ्या भाजपला आज काँग्रेसयुक्त भाजप करावी लागत आहे.

महापालिका निवडणुकीसाठी सत्ताधाऱ्यांकडे उमेदवाराचे नाहीत. त्यामुळे काँग्रेस पक्षातील उमेदवार साम-दाम-दंड-भेद वापरून चोरले जात आहेत. ''इतके दिवस फक्त वोट चोरी होत होती आता लोक चोरी'' होत आहे. या नगरपालिकेच्या निवडणुकीत सत्ताधारी तोंडावर आपटले आहे. त्यांच्यासोबत असणारे दोन कुबड्यांनी मात्र सत्ता काबीज केली आहे. यंत्रणेचा वापर करून देखील भाजपला म्हणावे तितके यश प्राप्त करता आले नाही. अशी टीका खा.प्रणिती शिंदे यांनी सोलापुरात केली.

सोलापूर महानगरपालिका पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर



काँग्रेस उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी त्या सोलापुरात आल्या होत्या. मुलाखती संपन्न झाल्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्या पुढे म्हणाल्या जेव्हापासून भाजप सत्तेत आले आहे. तेव्हापासून या सगळ्या गोष्टी घडत आहेत. इतके दिवस मॅन, मशिनरी आणि मनीच्या साह्याने वोट चोरी केली जात होती. आता उघडपणे लोक चोरी होत आहेत. इतर पक्षांचे उमेदवारच चोरले जात आहेत. त्यांच्याकडे निवडणूक लढवण्यासाठी उमेदवार शिल्लक नाहीत. या गोष्टीची कीव करावी वाटते. पैशाचे आमिष दाखवून सत्ता काबीज केली जाते. ही खूप लाजीरवाणी गोष्ट आहे. जे लोक पक्ष सोडून गेले आहेत त्यांची काय अवस्था आहे, हे तुम्हाला माहित आहे मी सांगण्याची गरज नाही. या नगरपालिकेच्या निवडणुकीत हे चित्र सर्वांना दिसले आहे. असे देखील त्या यावेळी म्हणल्या.

# तलाठी 'भाऊसाहेबां'च्या कार्यालयांसाठी १ कोटी ३० लाखांचा निधी मंजूर

### आमदार सुभाष देशमुख यांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नातून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत एकूण १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून विविध गावांमध्ये तलाठी कार्यालयांच्या बांधकामाची कामे मार्गी लागणार आहेत.



मंजूर निधीनुसार गुंजेगाव, टाकळी व वेगाव येथे तलाठी कार्यालयांच्या बांधकामासाठी अनुक्रमे १८.५० लाख, १८.५० लाख व १६.५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. तसेच देगाव, औराद, निंबर्गी आणि होटगी या गावांमध्ये मंडळ कार्यालयांच्या बांधकामासाठी प्रत्येकी २५.५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सर्व कामांसाठी एकूण १.३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

ग्रामीण भागात शासकीय कामकाज सुलभ व्हावे, नागरिकांना विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात आणि महसूल प्रशासन अधिक प्रभावी व्हावे, या उद्देशाने हा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे संबंधित गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या निधी मंजुरीबद्दल आमदार सुभाष देशमुख यांनी महायुती सरकारचे तसेच मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांचे आभार मानले आहेत. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ग्रामीण भागाचा विकास हाच आपला प्राधान्यक्रम असून भविष्यातही अधिकाधिक विकासकामांसाठी निधी आणण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मेहता शाळेत गुणवंतांचा कौतुक सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळा, जुळे सोलापूर येथे प्रमुख अतिथी यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक श्री व सौ. डिगे, श्री. व सौ. वरेकर तसेच मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारती विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गणित परीक्षेमध्ये यश मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणाऱ्या यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा कौतुक सोहळा संपन्न झाला.

सरस्वतीपूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक मुख्याध्यापिका कोरवलीकर यांनी केले. गणेश माने यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. समर्थ डिगे



व वेदांत वरेकर या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली शिक्षकांतर्फे स्वाती गडदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी व मुख्याध्यापिकांच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली आणि मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गणित प्रवेश परीक्षेत समर्थ डिगे याने १०० पैकी ९३ गुण मिळवून विद्यापीठात प्रथम तर भारती विद्यापीठ गणित परिचय परीक्षेत वेदांत वरेकर यांने १०० पैकी ९७ गुण मिळवून महाराष्ट्रात तिसरा क्रमांक मिळवला. प्रमुख अतिथी संदेश वरेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुजाता यादव यांनी केले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# लाडकी नदी महामंडळ स्थापन करा

## माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्थेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

महाराष्ट्रातल्या सर्वच नद्या अखेरच्या घटका मोजताहेत, हजारो वर्षे वैभव संपन्नतेत वाहणाऱ्या नद्या वृक्षतोड, अतिक्रमणे, वाळू तस्करी या कारणांनी पन्नास वर्षात नद्यांचे अस्तित्व धोक्यात आणले. या मृत्यूपंथाकडे चाललेल्या नद्या वाचवायच्या असतील, पुर व दुष्काळमुक्त करायच्या असतील, पर्यावरण समतोल राखायचा असेल व पुढच्या पिढ्या सुलभतेने जगाव्याशा वाटत असेल तर राज्य पातळीवर स्वतंत्र अधिकाराचे. लाडकी नदी महामंडळ, स्थापन करावी अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या महामंडळावर डॉ. तुकाराम मुंडे यांची विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करावी आणि सध्या महाराष्ट्रातील १०८ नद्यावर काम करणारे नदी समन्वयक व त्यांचे सहकारी त्यांच्याकडे नदीपात्राची सुरुक्षाव्यवस्था सोपवावी, प्रति किलो मीटर दोन लाख रुपये नदीवर खर्च केले तर दोन वर्षांत नद्या पुरमुक्त व प्रदुषणमुक्त होवून पुनरुज्जीवित होतील.

२ आक्टोबर २०२२ रोजी वर्धा येथून 'चला जाणूया नदीला' अभियान जाहीर करण्यात आले होते, परंतु पुढे तीन वर्षांत कांहींच काम झाले नाही. उलट या तीन वर्षांत हजारो कोटी ब्रास वाळू चोरीस गेली त्यामुळे नद्या अधिक संकटात आल्या.

आम्ही १५ वर्षांपासून माणगंगा नदीवर नदी स्वच्छतेचे काम करत आहोत, ७५ कि.मी. नदीपात्र स्वच्छ केल्यामुळे नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे या नदीपात्रातून पन्नास हजार क्युसेक्सने पाणी वहात होते तरीपण नदीपात्राबाहेर पाणी आले नाही. इतर नद्यांच्या बाबतही असेच अपेक्षित आहे. म्हणून ताबडतोब 'लाडकी नदी महामंडळ' स्थापन करुन त्वरित काम सुरु केले तर भविष्यात येणारे पूरसंकट कांहीं प्रमाणात नियंत्रणात येईल.

# मोहोळ पं.स.ला कायमस्वरुपी बीडीओ देण्याची मागणी

## लाभार्थ्यांमध्ये तीव्र संताप; सव्वा कोटींची देयके रखडली

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि.२२ डिसेंबर-**

मोहोळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विवेक जमदाडे यांची दोन महिन्यांपूर्वी पदोन्नतीने बदली झाल्यानंतर पंचायत समितीतील विविध विभागांचे आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत. घरकुल योजनेअंतर्गत सुमारे सव्वा कोटी रुपयांची देयके रखडली असून लाभार्थ्यांची मोठी हेळसांड होत आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, तातडीने कायमस्वरूपी गटविकास अधिकारी नियुक्त करण्याची मागणी होत आहे.

गेल्या वर्षभरापूर्वी गटविकास अधिकारी म्हणून विवेक जमदाडे यांनी मोहोळ पंचायत समितीत पदभार स्वीकारला होता. सध्या सहायक गटविकास अधिकारी विजयकुमार देशमुख





यांच्याकडे प्रशासकीय कामकाज सोपविण्यात आले आहे. त्यांच्या स्तरावर नागरिक, ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांची कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी त्यांच्या अधिकारांना मर्यादा असल्याने अनेक महत्त्वाचे निर्णय प्रलंबित आहेत. मोहोळ तालुक्यात घरकुल योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. काही लाभार्थ्यांना पहिला व दुसरा हप्ता मिळालेला असला, तरी सुमारे पाचशे लाभार्थ्यांचे हप्ते अद्याप रखडलेले आहेत. परिणामी अनेकांनी खासगी सावकारांकडून किंवा हातउसने पैसे घेऊन कामे पूर्ण केली असून आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, गटविकास अधिकारी जमदाडे यांची उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदावर पदोन्नती होऊन बार्शी येथे बदली झाली आहे. त्यांच्याकडे मोहोळ पंचायत समितीचा अतिरिक्त पदभार देण्यात आला असला, तरी बार्शी व मोहोळ या दोन्ही ठिकाणी वेळ देणे शक्य नसल्याने प्रशासकीय कामकाजावर मोठा परिणाम होत आहे.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे वातावरण तापू लागले असून, अशा काळात पंचायत समितीला पूर्णवेळ गटविकास अधिकारी असणे अत्यंत आवश्यक आहे. मोहोळ हे राष्ट्रीय महामार्ग व पालखी मार्गावर असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वारंवार भेटी होत असतात. यामुळे मोहोळ पंचायत समितीस तातडीने कायमस्वरूपी गटविकास अधिकारी नियुक्त करावा, अन्यथा सध्याचे सहायक गटविकास अधिकारी विजयकुमार देशमुख यांच्याकडे तरी कायम स्वरूपी पदभार द्यावा, अशी मागणी होत आहे.





# पालिका निवडणुकीसाठी शिवसेना उबाठा समन्वय समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या समन्वय समितीची बैठक संपन्न झाली.

बैठकीत आगामी महापालिका निवडणुकीसाठी संघटनात्मक तयारी, प्रभागनिहाय आढावा आणि रणनितीवर चर्चा करण्यात आली. उपनेत्या अस्मिता गायकवाड, मुख्य समन्वयक पुरुषोत्तम बरडे यांनी सर्व प्रभागांचा आढावा घेत कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याचे निर्देश दिले. बैठकीस जिल्हाप्रमुख गणेश वानकर जिल्हाप्रमुख संतोष पाटील, महानगरप्रमुख दत्ता माने, महिला जिल्हा संघटक प्रिया बसवंती, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, शरणराज केंगनाळकर, पूजा खंदारे, महेश धाराशिवकर, भीमाशंकर म्हेत्रे, दिनेशसिंह चौहान, सुरेश जगताप, सुरेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, अमित भोसले, स्वाती रुपनर, प्रीती नायर, समीरउल्ला शेख उपस्थित होते.

# युवकांनो पारंपरिक शेती सोडून उद्योजकतेकडे वळा

## उद्याजेक सतीश मगर; रेव्योल्युशनरी मराठा अंतरप्रेन्योर असोसिएशनतर्फे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

समाजामध्ये पारंपरिक शेती आणि राजकारणाकडे अनेकांचा कल असतो. यात मागील काही वर्षांपासून बदल होताना दिसत आहे. यापुढेही शेती आणि राजकारण सोडून उद्योजकतेकडे वळावे, असा सल्ला प्रसिद्ध उद्योजक सतीश मगर यांनी दिला.

गुजराती मित्र मंडळाच्या मातोश्री रतनबेन शहा सभागृहात रविवारी आयोजित कार्यक्रमात सतीश मगर बोलत होते. रेव्योल्युशनरी मराठा अतरप्रेन्योर असोसिएशनच्या सहाव्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी मंचावर अध्यक्ष निलकंठ वाघचवरे, संस्थापक सुनील फुरडे, उपाध्यक्ष रोहन देशमुख, विजय भोसले, सचिव सिद्धाराम वाघ, सृष्टी कमिटीचे चेअरमन माऊली पवार, खजिनदार अभिनव साळुंखे, सहखजिनदार अतुल लोंढे, व्हाईस चेअरमन संजय पवार आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

सतीश मगर म्हणाले, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी खूप वेळ द्यावा लागतो. यासाठी चिकाटी हवी असते. इतके करुनही सरकारी क्षेत्रात नोकरीच्या संधी कमी आहेत. त्यामुळे तरुणांनी उद्योजकतेकडे वळावे. कायदा व नवे तंत्रज्ञान शिकून अद्ययावत ज्ञान घेत राहावे.





### सोलापुरात आयटी इंडस्ट्री वाढविण्यासाठी सल्ला; एकदा मगरपट्ट्यात येऊन पहा

कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्न उत्तराचे सत्र झाले. या सत्रात सोलापुरात आयटी इंडस्ट्री वाढविण्यासाठी काय करता येईल? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी सतीश मगर म्हणाले, ज्या गोष्टी येथे करता येतील त्याचा विचार आधी करावा. जानेवारी महिन्यात मगरपट्टा येथे या. तिथे पाच हजार स्केअर फुटांपासून पाच लाखपर्यंत आयटी कंपन्या आहेत. वातावरण कसे असावे? सुविधा कोणत्या असाव्यात याची माहिती देतो. तसेच पुढे काय करायचे? हे सांगतो.

शहरीकरण, जागतीकरण वाढत असल्याने सध्या मोठी संधी निर्माण होत आहे. फक्त मानसिकता बदलली की पुढे जाण्याचा मार्ग मिळतो. उद्योजक तयार करत असताना सर्वांनाच पूर्णपणे यश मिळणार नाही. पण, काही जणांपासून सुरुवात होऊ शकते. एखादा विशिष्ट अशा व्यवसायात पुढे जात असेल तर आपणही तोच व्यवसाय करुन पुढे जाऊ असे होऊ शकत नाही. यासाठी गरजा काय आहेत, आपण काय करु शकतो याचा विचार करावा.

### उद्योजक होण्यासाठी या दिल्या टिप्स

चांगला प्रपोजल बनवा, बँक मदत करते स्वताला शिस्त लावा - मोनोपोली नावाची गोष्ट राहिली नाही - शासनाची योजना, सबसिडीची वाट पाहू नका आपल्या शहराच्या प्रगतीसाठी विचार करा - सोलापुरात नॅपकीनचा व्यवसाय चांगला - महिलांना व्यवसायात सामील करुन घ्या - कुणाची फसवणूक होणार नाही, - मोठे धाडस न करता छोट्या पासून सुरूवात करा

### विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार

कार्यक्रमात डॉ. विजय अंधारे, विजय जाधव, भगवान जाधव, माणिकराव जाधव, वैष्णवी गायकवाड, परीस गायकवाड, अमृत ननवरे या विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सहभाग होता.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शिक्षक गैरहजर असताना मस्टरवर सही; मुख्याध्यापकांना कारणे दाखवा नोटीस

**जंगलगी जि.प. शाळेत बेशिस्तीचा कहर**

**शिक्षणाधिकाऱ्यांच्या तपासणीत प्रकार उघड**



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २२ डिसेंबर-**

तालुक्यातील जंगलगी (केंद्र सलगर) आंतर्गत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गंभीर गैरप्रकारांचा पर्दाफाश झाल्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी अचानक भेट दिली असता शाळेतील कामकाजात शिक्षक गैरहजर आसताना म स्टरवर सही आर्थात खोटी हजेरी तसेच विद्यार्थ्यांना पुरक आहार वाटप न करने यासारखे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत.दरम्यान या प्रकरणी मुख्याध्यापक म. मो. पवार यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

जिल्हापरिषदचे शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी सदर शाळेस भेट देऊन तपासणी केली आसता शिक्षक बेले शाळेत अनुपस्थित असल्याचे आढळले. विद्यार्थ्यांनी स्पष्ट सांगितले की संबंधित शिक्षक शुक्रवारपासून शाळेत आलेलेच नाहीत. मात्र, हजेरीपत्रकावर शुक्रवार व शनिवार दोन्ही दिवशी त्यांच्या स्वाक्षऱ्या असल्याचे निदर्शनास आले. यवतमाळ येथे गेले असतानाही शनिवारी शाळेत उपस्थित असल्याचे दाखवणे हा गंभीर गैरप्रकार ठरतो. धक्कादायक म्हणजे शाळेत रजेची संचिकाच उपलब्ध नसल्याने कोणतीही रजा मंजूर किंवा नोंदविलेली नव्हती.

दूरध्वनीवरून विचारणा केली असता शिक्षकांनी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता गैरहजर असल्याचे स्पष्ट झाले. शिक्षक एकमेकांना सांभाळून घेत शासन व प्रशासनाची दिशाभूल करीत असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तक्रार पेटी दर्शनी भागात नसणे आणि विद्यार्थ्यांना पुरक आहार न मिळणे, ही बाब अधिकच गंभीर ठरली. या सर्व प्रकारांवर शिक्षणाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करत मुख्याध्यापकांना सात दिवसांत गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मंगळवेढा यांच्याकडे खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. खुलासा समाधानकारक नसल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ व जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. शालेय व्यवस्थेतील हलगर्जीपणा आणि विद्यार्थ्यांच्या हक्कांवर होणारा अन्याय पुन्हा एकदा उघडकीस आला आहे.दरम्यान या घटनेवरून गटशिक्षण आधिकाऱ्यांचा आंकुश नसल्याचे उघड तालुक्यातील दोन शाळांच्या घटनावरून स्पष्ट स्पष्ट होत असून येथील आधिकाऱ्यांची उचल बांगडी करून सक्षम आधिकारी नेमन्याची पालक वर्गातून मागणी होत आहे.

## महत्वाचे...



### प्रचंडे प्रशालेत गणित दिन साजरा

**अक्कलकोट दि. २२ डिसेंबर**

नागणसूर (ता.अक्कलकोट) येथील एच. जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत गणितज्ञ रामानुजन यांच्या जन्मदिन साजरा करण्यात आला. डॉ.रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन केंद्रप्रमुख ईराप्पा गजा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य शंकर व्हनमाने होते. याप्रसंगी व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षिका एस.एस.बंदीछोडे, संजयकुमार गंगदे, विश्वनाथ वाघमोडे, बसवराज धानशेट्टी, प्रा. प्रशांत नागुरे, इरणणा धानशेट्टी, अनिल इंगळे, सूर्यकांत कडबगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्तावना गणित विभाग प्रमुख वृषाली जगताप यांनी केले. गणित दिनाचे महत्त्व गणित शिक्षक अजय पाटील यांनी विशद केले. याप्रसंगी प्रशालेतील गणित विषयात जिल्हास्तरीय स्पर्धेत यश संपादन केल्याबद्दल केंद्रप्रमुख ईरप्पा गजा यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी गणेश पुजारी, अनिल सावळी, कुमारी भाग्यश्री धानशेट्टी, वर्षा मुनाळे, आयशा पटेल, गौरीशंकर कलशेट्टी, सानिया हिरेनळी, अक्षता मानुरे, उर्वी मेनासे, श्वेता माशाळकर मनोगत व्यक्त केल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोमशेखर कळसगोंडा, बेबी प्रचंडे, बसवराज कोळी, थावरु चव्हाण, विश्वनाथ तळवार, चानविर कल्याण, अर्चना मनुरे, आकाश कोनापुरे, नितीन धानशेट्टी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सानिया हिरेनळी यांनी केले तर आभार अजय पाटील यांनी मानले.



### रोशन भुतडा याचे शतकीय रक्तदान; शतकवीर रक्तदाताचा मिळविला किताब

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

भवानी पेठ येथील रहिवासी रोशन जमनादास भुतडा यांनी शतकीय रक्तदान करून आपल्या नावाने शतकवीर रक्तदाता चा किताब मिळविला. ते गेल्या २७ वर्षांपासून नियमित रक्तदान करत आले आहेत. या शतकीय रक्तदान निमित्त इंडियन रेडक्रॉस सोसायटी सोलापूर सेंटर चे चेअरमन डॉ. राजीव प्रधान आणि खजिनदार खुशाल देढिया यांच्या हस्ते मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमास जमनादास भुतडा, चंद्रकला भुतडा, घनश्याम भुतडा, नवनीत भुतडा, सीमा भुतडा, गिरीश भुतडा, दर्शन भुतडा सुमित भुतडा व इतर व्यापारी वर्ग आणि समाज बांधव उपस्थित होते. रविवारी आयोजित रक्तदान शिबिरात एकूण १५७ रक्त संकलन करण्यात आले. सोलापुरात सर्वाधिक शतकवीर रक्तदाते (सुमारे ३५) असल्याचे डॉ. प्रधान यांनी उल्लेख केला.

### उपअभियंता पदाचा पदभार मुलाणी यांच्याकडे

**माळिशरस, दि. २२ डिसेंबर-**



सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांच्या शिफारशीने माळिशरस पंचायत समिती बांधकाम उपविभागाचे प्रभारी उप अभियंता आर एस रणवरे यांचा उपअभियंता पदाचा पदभार आय.बी. मुलाणी यांच्याकडे १८ डिसेंबर २०२५ रोजी सुपूर्त करण्यात आलेला आहे. माळिशरस येथील इस्माईल बाबूमिया मुलाणी यांनी प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षणास सुरुवात करून सांगली कॉलेज येथे शिक्षण पूर्ण करून १९८७ साली जिल्हा परिषद बांधकाम विभागात मस्टर असिस्टंट पासून नोकरी सुरुवात केलेली आहे २००३ साली स्थापत्य अभियांत्रिकी पदावर काम केलेले आहे २०१५ साली कनिष्ठ अभियंता पदावर काम केले २०२१ साली शाखा अभियंता राजपत्रित वर्ग २ दर्जा प्राप्त केलेला होता. सन २०१४ ते २०१९ पाच वर्ष पंढरपूर तालुक्यांमध्ये नोकरी केलेली आहे उर्वरित सेवा जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग माळिशरस मध्ये झालेली आहे. बांधकाम विभागातील मस्टर असिस्टंट पासून सुरुवात केलेले शाखा अभियंता पर्यंत कामाचा अनुभव असल्याने वरिष्ठांनी प्रभारी उप अभियंता पदाची जबाबदारी दिलेली आहे. माळिशरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री रघुनाथ पांढरे यांनी इस्माईल मुलाणी यांच्या निवडीचे स्वागत केलेले आहे इस्माईल मुलाणी यांनी प्रभारी उप अभियंता पदाचा पदभार घेतल्यानंतर मित्रपरिवार व नातेवाईक यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### कै.रतन टाटा यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**वेळापूर, दि.२२ डिसेंबर-**



वेळापूर (ता.माळशिरस) येथील जिल्हा परिषद शाळा मुले येथे रविवार दि. २८ डिसेंबर रोजी विकास भगत मित्रपरिवार वेळापूर यांच्यावतीने भारतातील उद्योग विश्वातील महामानव, मूल्यनिष्ठेचे प्रतीक, सेवा साधेपणा यांचा आदर्श असणारे समाज भूषण पुरस्कार प्राप्त कै. रतन नवल टाटा यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या रक्तदान शिबिरामध्ये जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान करावे, असे आवाहन विकास भगत वेळापूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.



## कमलाकर माने-देशमुख व मदनसिंह जाधव यांचा आमदार जानकर यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२२ डिसेंबर-**

शंभूसेनेतर्फे दिला जाणारा यंदाचा छत्रपती संभाजी महाराज गुण गौरव पुरस्कार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या किसान सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष कमलाकर माने-देशमुख व प्रदेश सरचिटणीस मदनसिंह जाधव यांना जाहीर झाल्याबद्दल आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या पुरस्काराच्या माध्यमातून त्यांच्या सामाजिक, संघटनात्मक व शेतकरी हितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा सन्मान झाल्याचे आमदार जानकर यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, माने-देशमुख आणि जाधव हे नेहमीच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करतात. सर्वसामान्यांची कामे करतात म्हणूनच त्यांना त्यांच्या कार्याची दखल घेत पुरस्कार जाहीर झाला असल्याचे सांगितले. यावेळी संदीपतात्या माने देशमुख, विनायक माने, शिवाजी माने-देशमुख, अजय सकट, सचिन देवकाते, अजय बनसोडे उपस्थित होते.

## पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पालिकेने पाऊले उचलणे गरजेचे

**स्वच्छ व सुंदर सोलापूरसह शहरवासीयांना विविध सोयी सुविधांचा लाभ द्यावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

शहराच्या पर्यावरणपूरक विकासाच्या दृष्टिकोनातून सोलापूर महापालिकेने विविध पाऊल पाऊले उचलणे गरजेचे आहे जेणेकरून शहरातील नागरिकांना स्वच्छ हवा सुंदर सोलापूर व विविध सोयी सुविधांचा लाभ घेता येईल.

यामध्ये रेन वाटर हारवेस्टींगची व प्रत्येक प्रभागात बांधकामावेळी झाडे लावण्याची अंमलबजावणी करावी. शहराला दररोज पाणी पुरवठा होण्यासाठी टाक्यांची निर्मिती करुन दररोज स्वच्छ पाणी देने गरजेचे आहे. प्रत्येक प्रभागामध्ये बागांचे संवर्धन करावे. जॉगींग पार्क, लहान मुलांना खेळण्याचे पार्क, ओपन जिम, सायकल ट्रॅक, व्हाकींग ट्रॅक, वाचनालय प्रत्येक प्रभागात करावे. महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाचे कात्रज पुणे येथील प्राणी संग्रहालयाच्या धर्तीवर विस्तारिकरण करण्यात यावे. सोलापूर शहरामध्ये प्रत्येक प्रभागात सुलभ शौचालय गृह करण्यात यावे. घरगुती कचरा याचे विलगीकरण करण्यात यावे. सुका कचरा, ओला कचरा, कंपोस्टिंग करण्यासाठी प्रत्येक प्रभागात नागरिकांना प्रोत्साहन देण्यात यावी.

सोलापूर शहर प्लास्टिक मुक्त करण्यात यावी. कापडी पिशवी वापरण्यासाठी प्रत्येक प्रभागात प्रचार प्रसार व्हावा. ३०० ई-बसचे नियोजन करावे. २ ठिकाणी बस स्थानक करण्यात यावे. एल.आय.सी., महसूल, ज्वारी, गहू यांची विभागीय कार्यालये पुन्हा सोलापूर शहरात यावी यासाठी प्रयत्न व्हावे. शहरामधून जाणारी आदिला नदीचे पुनर्जीवन करून गंगा नदीच्या धर्तीवरती घाट बांधण्यात यावे. शहरातील नाल्यांच्या दुतर्फा सुवासिक फुलांची झाडांची लागवड करावी. सर्व मंदिरांच्या अवती-भोवती पर्यावरणपूरक देशी झाडे लावावीत. शहरामध्ये आठही झोन मध्ये वृक्षारोपण वाढीसाठी ८ जे.सी.बी. ८ पाण्याचे टँकर, ८ डंपर, ८ ट्रॅक्टर ट्रॅली, महापालिका पर्यावरण विभागाला द्यावेत. शहरातील सर्व कारखाने, फॅक्टीजब यांना एस.टी.पी. प्लांट बंधनकारक करावे. शहरातील चार ही तलावा भोवती यामध्ये सिध्देश्वर तलाव, हिप्परगा तलाव, होटगी तलाव, संभाजी तलाव यांची स्वच्छता राखून सुशोभित करावेत. तसेच विविध पक्षी व प्राणी यांचे माहिती फलक लावावेत.

## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि.२२ डिसेंबर-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळेस जमदाडे सर यांनी संत गाडगे बाबा यांच्या कार्य, संपूर्ण जीवनप्रवास यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर वाघमारे यांनी बाबांचे भजन केले. झाडे यांनी आभार मानले तर विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल व पर्यवेक्षक रमेश किरगत व इतर शिक्षकांच्या उपस्थितीत अहिल्या चौकातील सर्व परिसर स्वच्छता केली.






## 'ब्रेन'च्या विश्व युवा विकास व समुपदेशन केंद्राचे उद्घाटन

**लायन्स क्लब सोलापूर मेट्रोचे सहकार्य; हॅकॅथॉनमधील यशाबद्दल प्रज्ज्वल जोशींचा झाला सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२२ डिसेंबर-**

आजच्या युगात युवकांचे मानसिक आरोग्य अथवा मानसिक समस्या हे अत्यंत गंभीर बाब बनलेली आहे. यावर युवा विकास व समुपदेशन केंद्राची स्थापना हे लायन्स इंटरनॅशनल ने हाती घेतलेला एक महत्त्वाचा उपक्रम आहे असे प्रतिपादन लायन्स क्लब चे प्रांतपाल एमजेएफ लायन डॉ. वीरेंद्र चिखले यांनी केले.

लायन्स क्लब सोलापूर मेट्रो व ब्रेन शैक्षणिक समुपदेशन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापित विश्व युवा विकास व समुपदेशन केंद्राचे उद्घाटन डॉ. चिखले यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. हॉटेल सेंटर पॉइंट येथे झालेल्या या कार्यक्रमास विभागीय अधिकारी लायन ॲड.श्रीनिवास कटकुर, क्षेत्रीय अधिकारी लायन सोमशेखर भोगडे, प्रथम उपाध्यक्ष लायन राजेंद्र कासवा, क्लबचे अध्यक्ष लायन विश्वनाथ आवटे, सचिव लायन सुरेश चिकणे, प्रांत खजिनदार सांगोडकर व्यासपीठावर उपस्थित होते. ब्रेन कन्सल्टन्सीच्या मुख्य अधिकारी सौ अर्पिता कुलकर्णी यांनी युवा विकास व समुपदेशन केंद्राच्या कार्यप्रणाली विषयक दृकश्राव्य सादरीकरण केले.

या कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावरील खरगपूर आयआयटी येथे झालेल्या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेता प्रज्वल जोशी, टाटा कन्सल्टंन्सीमधील सिस्टम इंजिनियर सौरभ मोहोळे, शैक्षणिक तक्ता स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी, राष्ट्रीय स्तरावरील जलतरण स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेते संकेत लिगाडे, रितेश लुगडे, विविध प्रशालेतील समन्वयक शिक्षक उल्हासबाई बनसोडे, माधुरी कुलकर्णी, लक्ष्मी कंदीकटला, इंदिरा चिप्पा, सबरीन सौदागर, शिरीन खान, शोभा दुलंगे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

विशेषतः सामाजिक बांधिलकी व जागरण साहित्याद्वारे प्रकट करणारे युवा साहित्यिक मनीष सुरवसे, काशीद या साप्ताहिकाचे संपादक उर्दू साहित्यिक अयुब नलामंदु यांचाही प्रांतपालांच्या हस्ते समाज गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. लायन महबूब शेख, लायन विश्वनाथ आमने, रजिया शेख, लायन ईश्वर झुंजा, लायन सुरेश कुलकर्णी, लायन सुजाता आमने, लायन अर्चना सलवारू, लायन निर्मला भांजे, लायन शलाका कुलकर्णी, प्रा.किरण कुलकर्णी, सोमनाथ पवार, प्रतीक्षा दुर्लेकर, अंबिका पलेलू यांनी परिश्रम घेतले. लायन अशोक भांजे व प्रा. किरण कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सचिव विश्वनाथ आमणे यांनी आभार मानले.



## शेळगाव येथे आज प्रा.वसंत हंकारे यांचे व्याख्यान

**कै. नानासाहेब गायकवाड यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम; उपसभापती बाबा गायकवाड यांचा होणार सत्कार**

**तभा वृत्तसेवा**
**वैराग,दि.२२ डिसेंबर-**

शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. नानासाहेब गायकवाड यांच्या ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता युवा व्याख्याते आणि समाज प्रबोधनकार प्रा. वसंत हंकारे यांचे काळजाला भिडणारे मार्मिक व्याख्यान होणार आहे.

यावेळी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे नूतन उपसभापती बाबा गायकवाड यांचा जाहीर सत्कारही करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम शेळगाव (आर) येथील हायस्कूलच्या मैदानावर होणार आहे. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळातर्फे करण्यात आले आहे.



## वळसंग गट व पंचायत समिती गणात निवडणुकीसाठी वातावरण तापू लागले

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि.२२ डिसेंबर-**

नगरपरिषद निवडणुक निकालानंतर जिल्हापरिषद व पंचायत समितीचे वातावरण तापू लागले असून भाजपमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांस उमेदवारी मिळावी ही पक्ष कार्यकर्त्यांची भावना प्रत्येक गावातून जोर धरत आहे. तर काँग्रेस व शिंदे गटामध्ये मात्र अद्याप कोणतेच प्रभावी चेहरे पुढे येताना दिसत नाहीत. असे असले तरी अनुसूचित जातीसाठी राखीव झालेल्या वळसंग पंचायत समिती गणात संख्येने जास्त असलेल्या बौद्ध समाजाला जो पक्ष उमदेवारी नाकारेल त्यास तेवढाच मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वळसंग जिल्हा परिषद नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव झाल्याने या ठिकाणावरून भाजपतर्फे माजी उपसभापती रामापा चिवडशेट्टी, महेश बिराजदार, मलकाप्पा कोडले, श्रीशैल दूधगी, अनिल बर्वे आदी नावे समोर येत असून रामापा चिवडशेट्टी यांचे नाव आघाडीवर आहे. काँग्रेस व शिंदे गटाकडून अद्याप कोणतेच ठाम नाव पुढे आलेले दिसत नाही. वळसंग पंचायत समिती गण अनुसूचित जाती साठी राखीव झाल्याने येथे काँग्रेसकडून ॲड. संजय गायकवाड यांची उमेदवारी निश्चित मानली जात असली तरी पत्रकार दिनकर नारायणकर यांचे नावही चर्चेत आहे. भाजपकडून गेल्या जिल्हापरिषद निवडणुकीत थोडक्यात पराभव झालेले बलवान गोतसुर्वे यांचे नाव आघाडीवर त्यांनी पराभव झाला तरी सर्व गावातील संपर्क वाढवून पक्ष संघटनेत जोमाने काम केल्याने त्यांना संधी निश्चित मानली जात आहे. तरीसुध्दा पंडित कोरे, कलय्या स्वामी, महायुती सहकारी पक्षाचे रामजी गायकवाड, सिद्धाराम वाघमारे तिकीट मिळाल्यास महादेव होटकर देखील भाजपवाशी होणार असल्याचे कळते. एकंदरीत सगळ्याचा ओढा हा गट व गण सध्या भाजप साठी सुरक्षित असल्याने भाजपमध्ये इच्छुकांची संख्या मोठी दिसत आहे. दोन्ही पक्षा कडून वळसंग मध्येच उमेदवारी दिली गेल्यास वळसंग गावातून उमेदवारापेक्षा त्यांच्या गॉड फादर साठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनणार आहे त्यामुळे कोणताही पक्ष गावातच एकास एक उमेदवार देऊन विनाकारण दुसऱ्या स्थानिक गटास सक्रिय करून सोपी असलेली निवडणूक अवघड करण्याची शक्यता कमी आहे. त्यातच आचेगांव ला उमेदवारी मिळाल्यास संपूर्ण गांव गट तट विसरून गावच्या व्यक्ती साठी एकत्र येत असतो ही आचेगांवची ऐतिहासिक परंपरा आहे त्याच बरोबर गत विधानसभा निवडणुकी वळसंग गावाच्याच्या तुलनेत मतदारसंख्येने निम्मे असलेल्या आचेगांव मधून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना वळसंग गटात सर्वाधिक ९९८ मताचे मताधिक्य दिलेले आहे. त्यातच वळसंग पंचायत समिती अनुसूचित जाती साठी राखीव असल्याने आणि वळसंग गावास पूज्यनीय डॉ बाबासाहेब आंबेडकर पाऊल स्पर्श झाल्याने व त्यांनी येथील विहिरीचे उद्घाटन केल्यामुळे या विहिरीस ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे आणि या दुर्लक्षित ऐतिहासिक विहिरीसाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विशेष लक्ष देऊन कोट्यावधी चा निधी पहिल्या टप्प्यासाठी मंजूर केला असून या ऐतिहासिक विहिरीचे महत्त्व आणखी बळकट करण्यासाठी निधीची कुठलीही कमतरता भासू देणार नसल्याचे आश्वासन दिल्याने या गणात तीन हजाराहून अधिक संख्येने असलेला बौद्ध मतदार भाजपकडे आकर्षित झालेला आहे. याचा जेवढा फायदा होणार आहे तेवढेच नुकसान बौद्ध उमेदवार डावलल्यास भाजपला होऊ शकतो. त्यामुळे भाजपचे निष्ठावंत असलेले भाजप अनुसूचित जातीचे सक्रिय नेते बलवान गोतसुर्वे यांचे भाजप संघटने बरोबर बौद्ध समाजात देखील प्रतिमा चांगली असल्याने त्यांचे पारडे सध्या तरी वरचड दिसत आहे. त्यामुळे पंचायत समिती साठी भाजप कडून बलवान गोतसुर्वे व काँग्रेस कडून संजय गायकवाड अशी लढत दिसण्याची शक्यता असून जिल्हापरिषद साठी मात्र भाजप व्यतिरिक्त पक्षाकडून अजून कुठलाच चेहरा समोर येत असल्याचे दिसत नाही त्यामुळे भाजप मध्येच उमदेवारी बाबत सध्या वातावरण तापत असल्याचे दिसत असून नेतृत्वाची कसोटी लागणार का? अशी परस्थिती आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वेळापूर येथे प्रभाकर सरगर यांचा सन्मान

वेळापूर : सांगोला नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ६ मधून निवडून आलेल्या सीमा समाधान सरगर यांचे दीर प्रभाकर सरगर यांचा माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अजय सकट यांच्यासह प्रभागातील मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



## महत्त्वाचे

### ई-पीकची ऑफलाईन पाहणी प्रक्रिया सुरु; महसूल विभागाचे आदेश

**बार्शी, दि. २२ डिसेंबर-**

खरीप हंगाम २०२५ मध्ये ई-पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांसाठी ऑफलाइन पाहणीची प्रक्रिया सुरु केली आहे. बार्शी तहसील कार्यालयाने यासंदर्भात मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, ग्रामस्तरीय समित्या स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या समितीची मंडळ अधिकारी (अध्यक्ष), ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकारी (सदस्य) अशी रचना आहे. या समितीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांनी पीक नोंदणी अर्ज ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडे १७ ते २४ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत. अर्जाची नोंद घेऊन पोच देण्यात येईल. समितीने २५ डिसेंबर ते ७ जानेवारी २०२६ या कालावधीत शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. पाहणीची वेळ आणि तारीख संबंधित शेतकरी आणि शेजारील ४-५ शेतकऱ्यांना लेखी कळवावी.पाहणीदरम्यान, शेतकऱ्याने लावलेल्या पिकांची चौकशी करुन पंचनामा करावा. यात बी-बियाणे, खतांची खरेदी, मागील वर्षाची पीक नोंद आणि वर्तमान पिकांचे नाव- क्षेत्र नमूद करावे. शेजारील शेतकऱ्यांचे जबाब घ्यावेत. पाहणी अहवाल मंडळ अधिकाऱ्याने गावनिहाय एकत्रित स्वरुपात १२ जानेवारी २०२६ पर्यंत उपविभागीय अधिकाऱ्यांच्या समितीकडे सादर करावा. अहवालात खाते क्रमांक, खातेदार नाव, गट क्रमांक, एकूण क्षेत्र, पीक नावे आणि क्षेत्र स्पष्ट नमूद करावे. सर्व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असाव्यात. ही प्रक्रिया फक्त गाव नमुना नं. १२ वर पूर्वी नोंद न झालेल्या शेतकऱ्यांसाठी लागू आहे. उपविभागीय समिती अहवाल १३ ते १५ जानेवारी २०२६ पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करेल. तहसीलदारांनी मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी आणि कृषी अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. या प्रक्रियेमुळे ज्या शेतकऱ्यांना ई-नोंद करता आली नाही, त्यांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा आहे. विलंब टाळण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना दक्षता घेण्याचे सांगितले आहे.



### वाडिया हॉस्पिटलमध्ये विशेष तपासणी योजना सुरु

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

एनब. एमब. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल हे गुरुपौर्णिमेला पुन्हा चालू करण्यात आले. समाजातील गरजू नागरिकांना योग्य व परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने वाडिया हॉस्पिटल सोलापूर येथे दिनांक २२ डिसेंबर ते २४ जानेवारी या काळात ४० वर्षावरील व्यक्तींसाठी सवलतीच्या दरात विशेष तपासणी योजना राबविण्यात येत असून या योजनेचे उद्‌घाटन खासदार ॲड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते वाडिया हॉस्पिटलमध्ये करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव शिरीष गोडबोले, केतन व्होरा, डॉ. राजीव प्रधान, हॉस्पिटलचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल, गवर्निंग कौन्सिल मेंम्बर ॲड. नितीन हबीब, संजय पटेल, कल्पेश जव्हेरी, डॉ. राजेंद्र घुली, डॉ. शिरीश कुमठेकर, डॉ. संदीप भागवत, राजगोपाल मिणीयार उपस्थित होते.

### श्यामसुंदर जाजू यांचे उद्या व्याख्यान

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

सोलापूर येथील अखिल भारतीय अधिवक्ता परिषद, शाखा सोलापूर यांच्याद्वारे दरवर्षी कै. रंगनाथजी विष्णू लळीत व्याख्यान आयोजित करण्यात येते. व्याख्यानमालेचे यंदाचे तृतीय वर्ष असून, व्याख्यानमालेचे तृतीय पुष्प गुंफण्याकरिता वक्ते नवी दिल्ली भाजपाचे पूर्व राष्ट्रीय उपाध्यक्ष श्यामसुंदर जाजू यांचे 'न्याय सक्षमीकरण, नागरिक दायित्त्व, व विकसित भारत' या विषयावर व्याख्यान होणार आहे. व्याख्यान बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालय येथील लोकमान्य टिळक सभागृह येथे आयोजित करण्यात आले असून, नागरिकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अ.भा.अधिवक्ता परिषदचे जिल्हाध्यक्ष ॲड. धनंजय माने आणि महामंत्री ॲड.मल्लिनाथ शहाबादे, अ.भा. अधिवक्ता परिषद, सोलापूर जिल्हा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### गांजा विक्रीच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या आरोपीचा जामीन मंजूर

**सोलापूर, दि. २२ डिसेंबर-**

शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ४१६/२०२५ अंतर्गत गांजा विक्रीच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या आरोपी संतोष बाळू भोसले याला न्यायालयाने मोठा दिलासा देत जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात आरोपी गांजाची विक्री करत असल्याचा आरोप ठेवत पोलिसांनी एनडीपीएस कायद्याअंतर्गत कारवाई केली होती. तपासानंतर आरोपीस अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. जामीन अर्जावर झालेल्या सुनावणीदरम्यान आरोपीच्या वतीने ॲड. मल्हार भारत बन्ने, ॲड. महादेव गोटे, ॲड. वल्लभी सोनवले व ॲड. श्री. अंकलगी यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण व मुद्देसूद असा युक्तिवाद सादर केला. तपासातील त्रुटी, पुराव्यांचे स्वरूप, आरोपीची वैयक्तिक पार्श्वभूमी तसेच कायद्याच्या तरतुदी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. यावेळी सरकार पक्षाकडून सरकारी चिवरी वकिलांनी आरोपीस जामीन देण्यास विरोध करत आपली बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा सखोल युक्तिवाद ऐकून, तसेच प्रकरणातील एकूण परिस्थितीचा विचार करून न्यायालयाने आरोपी संतोष बाळू भोसले याला योग्य अटी व शर्तींवर जामीन मंजूर केला. या आदेशामुळे आरोपीला तात्पुरता दिलासा मिळाला असून, पुढील तपास व न्यायालयीन प्रक्रिया नियमानुसार सुरू राहणार आहे. सदर प्रकरण सध्या कायदेशीर चर्चेचा विषय ठरत आहे.

## जनतेचा कौल शिरसावंद्य माना अन् कामाला प्राधान्य द्या


- पंढरपूरवासीयांची मागणी
- नूतन कारभाऱ्यांनी विकासावर भर द्यावा

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२२ डिसेंबर -**

पंढरपूर नगरपरिषदेची निवडणूक पार पडली. रविवारी (ता.२१) निवडणूकीचा निकाल देखील जाहीर झाला. या निवडणूकी मध्ये नगराध्यक्षपदा बरोबरच ११ नगरसेवक तिर्थक्षेक्ष विकास आघाडीचे तर २४ नगरसेवक हे परिचारकांच्या मार्गदर्शनाखालील भाजपा,मित्रपक्ष आघाडीचे निवडून आले. एका जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला. त्यामुळे आता नगराध्यक्षासह पालिकेतील ३६ नगरसेवकांनी जनतेने दिलेला कौल हा शिरसावंद मानुन आपसातील वैयक्तीक,पक्षीय हेवेदावे,कटुता बाजूला ठेवून येत्या पाच वर्षा मध्ये तिर्थक्षेत्र पंढरपूरचा पध्दतशीर विकास करण्यासाठी कटीबध्द व्हावे अशी मागणी तमाम पंढरपूरवासियांकडून आता केली जात आहे. त्यामुळे या मागणीला सर्व नवनिर्वाचित मंडळींकडून या पुढील काळात कसा प्रतिसाद दिला जातो हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे.

पंढरपूर हे राज्यातील प्रमुख तिर्थक्षेत्र आहे. त्यामुळे सहाजिकच संपुर्ण राज्याचे लक्ष येथील नगरपरिषदेच्या निवडणूकीकडे लागलेले होते. त्या प्रमाणे पंढरपूर नगरपरिषदेची निवडणूक ही रंगतदार झाली. निकाल जाहीर झाल्या नंतर जनतेचा कौल स्पष्ट झाला. ही निवडणूक प्रामुख्याने परिचारकांच्या मार्गदर्शनाखालील भाजपा, मित्रपक्ष आणि त्यांच्या स्थानिक आघाडी विरुध्द विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भालके आणि त्यांच्या समविचारी सहकारी मंडळींच्या नेतृत्वाखालील तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या माध्यमातून लढविली गेली होती. त्यामुळे जनतेने नगराध्यक्षासह ११ नगरसेवकांचे विजयी माप तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या पारड्यात टाकले तर एक, दोन नव्हे तर तब्बल २४ नगरसेवकांना विजयी करुन सत्ताधारी परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपामित्रपक्ष आणि आघाडीच्या पदरात देखील भरभरुन माप टाकले आहे.

त्यामुळे पंढरपूरच्या जनतेने या निवडणूकीत सर्वांनाच खूष करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दरम्यान या निवडणूकीच्या प्रचाराच्या वेळी दोन्ही बाजूकडून आरोप, प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या गेल्या. काही वेळा वैयक्तीक टिकाटिप्पणी देखील केली गेली. काही प्रभागातून प्रतिस्पर्धी उमेदवारांकडून वैयक्तीक हेवेदावे देखील करण्यात आल्याचे दिसून आले. मात्र आता निवडणूकीचा निकाल लागला आहे आणि जे झाले होते ते सारे गंगेला मिळाले असे समजून सर्वांनीच एकदिलाने शहर विकासासाठी आता कटीबध्द झाले पाहिजे. कारण प्रत्येक नवनिर्वाचित नगरसेवकांसह नगराध्यक्षांची साऱ्या पंढरपूरकरांना सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका असली पाहिजे. तर आणि तरच आपण या विठ्ठलनगरीचा अर्थात तिर्थक्षेत्र पंढरीचा कायापालट करु शकु.निवडणूका येतात जातात मात्र माणूसकीच्या भावनेतून



सर्वांनीच, सर्वांना बरोबर घेत आपसातील दूराग्रह सोडला पाहिजे. कारण यशा मध्ये अनेक दावेदार असतात मात्र अपयशात स्वत: शिवाय कोणीही दावेदार होत नाही. त्यामुळे या निवडणूकीत जे उमेदवार निवडून आले त्यांनी अधिक सक्षमतेने काम करणे अपेक्षीत आहे. जे उमेदवार पराभूत झाले आहेत त्यांनी देखील झालेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळुन आपल्या प्रभागाच्या विकासासाठी, आपल्या शहराच्या विकासासाठी नवनिर्वाचित उमेदवारांच्या पाठीशी राहून आपले समाजसेवेचे व्रत कायम ठेवत आगामी नगरपरिषद निवडणूका हेच आता आपले लक्ष ठेवले पाहिजे.

नगरपरिषदेच्या या निवडणूकीत ज्या मतदारांनी विजयी उमेदवाराला मतदान केले, ज्यांनी मतदान विरोधात केले त्या सर्वांनाच सोबत घेऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश चालवित असताना दिलेल्या नाऱ्या प्रमाणे सबका साथ, सबका विकास हे सूत्र मानून त्यात थोडी भर घालून जब होगा सबका साथ तोही होगा अपने शहर का सर्वांगीण विकास म्हणत पंढरपूरच्या विकासासाठी येत्या पाच वर्षाच्या काळात एकमेकांच्या पायात पाय न घालता सर्वांनी एकमेकांच्या हातात हात घालुन शहराच्या सर्वांगिण विकासासाठी पुढे आले पाहिजे. शहरातील सर्वसामान्य नागरिक केंद्रबिंदू मानून शहरातील रस्ते,पाणी, वीज,आरोग्य आणि स्वच्छता या मुलभूत गोष्टीं बरोबरच नव्या तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करुन शहराचा कायापालट कसा करता येईल, शहरातील प्रदूषण कमी करुन शहरात वृक्षसंवर्धन, पाणी आडवा, पाणी जिरवा, चंद्रभागेची स्वच्छता, वाळु चोरी रोखणे, विठुरायाच्या दर्शनासाठी परगावांहून येथे येणाऱ्या भाविकांसाठी पंढरपूर कसे सुखकर होईल याचा देखील विचार करुन विविध योजनांची पध्दतशीरपणे आखणी करुन त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा करुन त्याची देखील अंमलबजावणी करण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न होणे गरजेचे आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे राज्यातील इतर नगरपरिषदांना जे केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान मिळत नाही ते येथील विठ्ठलरुक्मिणीच्या कृपेमुळे केंद्र आणि राज्य शासनाकडून तिर्थक्षेत्र पंढरपूरसाठी विशेष अनुदान मिळते आहे. ते अनुदान कसे वाढवुन घेता येईल यासाठी देखील विशेष लक्ष दिले पाहिजे. पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तसेच सर्व नगरसेवकांच्या दृष्टीने ही जमेची बाजू असुन यासाठी जास्तीत जास्त केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनां पंढरपूरात कशा आणल्या जातील. त्यांची योग्य पध्दतीने कशी अंमलबजावणी करता येईल यासाठी जिल्हाधिकारी तसेच पालिकेच्या शासकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन नगराध्यक्षांसह पालिकेतील सर्व नगरसेवकांनी त्याबाबत शहरवासियांना अवगत करुन, त्यांचां पुरेपुर सहयोग घेऊन, प्रसंगी त्यासाठी गांधीगिरी सारखी विशेष आंदोलने हातात घेवून शहर विकासासाठी आता मोठ्या वेगाने पाऊले पुढे टाकण्याची हीच वेळ आहे. या सुंदर वेळेचा सदुउपयोग करुन धार्मिकपर्यटनाचे प्रतिक ठरणारे पंढरपूर, स्वच्छ पंढरपूर, सुंदर पंढरपूर, प्रदूषणमुक्त पंढरपूर, हिरवाईने नटलेले पंढरपूर, नवीन तंत्रज्ञानानेयुक्त असे पंढरपूर, चंद्रभागेच्या निर्मळ तिरावरील सुंदर पंढरपूर बनविण्याचा ध्यास नवनिर्वाचित नगराध्यक्षासह सर्व नगरसेवकांनी निश्चित घेणे गरजेचे आहे.



## पैलवान मशीद शेख यांचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार

▸▸ देवगावच्या कुस्ती स्पर्धेत पाच कुस्त्यांमध्ये बाजी मारत पटकावली चांदीची गदा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२२ डिसेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या तालुक्यातील सराव करणाऱ्या गोरगरीब 'कुस्तीगीरांसाठी स्वामींचा प्रसादरुपी खुराकाचे कीट ७७ जणांना दरमहा वजन गटानुसार देण्यात येतो.

यातील न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले ग्रुपचे पै. मशीद शेख याने जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात देवगाव येथील श्री संत रावजीबुवा महाराज केसरी आयोजित कुस्ती स्पर्धेत ५ कुस्त्यांमध्ये विजयी होऊन चांदीची गदा मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. त्याबद्दल त्यांचा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते व न्यासाचे क्रियाशील सदस्य संदीपदाजी फुगे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

महाप्रसादालयात झालेल्या या कार्यक्रमात पैलवान शेख यांना श्रींची प्रतिमा, चांदीची गदा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आला. मशीद शेख यांची ८५ किलो वजन गटात हिंद केसरी करिता सातारा जिल्हा चाचणी मध्ये निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल देखील मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

याप्रसंगी न्यासाचे क्रियाशील सदस्य मनोज निकम, सनी सोनटक्के, पिंटू दोडमनी, प्रवीण देशमुख, अतिश पवार, न्यासाचे पुरोहित सोमकांत कुलकर्णी, नंदकुमार स्वामी, राजू शेख, शकील शेख, रसूल शेख, दत्ता माने, किरण पाटील, राम मदने, प्रवीण घाडगे, गोटू माने, सिद्धाराम कल्याणी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, शावरेप्पा माणकोजी, शिव स्वामी, प्रदीप सलबत्ते, कुमार सलबत्ते, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, राहुल इंडे, विनायक भोसले, शुभम सावंत यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.

## पांगरी परिसरातील वनक्षेत्राला सलग दोन दिवस आग


### तरुण व शेतकऱ्यांच्या प्रयत्नांनी अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२२ डिसेंबर-**

तालुक्यातील पांगरी भागातील वन विभागाच्या मालकीच्या डोंगराला सलग दोन दिवस अज्ञात कारणाने आग लागल्याची गंभीर घटना समोर आली असून, या आगीत वन विभागाच्या मौल्यवान वनसंपदेला मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचली आहे.

दि. १९ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता पांढरी येथील साठवण तलावाच्या खालील भागातील वनक्षेत्राला अचानक आग लागली. या आगीमुळे मोठ्या प्रमाणावर झाडे, गवत व जैवविविधतेचे नुकसान झाले. मात्र प्रसंगावधान राखत पांढरी व ढेंबरेवाडी येथील तरुणांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जीव धोक्यात घालून शर्तीचे प्रयत्न केले आणि लागलेला वनवा विझवण्यात यश मिळवले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. दरम्यान, पुन्हा दि. २० डिसेंबर रोजी पुन्हा पांगरी लगतच्या चिंचोली येथील वन विभागाच्या हद्दीत डोंगराला आग लागल्याची घटना घडली. या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी वन विभागाचे अधिकारी आरजू पीरजादे, तसेच गणेश घावटे, रामलिंग घावटे, सुखदेव घावटे, दादा वाघमारे, बाळासाहेब घावटे, पांढरी, चिंचोली, ढेंबरेवाडी येथील तरुण, वनमजूर व लगतचे शेतकरी आग विझविण्याचा अथक प्रयत्न करत होते. अलीकडील काळात बार्शी तालुक्यातील जंगलातील आगीचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असून, त्यामुळे पर्यावरण व जैवविविधतेला मोठा धोका निर्माण झाला आहे. मानवी निष्काळजीपणा, शेतीचे अवशेष जाळणे तसेच हवामानातील बदल ही जंगलातील आगीची प्रमुख कारणे ठरत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर जंगलात जाळपट्टा (फायरलाइन) तयार करणे अत्यावश्यक असून, त्यामुळे आगीचा प्रसार रोखण्यास मोठी मदत होणार आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सलग दोन दिवस एकाच परिसरात आग लागण्याच्या घटनांमुळे हे कृत्य विघ्नसंतोषी लोकांनी जाणूनबुजून केले असावे, असा संशय पांगरी परिसरातील तसेच वनक्षेत्रालगतच्या गावांतील नागरिकांनी व्यक्त केला आहे. वन विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.



## गोव्याच्या 'ज्ञानेश्वर माऊली' मंडळाने केली चंद्रभागेची स्वच्छता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ डिसेंबर -**

गोव्यातील ज्ञानेश्वर माऊली वारकरी संप्रदायिक सेवा मंडळातर्फे रविवारी (दि. २१) रोजी पंढरपूर येथील क्षेत्र चंद्रभागा तीरांवर स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यावेळी महर्षी वाल्मीकी संघटना पंढरपूरचे अध्यक्ष तसेच आदिवासी कल्याण समितीचे सर्वेसर्वा गणेश अंकुशराव हे उपस्थित होते.

त्यांनी वारकरी संस्थेचे अध्यक्ष देवानंद नाईक यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यांच्या कार्याचे भरभरून कौतुक करत इथे या मंडळींना कोणतीही अडचण आली तर आम्ही ती दूर करू व हवं ते सहकार्य करु असे अभिवचन दिले. यावेळी अंकुशराव म्हणाले की, चंद्रभागेच्या पात्रात चिंध्या, कपडे, चपला अशी भयंकर घाण आहे. हे घाणीचं साम्राज्य पाहून इथं आलेल्या वारकरी भाविकांचे पंढरपुर बाबतचं मत कलुषित होत आहे. या घाणीबाबत प्रचंड नाराजीचा सूर ही उमटत आहे. परंतु मंदिर समिती लाखो रुपये खर्च करुन चंद्रभागा स्वच्छतेसाठी टेंडर काढते पण स्वच्छता का होत नाही? गोव्यासारख्या परराज्यातील वारकरी संघटना इथे येऊन चंद्रभागा स्वच्छ करतात मग महाराष्ट्रातील वारकरी संघटना काय करतात? असा सवाल उपस्थित करत गणेश अंकुशराव यांनी महाराष्ट्रातील विविध वारकरी संघटनांनी सुध्दा चंद्रभागेच्या स्वच्छतेसाठी पुढे यावं असे आवाहन केले.

## मॅडम, माझ्या मुलाला आदर्श नागरिक घडवा

### पालकांचे मुख्याध्यापिकेस पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२२ डिसेंबर-**

मॅडम, कायद्याच्या भीतीपोटी मुलांकडे दुर्लक्ष न करता माझ्या मुलाला आदर्श नागरिक घडवा, असे पत्र सालसे (ता.करमाळा) येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयाच्या सहावीतील जयप्रकाश विजयकुमार गुंड या विद्यार्थ्याच्या पालकांनी शाळेच्या मुख्याध्यापिकेस लिहिले. अन् शिक्षण क्षेत्रात शिस्त, संस्कार आणि शिक्षकांचे अधिकार याविषयी पुन्हा महत्त्वपूर्ण चर्चा सुरू झाली.

दि. १३ डिसेंबर २०२५च्या शासन निर्णयानुसार शिक्षकांनी अध्यापन करताना विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची मानसिक अथवा शारीरिक इजा करू नये, अपमानकारक वक्तव्य टाळावे, रागावू नये, कान ओढणे, उठाबशा काढायला लावणे, अभ्यासासाठी शिक्षा देणे यांसारख्या बाबींवर कठोर निर्बंध घालण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचे बालहक्क आणि संरक्षण या दृष्टीने हा शासन निर्णय अत्यंत महत्त्वाचा असला, तरी त्याचा अतिरेकी अर्थ लावल्यास विद्यार्थ्यांना शिस्त व संस्कार लावणे कठीण होईल, अशी चिंता या पत्रातून व्यक्त करण्यात आली आहे. या शासन निर्णयाच्या आधारे शाळा व्यवस्थापन किंवा पालकांकडून शिक्षकांवर आरोप होण्याची शक्यता वाढल्याने, स्वतःच्या सुरक्षेसाठी शिक्षक विद्यार्थ्यांच्या चुका जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतील, अशी भीती निर्माण झाली आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व नैतिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच पार्श्वभूमीवर जयप्रकाश गुंड यांच्या पालकांनी मुख्याध्यापिकेस लिहिलेल्या पत्रात, माझ्या मुलास घडवताना शिक्षकांनी कोणत्याही कायद्याचा अवास्तव धाक बाळगू नये. माझ्या मुलाच्या बाबतीत मी कोणतीही तक्रार करणार नाही, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. वाढत्या वयात सध्याची सामाजिक परिस्थिती आणि मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे मुलांमध्ये होत असलेले नकारात्मक बदल लक्षात घेता, आज संस्कारांची नितांत गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. शिक्षक केवळ विषय शिकवणारे न राहता आई-वडिलांप्रमाणे विद्यार्थ्यांना वळण लावणारे मार्गदर्शक झाले पाहिजेत. अपूर्ण अभ्यास पूर्ण करून घेण्यासाठी सौम्य शिक्षा देणे, प्रसंगी कठोर शब्दांत समज देणे किंवा रागावणे या गोष्टी शिक्षकांनी निर्धास्तपणे कराव्यात, अशी लेखी विनंती पालकांनी केली आहे. तसेच, विद्यार्थ्यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीचे मनापासून कौतुक करावे, त्यांना भावनिक आधार द्यावा आणि मातृ-पितृ हृदयाने जवळ घ्यावे, असे भावनिक आवाहनही या पत्रात आहे. या पालकांनी दाखवलेल्या विश्वासपूर्ण भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.